मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

मुंबई | RNI No.: MAHAMAR/2016/79101 | शनिवार, ३१ मे २०२५ | वर्ष: १० | अंक: ३१ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## निलेश चव्हाणला नेपाळमधून अटक

**पुणे, दि. ३० वृत्तसंस्था**

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणी निलेश चव्हाणला नेपाळमधून बेड्या ठोकल्या आहेत. गेल्या काही दिवसांपासून निलेश चव्हाण हा फरार होता. अखेर पिंपरी- चिंचवड पोलिसांनी त्याला शोधून काढलं आहे. वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात वैष्णवीच्या चुलत्यांसह इतरांना धमकावणाऱ्या आणि इतर आरोप असणारा निलेश चव्हाण फरार होता. गेल्या काही दिवसांपासून पुणे आणि पिंपरी- चिंचवड पोलीस त्याचा शोध घेत होते. अखेर पिंपरी- चिंचवड पोलिसांनी त्याला नेपाळमधून बेड्या ठोकल्या आहेत. पिंपरी- चिंचवड पोलिसांची सहा पथकं निलेश चव्हाणचा शोध घेत होते. तो दुसऱ्या राज्यात असल्याचा संशय व्यक्त केला जात होता. परंतु, तो नेपाळ येथे असल्याची माहिती मिळाल्यानंतर पिंपरी- चिंचवड पोलिसांनी तात्काळ त्याला अटक केली आहे. लवकरच त्याला पिंपरी- चिंचवडमध्ये आणले जाणार आहे.

# ...तर सापाला बिळातून बाहेर काढून चिरडू

## पंतप्रधान मोदींचा दहशतवाद्यांना इशारा



**रोहतास, दि. ३० वृत्तसंस्था**

गेल्या काही दिवसांपासून भारत सातत्याने पाकिस्ताने दहशतवादापासून दूर राहण्याचा सल्ला देत आहे. याबरोबर जर पाकिस्तानने दहशतवाद्यांना पोसणे थांबवले नाही आणि पुन्हा भारतात एखादी दहशतवादी घटना घडवली तर त्यांनी गंभीर परिणामांना सामोरे जाण्यास तयार राहावे, अशी स्पष्ट भूमिका जाहीर केली आहे. दरम्यान शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी बिहारमध्ये दहशतवाद्यांना इशारा देत, जर पुन्हा दहशतवादी कारवाया केल्या तर सापाप्रमाणे बिळातून बाहेर काढून चिरडून टाकू, असे म्हटले आहे. बिहारच्या रोहतास जिल्ह्यातील विक्रमगंज येथे एका सभेत बोलताना पंतप्रधान मेदींनी ऑपरेशन सिंदूरच्या यशावर भाष्य केले. ते म्हणाले की, "जर पुन्हा डोके वर काढेल तर भारत दहशतवाद्यांच्या रूपातील सापाला त्याच्या बिळातून बाहेर काढून चिरडून टाकेल." दरम्यान भारताने काही दिवसांपूर्वी पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तान व पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवादी तळांवर हल्ला करत ते उद्ध्वस्त केले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारमधील कराकट येथे झालेल्या भव्य सभेत ४८,५२० कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन व पायाभरणी केली. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांनी दहशतवादाविरोधातील देशाच्या लढ्याचा पुनरुच्चार केला. तसेच, नक्षलवादाच्या विरोधातील यशस्वी मोहिमेवर प्रकाश टाकला. पंतप्रधान मोदी म्हणाले, "आज बिहारच्या पवित्र भूमीवरून विकासाला नवी चालना देण्याचा संकल्प पूर्ण करत आहे. ५० हजार कोटींपेक्षा जास्त रकमेच्या प्रकल्पांचे भूमिपूजन आणि लोकार्पण झाल्याचा मला अभिमान आहे." यावेळी त्यांनी उपस्थित मातांसह भगिनींच्या मोठ्या संख्येतील सहभागाबद्दल विशेष उल्लेख करत कृतज्ञता व्यक्त केली.

पहलगाम येथील अलीकडील दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख करत मोदी म्हणाले की, "ज्यांनी पाकिस्तानातून आमच्या देशावर हल्ले घडवले, त्यांच्या लपण्याच्या जागा उद्ध्वस्त करण्यात आल्या आहेत. भारत आता जुना राहिलेला नाही; नव्या भारताने प्रतिशोधाची नवी ताकद दाखवली आहे." त्यांनी 'ऑपरेशन सिंदूर'चा उल्लेख करत म्हटले की, भारतीय सैन्याने दहशतवाद्यांच्या तळांवर कठोर प्रहार केला. "भारतीय सैन्याच्या साहसामुळे जगाने आमच्या सिंदूरची ताकद पाहिली आहे," असे ते म्हणाले.

मोदींनी बीएसएफच्या उपनिरीक्षक इम्तियाज यांच्या बलिदानाची आठवण करून दिली. "आपले जवान देशाच्या सुरक्षेसाठी अभेद्य ढाल बनून उभे राहिले आहेत. ऑपरेशन सिंदूरमध्ये त्यांच्या शौर्याला संपूर्ण जगाने सलाम केला आहे," असे ते म्हणाले.

**नक्षलवादाविरोधातील लढ्यात मोठे यश**

नक्षलप्रभावित भागांबाबत बोलताना पंतप्रधानांनी म्हटले की, "२०१४ पूर्वी १२५ जिल्हे नक्षलग्रस्त होते, तर आता ही संख्या केवळ १८ वर आली आहे. रुग्णालये, मोबाईल टॉवर्स, रस्ते आणि रोजगाराच्या संधी आता नक्षलग्रस्त भागांमध्ये पोहोचत आहेत. आता तो दिवस दूर नाही, जेव्हा माओवादी हिंसाचार पूर्णतः नष्ट होईल."

## अग्रलेख — खरीखरी

## अशा-अशाही लाडक्या बहिणींचा कावा

"जो धक्के से चले उसे कार कहते है, और जो बिना धक्के से चले उसे सरकार कहते है" अशी एक म्हण आहे. राज्यातील विधानसभा निवडणुका पूर्वीच्या काळात अनेक योजनांची घोषणा करण्यात आली. त्यात सर्वाधिक हिट्ट योजना म्हणजे लाडक्या बहिणींना मदत. ही मदत देताना अनेक लाडक्या बहिणी आधीच सरकारच्या महा लाडक्या होत्या. म्हणजे त्या सरकारी नोकरीमध्ये होत्या. पण ते त्यावेळी बघणे योग्य वाटले नव्हते. त्यानंतर आतापर्यंत पडताळणी केलेल्या बहिणींमधील जवळपास अडीच ते पावणेतीन हजार सरकारी नोकरीत असलेल्या बहिणींनी अगदी कावा करून गरज नसताना या योजनेचा लाभ घेतलेला आहे. आता या सर्व लाडक्या बहिणींची ओवाळणी कर्ज काढून देण्याचे दिवस आलेले आहेत. त्यामुळे ज्या बिचाऱ्या खरोखर गरीब गरजू लाडक्या बहिणी आहेत. त्यांना लाभ मिळाला पाहिजे. त्या एवजी सरकारी नोकरी करणाऱ्या आणि अधिकृतपणे दरमहा हजारो आणि वर्षाकाठी लाखो रुपये कमावणाऱ्या अनेक महिलांनी आतापर्यंत दरमहा पंधराशे रुपये बिनदिक्कतपणे लाटले. हे सत्य समोर आले आहे. हा झाला सरकारी बहिणींचा आकडा. आता आठ लाख 85 हजार बहिणींनी नमो शेतकरी योजना आणि लाडकी बहीण योजना या दोन्ही योजनांचा लाभ घेतलेला आहे. आता ही आकडेवारी समोर आल्यानंतर या बहिणींना काय म्हणावे. हेच आम्हाला समजेनासे झालेले आहे. ऊस गोड आहे म्हणून तो मुळासकट खाण्याचा हा उद्योग किती घातक होऊ शकतो. हे अजून या बहिणींना समजलेले नाही. सरकारी नोकरीत असलेल्या बहिणींना असा लाभ देणे किंवा घेणे म्हणजे सरकारची फसवणूक करणे आहे. हे समजत नसेल तर अशा बहिणींना सरळ सरळ घरी बसवले पाहिजे. कारण सरकारी बहिणींची बाब अत्यंत गंभीर आहे. इकडे डबल लाभ घेणाऱ्या बहिणींना या दोन्हीही लाभांपासून वंचित केले पाहिजे. असा सामान्य जनतेचा सूर आहे. या विषयावर आम्ही अधिक भाष्य करणे बरोबर नाही. कारण सरकार निर्णय घेण्यासाठी सक्षम आहे. म्हणूनच सूत्रबद्ध रीतीने जे होऊ नये. ते झाल्यामुळे संबंधित अपराधी बहिणींना त्यांच्या कृत्याबद्दल काय शिक्षा होते. हे महाराष्ट्रातील गरीब लाडके भाऊ बघत आहेत. सत्तारूढ भावांनी आपला भाव वाढवण्याकरता जो उदारतेचा आव आणला. तेव्हा त्यांनाही हा धडा आहे की थोड्याशा फायद्यासाठी गडबड-बडबड करून शेवटी बदनामी हाती लागते. अर्थात हे त्यांना समजलेले असेलच. यातून पुढे काय निष्पन्न होते. ते पाहण्याची उत्सुकता सर्वांनाच आहे. हे मात्र खरे आहे.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## महायुतीचा नो रिस्क फॉर्म्युला

### स्वबळाच्या चर्चांना पूर्णविराम

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी जवळ येत असताना, भाजपकडून स्वबळावर निवडणूक लढवण्याच्या चर्चा रंगत होत्या. मात्र, महत्त्वाच्या महापालिकांसाठी महायुतीने नो रिस्क धोरण स्वीकारल्याचे खात्रीलायक सूत्रांनी उघड केले आहे.

मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, संभाजीनगर आणि नवी मुंबई यांसारख्या महत्त्वाच्या महापालिकांमध्ये तिन्ही घटक पक्ष भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) एकत्र निवडणूक लढवणार असल्याची माहिती महायुतीतील वरिष्ठ नेत्याने खासगीत दिली. या धोरणामागे विरोधकांना काहीही संधी न देण्याची रणनीती असल्याचेही समजते. एकत्र लढल्यास 'सिंबायोटिक' प्रभाव निर्माण होईल आणि जागा जिंकण्याचा टक्का मोठ्या प्रमाणात वाढेल, असा महायुतीचा विश्वास आहे. त्यामुळे 'स्वबळ' ऐवजी 'संबळ' या मार्गाने जाण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. महायुतीतील अंतर्गत समन्वय अधिक बळकट करून प्रभाग रचना, आरक्षण आणि उमेदवार निवडीच्या प्रक्रियेवरही एकसंध रणनीती आखली जात असल्याचे सांगण्यात येते. विरोधकांकडून 'आघाडीमध्ये फूट' असा प्रचार करण्यात येत असतानाच, महायुतीकडून ही राजकीय सुस्पष्टता आणि एकात्मतेची शक्तिप्रदर्शनासारखी घोषणा मानली जात आहे. राज्याच्या राजकीय वर्तुळात आता सर्वांच्या नजरा या नो रिस्क धोरणाच्या पुढील टप्प्यावर लागल्या आहेत.

## तर पाकिस्तानचे चार तुकडे होतील - संरक्षण मंत्री

### परत 'नापाक' हरकत केली तर यावेळी कदाचित भारतीय नौदल 'ओपनिंग' करेल

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी आज भारतीय नौदलाच्या ताफ्यातील स्वदेशी विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांतला भेट दिली. ऑपरेशन सिंदूरचं यश नौदलाबरोबर साजरं करण्यासाठी संरक्षणमंत्री तिथे गेले होते. यावेळी भारतीय नौदलाने अरबी समुद्रात शक्तीप्रदर्शन केलं. त्यानंतर युद्धनौकेवर आयोजित एका कार्यक्रमाद्वारे राजनाथ सिंह यांनी नौदलाच्या जवानांना संबोधित केलं. आपल्या भाषणादरम्यान त्यांनी नौदलातील जवानांच्या शौर्याचं कौतुक केलं. ते म्हणाले, "भारतीय नौदलाने पूर्ण क्षमतेने कारवाई केली तर पाकिस्तानचे चार तुकडे होतील".

राजनाथ सिंह म्हणाले, "ऑपरेशन सिंदूरच्या वेळी भारतीय नौदलाने कोणताही गाजावाजा न करता केलेल्या कामगिरीद्वारे प्रत्येक भारतीयाला प्रभावित केलं आहे. आपल्या सैन्याने अत्यंत शांत राहून पाकिस्तानी लष्कराला बांधून ठेवण्यात यश मिळवलं आहे. जो शांत राहूनही एखाद्या देशाच्या लष्कराला बाटलीत बंद करून ठेवू शकतो तो जेव्हा बोलू लागेल तेव्हा काय चित्र असेल याची कल्पना करा".

संरक्षण मंत्री म्हणाले, "यावेळी पाकिस्तानी सैन्याला आपल्या फायर पॉवरचा सामना करावा लागला नाही. मात्र, जगाला माहिती आहे की पाकिस्तानने यावेळी कुठलीही नापाक हरकत (आगळीक) केली तर कदाचित त्यांच्याविरोधात भारतीय नौदल ओपनिंग करू शकतं". म्हणजेच, यावेळी भारतीय वायूदल किंवा भूदलाच्या आधी भारतीय नौदल पाकिस्तानविरोधात रणशिंग फुंकू शकतं. ते म्हणाले, "१९७१ हे वर्ष भारतीय नौदलाच्या सामर्थ्याचं व पराक्रमाचं साक्षीदार आहे. त्यावेळी आपलं नौदल पुढे सरसावलं आणि पाकिस्तानचे दोन तुकडे झाले. ऑपरेशन सिंदूरच्या वेळी भारतीय नौदलाने पाकिस्तानविरोधात मोर्चा उघडला असता तर पाकिस्तानचे चार तुकडे झाले असते".

राजनाथ सिंह म्हणाले, "अरबी समुद्रातून भारताने पाकिस्तानला कठोर संदेश दिला आहे. भारताची सागरी सीमा तुमच्या (नौदलाच्या) हातात आहे. तुम्ही इथे आहात म्हणून कोणी भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्यची हिंमत करत नाही. तुमच्या आजवरच्या कामगिरीबद्दल मी तुम्हाला नमन करतो. मी आज येथे केवळ देशाचा संरक्षण मंत्री म्हणून नव्हे तर, एक कृतज्ञ भारतीय म्हणून आलो आहे. तुमच्या समर्पणाला माझा दंडवत. मी तुमच्या शौर्याचा गौरव करण्यासाठी आणि तुमच्या परिश्रमाला सलाम करण्यासाठी येथे आलो आहे".



# भारतात वर्षभरात 36 हजार कोटींचे बँक घोटाळे

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

आर्थिक वर्ष 2024-25मध्ये देशातील बँकांमध्ये झालेल्या घोटाळ्यांची संख्या 34 टक्क्यांनी कमी झाली आहे. मात्र, या घोटाळ्यांत अडकलेली रक्कम तिपटीने वाढून 36 हजार 14 कोटी रुपयांवर गेली आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) जाहीर केलेल्या वार्षिक अहवालातून ही आकडेवारी समोर आली आहे. मार्च-2025 अखेरीस संपलेल्या आर्थिक वर्षात बँक घोटाळ्यांची संख्या गत वर्षाच्या तुलनेत 34 टक्क्यांनी घटून 23,953 वर आली आहे. या घोटाळ्यांमध्ये खासगी बँकांचा वाटा सर्वाधिक आहे. मात्र, घोटाळ्यांमध्ये अडकलेली सर्वाधिक रक्कम सरकारी बँकांशी निगडित घोटाळ्यांतील आहे. या घोटाळ्यांमध्ये 36 हजार 14 कोटी रुपये अडकले आहेत. घोटाळ्यांची रक्कम वर्षभरात तिपटीने वाढली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार घोटाळ्यांबाबत केलेले स्वतंत्र वर्गीकरण काढून टाकण्यात आले आहे. त्यामुळे 2024-25 मध्ये 22 घोटाळ्यांच्या प्रकरणात अडकलेली रक्कम 18 हजार 674 कोटी रुपयांनी वाढली आहे. आरबीआयकडे एक लाख अथवा त्यावरील रकमेचा घोटाळा झाल्यास त्याची माहिती दिली जाते. आर्थिक वर्ष 2024-25 मध्ये खासगी बँकांमध्ये 14 हजार 233 घोटाळ्यांची नोंद झाली आहे.

एकूण घोटाळ्यांपैकी 59.4 टक्के घोटाळे खासगी बँकांमध्ये नोंदविले गेले आहेत. सरकारी बँकांमध्ये 6 हजार 935 (29 टक्के) घोटाळ्यांची नोंद झाली आहे. सरकारी बँकांमधील घोटाळ्यांमध्ये अडकलेली रक्कम 25,667 कोटी (71.3 टक्के) आहे. खासगी बँकांमधील घोटाळ्यांमध्ये 10 हजार 88 कोटी रुपये अडकले आहेत.

**कर्जघोळ अधिक**

आर्थिक वर्ष 2024-25 मध्ये डिजिटल पेमेंटमधील घोटाळ्यांची संख्या 13,516 आहे. एकूण घोटाळ्यांच्या 56.5 टक्के घोळ डिजिटल पेमेंटमध्ये झाले आहेत. त्यात अडकलेली रक्कम 520 कोटी रुपये आहे. कर्जवितरणात झालेल्या घोटाळ्यांची संख्या 7 हजार 950 आहे. यात अडकलेली रक्कम तब्बल 33 हजार 148 कोटी रुपये आहे. घोटाळ्यातील 92 टक्के रक्कम कर्जवितरणाशी संबंधित घोळातील आहे.

# अभिनेता अरशद वारसीसह त्याच्या पत्नीवर शेअर बाजारात बंदी

## सेबीची कारवाई, कृत्रिमरित्या वाढवली शेअरची किंमत

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

लोकप्रिय अभिनेता अरशद वारसी, त्यांची पत्नी मारिया गोरेटी आणि त्यांच्या भावावर भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाने (SEBI) एक वर्षासाठी शेअर बाजारात गुंतवणूक करण्यास बंदी घातली आहे.

साधना ब्रॉडकास्ट लिमिटेड (आता क्रिस्टल बिझनेस सिस्टम लिमिटेड) या कंपनीच्या शेअरमधील मोठ्या प्रमाणावर "पंप अँड डंप" प्रकारच्या फसवणूक योजनेत सहभागी असल्याचे सेबीच्या चौकशीत स्पष्ट झाले आहे.

**काय आहे प्रकरण?**

मार्च 2022 ते नोव्हेंबर 2022 या कालावधीत साधना ब्रॉडकास्ट या कंपनीच्या शेअरची किंमत कृत्रिमरीत्या वाढवण्यात आली आणि नंतर ती मोठ्या प्रमाणावर विकून खोट्या माहितीत गुंतलेल्या किरकोळ गुंतवणूकदारांची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणात एकूण 60 जणांचा सहभाग असल्याचे सेबीने स्पष्ट केले आहे.

सेबीच्या अहवालानुसार, अरशद वारसी यांनी स्वतःच्या, पत्नीच्या आणि भावाच्या डीमॅट खात्यांद्वारे मोठ्या प्रमाणावर




ट्रेडिंग केली. मनीष मिश्रा नावाच्या व्यक्तीसोबत त्यांचे व्हॉट्सअ‍ॅप संवादही सापडले असून, त्यामध्ये प्रत्येकी 25 लाख रुपये बँक खात्यात ट्रान्सफर करण्याची ऑफर दिली गेली होती.

त्यानंतर सेबीने अरशद वारसी, मारिया गोरेटी आणि त्यांच्या भावास एक वर्षासाठी बाजारात गुंतवणूक करण्यास बंदी घातली असून, प्रत्येकी 5 लाखांचा दंड तसेच 1.05 कोटी रुपयांची अवैध कमाई परत करण्याचे आदेश दिले आहेत.

**कशी झाली फसवणूक?**

या प्रकरणात युट्यूब चॅनेल्सचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर करण्यात आला. The Advisor, Midcap Calls, Profit Yatra, Moneywise, India Bullish यासारख्या चॅनेल्सवरून साधना ब्रॉडकास्टच्या भविष्यासंदर्भात खोट्या व आशादायक बातम्या प्रसारित करण्यात आल्या.

या माहितीच्या आधारे अनेक किरकोळ गुंतवणूकदारांनी शेअर्स खरेदी केल्याची माहिती आहे.

**प्रमुख आरोपी व कारवाई:**

**मनीष मिश्रा :** फसवणुकीचा प्रमुख सूत्रधार, 5 कोटी रुपयांचा दंड

**गौरव गुप्ता :** सर्वाधिक नफा कमावलेला (18.33 कोटी रूपये), रक्कम परत करण्याचे आदेश

**साधना बायो ऑइल्स प्रा. लि. :** 9.41 कोटी रूपये नफा, रक्कम परत करावी लागणार

**इतर आरोपी :** राकेश गुप्ता, सुभाष अग्रवाल, पियूष अग्रवाल, लोकेश शाह यांच्यावर प्रत्येकी 2 कोटी रुपये दंड

**IPS अधिकारी :** प्रकरण सेटलमेंटमार्फत मिटवले

हे प्रकरण सोशल मीडियाच्या माध्यमातून गुंतवणूकदारांची फसवणूक कशी होऊ शकते याचे उत्तम उदाहरण ठरले आहे. सेबीने यावेळी हे स्पष्ट केले आहे की "सोशल मीडियावर आधारित शेअर टिप्स तपासून पाहिल्या नाहीत, तर मोठी फसवणूक होऊ शकते."

# पश्चिम रेल्वेच्या आज आणि उद्या 162 लोकल फेऱ्या रद्द, कांदिवली यार्ड येथे मोठा ब्लॉक

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

पश्चिम रेल्वेवरील कांदिवली यार्ड येथील उन्नत आरक्षण कार्यालय तोडण्यासाठी शनिवारी दुपारी १ ते रविवारी मध्यरात्री १ दरम्यान पाचव्या मार्गावर आणि यार्ड मार्गावर ३६ तासांचा मोठा ब्लॉक घेण्यात येणार आहे. या कालावधीत पश्चिम रेल्वेवरील सुमारे १६२ अप आणि डाऊन लोकल रद्द करण्यात येणार आहेत. ब्लॉक कालावधीत लोकल सेवा आणि मेल, एक्स्प्रेस जलद मार्गावर वळविण्यात येणार आहेत. ब्लॉक कालावधीत प्रवाशांची प्रचंड गैरसोय होण्याची शक्यता आहे. या ब्लॉकमुळे लोकल सेवेवर परिणाम होणार असून काही लोकल फेऱ्या रद्द करण्यात येणार आहेत. या काळात सुमारे १६२ लोकल फेऱ्या रद्द करण्यात येणार आहेत. याबाबतची सविस्तर माहिती संबंधित स्थानक व्यवस्थापकाकडे उपलब्ध आहे, अशी माहिती पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी दिली.३० मे आणि ३१ मे २०२५ रोजी सुटणारी गाडी क्रमांक १९४१८ अहमदाबाद – बोरिवली एक्स्प्रेस वसई रोड येथे रद्द करण्यात येईल. त्यामुळे ही रेल्वेगाडी वसई रोड आणि बोरिवलीदरम्यान धावणार नाही. ३१ मे आणि १ जून २०२५ रोजी सुटणारी गाडी क्रमांक १९४२५ बोरिवली-नंदुरबार एक्स्प्रेस भाईंदर येथे रद्द करण्यात येईल. त्यामुळे ही रेल्वेगाडी बोरिवली आणि भाईंदरदरम्यान धावणार नाही.

३१ मे २०२५ रोजी सुटणारी गाडी क्रमांक १९४२६ नंदुरबार-बोरिवली एक्स्प्रेस वसई रोड येथे रद्द करण्यात येईल. त्यामुळे, ही रेल्वेगाडी वसई रोड आणि बोरिवलीदरम्यान धावणार नाही.

# नॅशनल पार्कमधील 18 हजार कुटुंबाना मुंबईबाहेर हलविण्याच्या हालचाली

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीतील पुनर्वसन रखडलेल्या 18 हजार कुटुंबांना आता मुंबईबाहेर ठाणे जिल्ह्यात हलविण्याच्या हालचाली सुरू आहेत. याला येथील नागरिकांनी विरोध केला आहे. जनता दल सेक्युलर पक्ष आणि मूलभूत अधिकार संघर्ष समितीने निश्चित केलेल्या मरोळ मरोशीतील जागेतच पुनर्वसन करावे अशी मागणी केली आहे.

न्यायालयाच्या आदेशानुसार येथील 30 हजारांहून अधिक झोपड्या सन 2000 मध्ये तोडण्यात आल्या होत्या. यातील आठ हजार कुटुंबांचे चांदीवली येथे पुनर्वसन करण्यात आले. मात्र जागअभावी 18 हजार कुटुंबे गेली 45 वर्षे संजय गांधी उद्यानाच्या हद्दीत खितपत पडली आहेत. त्यांना मूळ जागी कोणत्याही नागरी सुविधा देण्यात येऊ नये, असा निर्णय न्यायालयाने दिला असल्याने त्याना मुलभूत सुविधाही मिळत नाहीत. त्यामुळे ही कुटुंबं प्लास्टिक, बारदाने यांनी बांधलेल्या कच्च्या झोपडीत राहत आहेत.

दरम्यान, मुंबई जनता दलाने केलेल्या आंदोलनानंतर सन 2016/17 मध्ये मरोळ मरोशी येथील वन विभागाच्या ताब्यातील परंतु, महसुली असलेल्या 90 एकर जमिनीवर या रहिवाशांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. 26 हजार घरे बांधण्यासाठी नोव्हेंबर 2018 मध्ये निविदाही काढण्यात आली होती. मात्र, हा प्रकल्प नंतर बारगळला होता.

आता या कुटुबियांयाचे पुर्वसन करण्यासाठी ठाणे जिल्ह्यात वन विभागाने जागेचा शोध सुरू केला आहे. जनता दल सेक्युलर मुंबई पक्षाने याला विरोध केला आहे. मरोळ मोशीतील जागेवरच या रहिवाशांचे पुनर्वसन शासनाने करावे, अशी मागणी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाथाभाऊ शेवाळे, मुंबई अध्यक्ष प्रभाकर नारकर, जिल्हाध्यक्ष संजीवकुमार सदानंद, स्थानिक कार्यकर्ते दिपेश परब, दिव्या परब, मूलभूत अधिकार संघर्ष समितीचे दिनेश राणे, संग्राम पेटकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच वनमंत्री यांना दिलेला पत्रात केली आहे.

# आपत्तीत मदत व बचाव कार्यासाठी एनडीआरएफ, एसडीआरएफ पथके सतर्क

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

राज्यात आपत्ती परिस्थितीत मदत व बचाव कार्यासाठी एनडीआरएफ आणि एसडीआरएफ पथके सतर्क आहेत. मुंबई शहर व उपनगर मध्ये एनडीआरएफची तीन पथके, पालघर मध्ये एक, नागपूर येथे दोन पथके तैनात आहेत. तर पुणे मुख्यालय येथे एनडीआरएफची दोन पथके राखीव ठेवण्यात आली आहेत. नागपूर व धुळे येथे एसडीआरएफची प्रत्येकी दोन पथके तैनात असल्याची माहिती राज्य आपत्ती व्यवस्थापन कार्य केंद्राकडून देण्यात आली.

राज्यात मागील २४ तासांमध्ये (२९ मी रोजी सकाळपर्यंत ) मुंबई उपनगरात सर्वाधिक ३५.२ मिमी पाऊस झाला आहे. मुंबई २९.८ मिमी, ठाणे २९.५ मिमी, नाशिक २६.३ मिमी आणि रायगड जिल्ह्यात २१.९ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

राज्यात कालपासून आज २९ मे रोजी सकाळपर्यंत झालेल्या पावसाची सरासरी आकडेवारी पुढीलप्रमाणे (सर्व आकडे मिलिमीटरमध्ये) :- ठाणे जिल्ह्यात २९.५, रायगड २१.९, रत्नागिरी १०.१, सिंधुदुर्ग १३, पालघर ३.१, नाशिक २६.३, धुळे १५.९, नंदुरबार ५.२, जळगाव ३.२, अहिल्यानगर ४.३, पुणे ४.८, सोलापूर ५.७, सातारा ३.९, सांगली १.६, कोल्हापूर ०.७, छत्रपती संभाजीनगर २.८, बीड १, लातूर २.१, धाराशिव ९.७, परभणी ०.१, हिंगोली ०.१, यवतमाळ ०.१, वर्धा ४.७, नागपूर २०.८, भंडारा १.७, गोंदिया ५, आणि गडचिरोली ०.९.

दिनांक २८ मे २०२५ रोजी मुंबई शहरमध्ये झाड पडून दोन व्यक्ती, पालघर जिल्ह्यात वीज पडून एक व्यक्ती आणि सातारा जिल्ह्यात बंधाऱ्यात पडून एक व्यक्ती मृत झाली आहे. मुंबई उपनगर येते झाड पडून दोन, पुणे जिल्ह्यात आगीच्या घटनेत चार व्यक्ती जखमी झाल्या आहेत. तर जालना जिल्ह्यात २६ प्राणी , वर्धा जिल्ह्यात एक आणि चंद्रपूर जिल्ह्यात एक प्राणी मृत झाला आहे. तसेच मुंबई काळाचौकी येथे भारत आइस कंपनीमधून होणारी अमोनिया वायुची गळती मुंबई महानगरपालिका आणि अग्नीशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी आवश्यक कार्यवाही करुन वायू गळती थांबवली असल्याचे सांगण्यात आले आहे.

# राजकीय रणांगणातून विश्रांतीकडे मुंडे ?

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येनंतर राजीनामा देणारे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित गट) नेते धनंजय मुंडे यांच्यासाठी पुन्हा मंत्रिमंडळात येण्याचा मार्ग जवळपास बंद झाल्याचे संकेत आहेत. या प्रकरणातील गंभीर आरोप, तसेच त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील वादांमुळे मुंडे सातत्याने चर्चेत राहिले आहेत.



संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर समोर आलेले धक्कादायक फोटो आणि व्हिडीओंमुळे प्रकरण अधिकच गाजले. त्यानंतर जनतेच्या आणि विरोधकांच्या दबावामुळे मुंडेंना अन्न व नागरी पुरवठा खात्याचा तातडीने राजीनामा द्यावा लागला होता. पुढे त्यांच्या पत्नी करुणा मुंडे यांनी केलेले गंभीर आरोपही सार्वजनिक चर्चेचा विषय ठरले.

मुंडेंच्या राजीनाम्यानंतर त्यांच्या जागी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना अन्न व नागरी पुरवठा खात्याची जबाबदारी देण्यात आली. त्यामुळे मुंडे यांना पुन्हा मंत्रिमंडळात स्थान मिळण्याची शक्यता जवळपास संपल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे.

दरम्यान, सध्या मुंडे इगतपुरी येथील विपश्यना ध्यान केंद्रात दाखल असून, मागील आठ दिवसांपासून ते ध्यानसाधनेत व्यस्त आहेत. दहा दिवसांच्या या विपश्यना शिबिरात मोबाईल वापर निषिद्ध असून, बाहेरील संपर्क पूर्णपणे बंद असतो. या काळात ते स्वतःला मनःशांतीसाठी वेळ देत आहेत, अशीही चर्चा आहे.

मुंडेंनी अलीकडच्या काळात अनेक सार्वजनिक कार्यक्रमांना मुक्काम दिला आहे. बीड जिल्ह्यातील नियोजित दौरा त्यांनी अचानक रद्द केला होता. त्याचबरोबर बीडचे पालकमंत्री अजित पवार यांचा दौरा असतानाही मुंडे अनुपस्थित होते. त्याच वेळी ते त्यांच्या मुलीच्या फॅशन शोमध्ये सहभागी झाल्याचे वृत्त समोर आले होते. या सर्व घटनांमुळे मुंडेंनी जाणीवपूर्वक सार्वजनिक क्षेत्रापासून काहीसा अलिप्त राहण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.

राजकीय व वैयक्तिक आयुष्यातील वाद, मंत्रीपदाचा गमावलेला अधिकार, आणि त्यानंतर आलेले वैचारिक मंथन – हे सगळं पाहता धनंजय मुंडेंचा राजकीय पुनरागमनाचा मार्ग सध्या तरी अधिकच कठीण झाला आहे.

# शिवडीत झाड पडल्याने तरुणाचा बळी; एक जखमी

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

शहर आणि उपनगरात बुधवारी दुपारच्या सुमारास जोरदार पाऊस पडला. बुधवारी सकाळी ८ ते गुरुवारी सकाळी ८ या २४ तासांत ३० ठिकाणी झाडे आणि त्यांच्या फांद्या पडल्याच्या तक्रारी नागरिकांनी पालिकेकडे केल्या. शिवडी येथे किडवाई पोलिस ठाण्यानजीकच्या अँगल सोसायटीतील गुलमोहराचे मोठे झाड बुधवारी रात्री उन्मळून पडल्याने रस्त्यालगतच्या दोन ते तीन वाहनांचे नुकसान झाले. तर, एका तरुणाचा मृत्यू झाला असून, एक जण जखमी आहे. चेंबूरमध्येही फांदी पडल्यामुळे दोन तरुण जखमी झाले आहेत.

शिवडी येथे गुलमोहराचे झाड चालत्या दुचाकीवर पडल्याने रमझान निषाद (२७), बाळकृष्ण कुराई (३३) हे दुचाकीस्वार जखमी झाले. जखमींना केईएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, निषादचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर अन्य कुराई याची प्रकृती स्थिर आहे. चेंबूरमधील जैतवन उद्यानाजवळ बुधवारी रात्री झाडाची फांदी पडल्याने हितेश शेरसाया (२२) आणि जयेश बोरा (२२) हे पादचारी जखमी झाले. त्यांच्यावर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. बुधवारच्या पावसामुळे शहरात दोन व पूर्व उपनगरात दोन ठिकाणी घर, इमारतीचा भाग, भिंत पडण्याच्या तक्रारी पालिकेच्या आपत्कालीन विभागाकडे आल्या. अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षाकडून प्राप्त माहितीनुसार भायखळा पश्चिमेतील बदलू रामगरी स्ट्रीट, अशरफी मंजिल येथे पाच मजली इमारतीच्या चौथ्या माळ्याच्या गॅलरीचा काही भाग कोसळला. ही इमारत म्हाडाच्या अखत्यारीत येत आहे. या घटनेत त्यात खुशमा खातुल (३०) आणि नाझिया खान (३५) जखमी झाल्या. त्यांना नायर रुग्णालयात दाखल केले असून, खुशमाची प्रकृती स्थिर, तर नाझियाची प्रकृती गंभीर आहे.

१५ ठिकाणी शॉर्टसकिंट शहरात ९, पूर्व उपनगरात २, पश्चिम उपनगरात ४, अशा एकूण १५ ठिकाणी शॉर्टसर्किट झाल्याच्या तक्रारी आपत्कालीन विभागाकडे आल्या. मात्र, या घटनांमध्ये कुणीही जखमी झाले नाही.

# महापालिकेच्या कचरा उचलणाऱ्या वाहनाच्या धडकेत डिलिव्हरी बॉय ठार

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

मुंबईतील अंधेरी पश्चिम परिसरात महापालिकेच्या कचरा उचलणाऱ्या वाहनाने दुचाकीला दिलेल्या धडकेत एका डिलिव्हरी बॉयचा मृत्यू झाला. मंगळवारी रात्री नऊ वाजताच्या सुमारास हा अपघात झाला. याप्रकरणी महापालिकेच्या चालकाला अटक करण्यात आली.

अजीम झमीनुल शेखचा असे अपघातात मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. तो गोरेगाव पश्चिमेतील ग्रीनलँड हायस्कूलसमोरील शहीद भगतसिंग नगर येथील रहिवासी असून एका खाजगी कंपनीत डिलिव्हरी बॉय म्हणून काम करत होता. मिळालेल्या माहितीनुसार, अजीम हा दुचाकीने अंधेरी पश्चिमेतील वेस्टर्नबाउंड येथील वालावलकर गार्डनजवळील मस्जिद अल सलाम चौकासमोरून जात असताना महापालिकेच्या कचरा उचलणाऱ्या वाहनाने त्याला धडक दिली. या अपघातात अजीम गंभीर जखमी झाला. त्याला तात्काळ कूपर रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

घटनास्थळी पोहोचल्यानंतर आणि प्राथमिक तपासणी केल्यानंतर पोलिसांनी महापालिकेचा चालक प्रकाश नानकू यादव (वय, ४०) याला अटक केली. बेपर्वाईने गाडी चालवून मृत्यू घडवल्याच्या आरोपाखाली त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नंतर त्याला जामिनावर सोडण्यात आले.

# वेळेपूर्वीच मान्सून दाखल झाला असला तरी पावसाळी उपाययोजनांमध्ये परिस्थितीनुरुप सुधारणा करुन अधिक वेग द्यावा

## महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले निर्देश

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

महानगरपालिकेने केलेल्या नियोजनानुसार पावसाळापूर्व कामे वेगाने सुरु असतानाच, दरवर्षीच्या तुलनेत पंधरवड्यापूर्वीच मान्सूनचे मुंबईत आगमन झाले आहे. परिणामी नाले स्वच्छता, रस्ते व इतर कामांवर देखील काहीसा परिणाम झाला, ही वस्तुस्थिती आहे. असे असले तरी नागरी सेवा-सुविधांची सर्वोच्च प्राथमिकता लक्षात घेता पावसाळी उपाययोजनांमध्ये परिस्थितीनुरुप योग्य सुधारणा कराव्यात, उपाययोजनांना जास्तीत-जास्त वेग द्यावा. सर्व कार्यवाहीमध्ये सजग राहून वेगाने कामे पूर्ण करावीत व यंत्रणा सुसज्ज ठेवावी, असे निर्देश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत.

सततच्या व जोरदार पावसामुळे मुंबईत दोन दिवसांपूर्वी उद्भवलेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने, महानगरपालिकेच्या पावसाळी कामांचा महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी आज (दिनांक २८ मे २०२५) फेरआढावा घेतला. त्यावेळी त्यांनी यंत्रणेला विविध निर्देश दिले. महानगरपालिका मुख्यालयात झालेल्या या बैठकीस अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर, सर्व संबंधित सहआयुक्त, उपआयुक्त, सहायक आयुक्त तसेच



संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महानगरपालिका आयुक्त गगराणी म्हणाले की, प्रतिवर्षाच्या तुलनेत मुंबईत यंदा पंधरा दिवस आधीच मान्सून दाखल झाला आहे. प्रारंभीच अतिशय जोरदार पावसामुळे महानगरपालिकेच्या कामांवर काहीसा परिणाम झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे. विशेषतः नाल्यांमधून गाळ उपसण्याच्या कामांमध्ये अडथळा निर्माण झाला आहे. असे असले तरी पावसाळी कामांचा वेग कोणत्याही परिस्थितीत कमी होऊ नये, यासाठी आधीच्या नियोजनामध्ये योग्य त्या सुधारणा कराव्यात, आवश्यक ते बदल अंगीकारावेत. नदी - नाल्यांमधून गाळ उपसा करण्याची कामे पुढील आठ ते दहा दिवसांमध्ये पूर्ण करावीत, असे महानगरपालिका आयुक्त महोदयांनी नमूद केले.

सखल व अतिसखल भागांमध्ये तसेच जोरदार पावसावेळी पाणी साचू शकेल, अशा सर्व संभाव्य ठिकाणांवर मिळून ४१४ उदंचन संच लावण्याचे नियोजन यंदा केले आहे. त्यानुसार, सर्व ठिकाणी उदंचन संच (पंप सेट) बसविण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे, याची खातरजमा करावी. उदंचन यंत्रणा स्थापन करुन ती कार्यान्वित करण्याची कार्यवाही पुढील २४ तासात पूर्ण करावी. ही यंत्रणा सुरळीतपणे कार्यरत आहे, हे तपासण्यासाठी त्याची योग्य ती चाचणी घ्यावी. संपूर्ण कार्यवाही पूर्ततेसाठी आवश्यक त्या स्तरांवर समन्वयाने पाठपुरावा करावा. वाहन आरुढ फिरत्या उदंचन यंत्रणेचे (व्हेईकल माउंटेड मोबाईल पंप) १० संच भाडेकरार (लीज) तत्त्वावर प्राप्त करण्यासाठी कंत्राटदारांना सहमतीपत्र (लेटर ऑफ ॲक्सेप्टन्स) देण्यात आले आहेत. हे संच आठ दिवसांच्या आत उपलब्ध होतील. अणीबाणीच्या प्रसंगी या यंत्रणेचा वापर करता येईल, असे देखील गगराणी यांनी नमूद केले.

पुढे ते म्हणाले की, अतिसखल व सखल परिसरांमध्ये पावसाचे पाणी शक्यतो साचणार नाही, याची सर्वतोपरी काळजी घ्यावी. जोरदार पावसाने पाणी साचताना आढळल्यास त्याचा वेगाने निचरा होईल, यासाठी सजग राहून प्रयत्न करावेत. पावसाळी पाणी साचणारी नवीन ठिकाणे आढळली आहेत, त्या ठिकाणांची संबंधित प्रशासकीय विभागाचे सहाय्यक आयुक्त आणि परिमंडळाचे उपायुक्त यांनी पाहणी करावी. अशी नवीन ठिकाणी का निर्माण झाली त्याची कारणे शोधावीत. त्या ठिकाणांवर करावयाच्या उपायोजना निश्चित कराव्यात, पाणी साचण्याच्या समस्येचे निराकरण करावे, अशी सूचना गगराणी यांनी केली.

हाजीअली, लव्हग्रोव्ह, ब्रिटानिया आदी उदंचन केंद्रांतील पूरनियंत्रण दरवाजे वेळेत व योग्यरीत्या लावण्यात यावेत. दर दोन तासांनी त्यांची उघडझाप करून ते सुस्थितीत कार्यान्वित आहेत, याची माहिती आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाला पुरविण्यात यावी. रस्ते काँक्रिटीकरणातील उर्वरित कामे जलद गतीने पूर्ण करावीत. अपूर्ण राहिलेले रस्ते मास्टिकने पूर्ण करुन वाहतूकयोग्य करावेत. तसेच २४ तासांच्या आत रस्त्यावरील राडारोडा, रस्तारोधक (बॅरिकेड्स) आणि इतर साहित्य काढून ते गोदामांमध्ये न्यावेत. कोणत्याही स्थितीत रस्त्यांवर वाहनांना अडथळा राहणार नाही, याची काळजी घ्यावी. त्याचप्रमाणे, वृक्षांची छाटणीची कामे वेळेत पूर्ण करावीत, इत्यादी निर्देश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक गगराणी यांनी या बैठकीत दिले.

# धारावीला ‘स्मार्ट सिटी’चे रूप!

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

### "पुनर्विकास हे आमचं सामाजिक वचन, धारावी होणार मुंबईतले सर्वात सुनियोजित शहर"

**मुंबई, दि. ३० : प्रतिनिधी**

धारावीची ओळख आता बदलणार! आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी म्हणून ओळखली जाणारी धारावी, लवकरच मुंबईतील सर्वात सुनियोजित पुनर्वसित शहर म्हणून नावारूपाला येणार आहे. हा फक्त विकास नव्हे, तर धारावीकरांच्या जीवनशैलीतील ऐतिहासिक परिवर्तन असणार आहे, असे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथिगृहात धारावी पुनर्विकासाचा आढावा घेण्यात आला. त्या बैठकीनंतर शिंदे म्हणाले, “धारावीचा पुनर्विकास हे आमचं सामाजिक वचन आहे. हे केवळ घरे बांधण्याचे काम नाही, तर रोजगार, शिक्षण, आरोग्य व सामाजिक सलोखा निर्माण करणारा हा प्रकल्प ‘स्मार्ट मुंबई’च्या दिशेने एक ऐतिहासिक टप्पा आहे.”

**राज्य सरकारचा २०% आणि अदानी समूहाचा ८०% हिस्सा**

७२,००० युनिट्सचे पुनर्वसन — यामध्ये ४९,८३२ निवासी, १२,४५८ व्यावसायिक युनिट्स

**६ लाखांहून अधिक संभाव्य लाभार्थी**

**मुलभूत सुविधा आणि स्मार्ट प्लॅनिंग**

धारावीतील एकूण २५३ हेक्टरपैकी १७४ हेक्टर क्षेत्रफळ पुनर्विकासासाठी वापरण्यात येणार आहे. डिजिटल ट्विन टेक्नॉलॉजी, टेनेट मॅनेजमेंट सिस्टीम, ड्रोन आणि लिडार सर्व्हेद्वारे अचूक आणि पारदर्शक



काम सुरू आहे.

**७९,४५५ घरांचे सर्वेक्षण पूर्ण**

३८,००० चौ.मी.हून अधिक जागेत शाळा, आरोग्य केंद्र, पोलीस चौक्या, बाजारपेठा, ग्रंथालयं यांचा समावेश

१०८.९९ हेक्टर जमिनीचा स्मार्ट विकास

मल्टी-मोडल ट्रान्सिट हब व मेट्रो लाईन ११ ची थेट जोडणी

**सर्व धर्मांना समवेत घेणारा विकास**

धारावीतील २९६ धार्मिक स्थळांचा पुनर्विकास कायद्याच्या चौकटीत व सल्ल्यानुसार केला जाणार आहे. यासाठी माजी मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती गठित करण्यात आली आहे.

**"केवळ घर नाही, नव्या जीवनशैलीचं स्वप्न पूर्ण करणार"-शिंदे**

"धारावीकरांना हक्काचं घर देण्याबरोबरच त्यांना नव्या जीवनशैलीत सामावून घेणं हे आमचं ध्येय आहे. हे स्वप्न नाही, तर आमचं सामाजिक वचन आहे," असं सांगत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धारावी पुनर्विकासाबाबतची शासनाची कटिबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित केली.

'कसं काय पाटील, बरं हाय का, काल काय ऐकलं ते खरं हाय का?' या गाण्याने तमाशातील तमासगीर महिला नाचत असताना, समोर बसलेला पाटील आपल्या मिशीला ताव देऊन डोक्यावरील फेटा हवेत भिरकावत असतो. तसेच खूश होऊन तोंडात बोट घालून शीळ फुंकतो, नोटांचा पाऊस तमासगीर महिलेच्या अंगावर पाडत असतो. कारण आपल्या नृत्यशैलीने व अदाकारीने तिने पाटलाचे मन जिंकलेले असते. पण बैलासमोर एक 'पाटलीण' नाचून पैसे मिळवित असेल, तर अशी पाटलीण आपल्याला नको आहे. होय, मला त्या कार्यक्रमाचे पूर्ण पैसे मिळाले होते. त्यावेळीही माझ्या टीमचा हगवणेंशी संबंध आला होता. बाकी प्रकरणाशी माझा काही संबंध नव्हता, असे तमासगीर गौतमी पाटीलचे वाक्य खरे आहे, त्याबद्दल दुमत नाही. पण अशी ही नाचणारी पाटलीण पाटलांपुढे किंवा कुणापुढेही नाचली असती तर तिच्या कलेला मानले असते. पण एका महिलेचा बळी घेणाऱ्या एका 'मानवी बैला'ने तिला चक्क बैलापुढे नाचायला लावले आणि पैशासाठी तीही खुशाल नाचते हे मात्र पटले नाही. उद्या पैसे फेकून कुत्र्यांची फौज आणून कुत्र्यासमोर देखील नाचायला लावतील. मग पैशासाठी कुत्र्यांसमोर देखील नाचायचे का? राज्यात सध्या वैष्णवी हगवणे प्रकरण गाजत आहे. वैष्णवी प्रकरणात रोज नवनवे खुलासे होत असताना काही दिवसांपूर्वी एक व्हिडीओ व्हायरल झाला होता. या व्हिडीओत राजेंद्र हगवणे यांनी आपल्या बैलाच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात गौतमी पाटील चक्क बैलासमोर नाचली होती. हगवणे कुटुंबासोबत माझा संबंध फक्त त्या कार्यक्रमापुरता मर्यादित होता. मी एक कलाकार आहे. कलाकाराने एखादा प्रोग्राम केला म्हणून लगेच त्याचा पुढील घटनांशी जोडणं अतिशय चुकीचं आहे, हे तिचे म्हणणे योग्यच आहे. पण तिची कला पाहण्यासाठी जर तिला बैलापुढे नाचावे लागत असेल, तर त्या कलेला अर्थ तरी काय राहिला?
या पूर्वी यापूर्वी गौतमी पाटील हिचा कार्यक्रम यशाच्या शिखरावर गेल्यानंतर तिच्या या 'पाटील' आडनावाला काहींनी आक्षेप घेतला होता. त्यावेळी समाजातील सर्वांनी तिला पाठिंबा देऊन तिच्या कलेला मान दिला होता. पण तिला बैलांपुढे नाचताना पाहून 'हीच का ती सुंदर अदाकारी सादर करणारी गौतमी पाटील?' हा आता मात्र प्रश्न पडला. नाचणारी महिला कोण असेल? तिची जात काय असेल? तिचे आडनाव काय असेल? याची फिकीर गादीवर बसलेल्या व तक्क्याला रेललेल्या पाटलाला कशी काय असणार? कारण शेवटी तो पाटील असतो. पण नाचणारी बाईच 'पाटलीण' असेल, तर हाच 'पाटील' मागे बिघडायला लागला होता. याचा अर्थ समाजाने काय घ्यावा? नाचणाऱ्या बायका बघताना विविध जातीतील पुरुषांना कधीच काही वाटले नाही. पण मागे एकदा एक 'पाटील' आडनावाची बाई नाचते, म्हणून एका गावच्या पाटलांनी आकांडतांडव केला होता. आता तर पाटलीण चक्क बैलापुढेच नाचते, मग आता काय करणार? याचाच अर्थ असा की, नाचणारी बाई आम्हाला पाहिजेच, पण ती 'पाटलीण' नको. ती कोणत्याही जातिधर्माची चालेल, पण आपल्या जातीची कधीच असता कामा नये. तिने माणसांपुढेच काय जनावरांपुढे नाचले तरी चालेल, पण ती पाटलीण नसावी. निदान तिचे आडनाव तरी 'पाटील' नको आहे. आता या पाटलाला कोण सांगणार की, माणसाला जात असते, पण त्या माणसाच्या पोटाला जात नसते.







# बैलापुढे नाचणाऱ्या 'पाटलीणीची कला' काय कामाची?

मुळातच जुन्या काळापासून पाटलाची एक स्वतंत्र प्रतिमा आहे. तमाशाप्रधान चित्रपटाने ती अधिक ठसठशीत केली. त्यामुळे बायका कुणी नाचवाव्यात तर पाटलांनीच, असे म्हटले जायचे; परंतु आता पाटील नावाची बाई बैलापुढे नाचते म्हटल्यानंतर पाटलांचा अहंकार का दुखावला नाही?

म्हणूनच गौतमी पाटील नाचायला चालेल, पण तिने तिचे आडनाव नेमके काय आहे, याचा पंचनामा करायला पाटील सरसावले होते. त्यामुळेच निदान तिने आडनाव तरी बदलावे, अशी अजब मागणी करून काही पाटलांनी आपल्या मिशीला ताव दिला होता. वर्षभरापूर्वी गौतमी पाटीलने आपले पाटील आडनाव बदलावे म्हणून काही पाटलांनी आकांडतांडव केले होते. समजा, गौतमीने पाटील आडनाव बदलून दुसरे काहीही लावले तरी त्याने फरक काय पडणार होता?

तिच्या पोटासाठी तिला नाचावे लागणारच आहे. स्त्रियांच्या बाजूने विचार करणाऱ्या प्रत्येकाने याबाबतीत विचार केला पाहिजे की, आडनाव बदलण्याची मागणी योग्य वाटते का? ही कोणत्या प्रकारची मानसिकता? जी बाई दररोज आपल्यासमोर नाचते, तिने आजही नाचलेच पाहिजे, उद्याही नाचलेच पाहिजे, फक्त आडनाव बदलले पाहिजे. अशा प्रकारची मागणी फक्त जात्यंध लोकच करू शकतात. आपल्या दिलखेचक अदांनी तरुणांना घायाळ करणारी व राज्यभर प्रत्येक कार्यक्रम 'हाउसफुल' गर्दीने खेचणारी ही 'पाटलीण' अचानक वादात का सापडावी? तर तिने बैलासमोर केलेले नृत्य होय.

विशेष म्हणजे हगवणे नावाच्या एका पाटलानेच दिला भरपूर पैसे देऊन आपल्या बैलाच्या समोर नाचविले व ती देखील नाचली. गौतमीचा कार्यक्रम अन् राडा झाला नाही, असे कधीच झाले नाही. पण यात तिचा दोष काय? पोलिसांचे कामही वाढू लागले आहे, हे मान्य करावेच लागेल. त्यांनाही लाठीमार केल्याशिवाय राहवत नाही.

तरुणाई पागल झाल्यासारखी दिसते. त्यामुळे पाटील नावाभोवती वादळ निर्माण करण्याचा प्रयत्न झाला होता. आडनाव बदलून काय साध्य होणार आहे? एखाद्या बाईला पुरुषी वासनेसाठी नाचावे लागणे, हेच मुळापासून बंद व्हावे, असे सर्वच पुरुषांना का वाटत नाही? 'पाटील' आडनावाच्या बाईने नाचू नये, असे एखाद्या 'पाटला'ला वाटत असेल, तर त्या पाटील बाईची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी या पाटलांनी पुढे यायला काय हरकत आहे?

निदान तिच्यावर नाचून पोट भरायची वेळ तरी येणार नाही. पाटील नाव लावू नये, असे म्हणणेच मुळात वेडेपणा ठरला होता. पाटील आडनाव लावू नये अशी मागणी काही संघटनांकडून मागे झाली होती. अनेक पुरोगामी संघटनांकडून त्यास विरोधही झाला होता. कारण पाटील ही एक उपाधी असून, पाटील, इनामदार, सरपोतदार, देशपांडे, कुलकर्णी, नाडकर्णी, देसाई ही जुन्या काळात गावं सांभाळणारी माणसे होती.

पूर्वी अशीच आडनावे होती. या आडनावांमुळे अनेकदा गफलत झाल्याचे प्रकारही घडले आहेत. त्यामुळे पाटील हे आडनाव कुठल्याही जातीची मक्तेदारी समजण्याचे काहीच कारण नाही. आता प्रश्न गौतमी पाटीलचे आडनाव पाटील का? पाटील असेल तर तिने नाचावे का? माणसं समोर नसताना आता बैलाच्या समोर देखील नाचावे का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.



थर्ड अम्पायर

जयंत महाजन

jayantmahajansir@gmail.com

मोबा. ९४२०६९१४२०

मुळात मुद्दा नाचण्याचा नाही, तर मुद्दा पुरुषसत्तेचा आहे. या सर्व प्रकारामुळेच आपल्या देशात बलात्कारित स्त्रीकडेसुद्धा अशाच घाणेरड्या पद्धतीने बघतात. तिची जात शोधतात आणि मग काय काय करायचे, हे ठरवतात. अनेक ठिकाणी तर दुसऱ्या जातीच्या बाईवर अत्याचार झाला तर यांना काहीच वाटत नाही.

आपल्या जातीच्या बाईवर तिच्या जातीपेक्षा खालच्या जातीच्या पुरुषाने अत्याचार केला असेल, तर मग वस्त्या जाळायला हे मोकळे. आडनाव बदलून नाचा असे ज्या बाईला सांगितले जात आहे, तिनेसुद्धा याबाबत स्पष्टपणे व्यक्त व्हायला हवे. 'सबसे कातिल गौतमी पाटील' अशी टॅगलाइन तिच्याबाबतीत वापरताना लोकांना मजा येते. गौतमीचे आडनाव पाटील नसेलही, पण ती माणूस तर आहे ना?

पाटील आडनावालाच काही संघटनांनी विरोध केला होता, तरी त्याला काहीही अर्थ नाही. गौतमीचे खरे आडनाव पाटील नसून 'चाबुकस्वार' आहे. पण तिची कला तर स्वतःचीच आहे ना?

या कलेमुळेच तिला महिन्याकाठी पाच-पन्नास लाख रुपये मिळतात. सर्वसामान्य घरातील महिलेला केवळ तिच्या कलेमुळे पैसा मिळत असेल, तर लोकांचा पोटशूळ का उठावा? आता गौतमीनेही 'मी पाटीलच आहे आणि हे नाव मी वापरणारच,' असे बाणेदार उत्तर दिल्यामुळे अनेकांचा मुखभंग झाला असेल.

पण खरं कारण म्हणजे तिच्या कार्यक्रमांना होणारी गर्दी काही थांबायचे नाव घेत नाही. पण तिला पैशाचा हव्यास इतका वाढला की, आपली कला, आपली अदाकारी बैलांपुढे, कुत्र्यापुढे सादर करू नये. मला फक्त पैशाचीच घेणे आहे ही तिची वृत्ती मात्र समाजाला खटकली आहे.

एवढा प्रचंड पैसा मिळत असताना प्राण्यांपुढे नाचायला लावत लावले जात असेल, तर त्या कलेला तरी काय अर्थ आहे? गौतमी पाटीलला समाजाने नेहमी पाठिंबा दिला. पत्रकारही तिच्या पाठीशी ठाम उभे राहिले होते. परंतु वैष्णवी प्रकरणातील हगवणे परिवारातील मानवी बैलांनी तिला 'बैला'पुढे नाचवून तिची प्रतिष्ठा देखील मातीमोल करून टाकली!

## गौतमीची पैशाची 'हाव' व हगवणेंचा पैशाचा 'माज'

संपूर्ण महाराष्ट्राला वेड लावणारी डान्सर गौतमी पाटीलची क्रेझ दिवसेंदिवस वाढत चालली होती. गौतमी पाटीलनं तिच्या डान्सनं साऱ्यांना आपल्या तालावर नाचवलं. महाराष्ट्रात प्रत्येक ठिकाणी तिची एक झलक पाहण्यासाठी पाहण्यासाठी तुफान गर्दी होते. त्यामुळे गौतमी या ना त्या कारणामुळे कायमच चर्चेत असते. गौतमीला फॉलो करणाऱ्यांची आणि कार्यक्रमांना गर्दी करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. तिच्या कार्यक्रमात तरुण बेभान होऊन डान्स करतात. तरी तिच्या कार्यक्रमांची गर्दी काही कमी होत नाही.काही ठिकाणी तिच्या कार्यक्रमाला विरोध होतो, तर काही ठिकाणी अबालवृद्धांपासून सगळेच तिच्यासोबत ठेका धरतात. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात गौतमीचा मोठा चाहता वर्ग आहे. छोट्या गावातही गौतमी पाटीलच्या डान्सची क्रेझ पाहायला मिळते. हजारोंच्या संख्येने प्रेक्षक गौतमीच्या कार्यक्रमाला येतात. तरुण बेभान होऊन नाचतात. गौतमीच्या कार्यक्रमात नेहमी गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. काही ठिकाणी पोलीस देखील बोलवावे लागतात. गौतमी पाटील ही लावणीच्या नावाखाली अश्लील डान्स करत असल्याचा आरोप तिच्यावर करण्यात येतो. तिच्या आडनावावरूनही वाद सुरु झाला होता. त्यावेळी रसिकांनी व समाजाने तिची पाठराखण केली होती. आता वैष्णवी हगवणे प्रकरणात तिने हगवणे परिवाराच्या माजमौजेसाठी चक्क बैलापुढे नृत्य सादर केले होते. अर्थात 'हे' प्रकरण घडण्यापूर्वीची ती घटना आहे. पण या निमित्ताने गौतमीची पैशाची 'हाव' व हगवणे परिवाराला असलेला पैशाचा 'माज' समाजापुढे आला.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर



आज ३१ मे, आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती. ३०० वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चोंडी या गावी माणकोजी व सुशिलाबाई शिंदे या दाम्पत्यापोटी अहिल्यादेविंचा जन्म झाला.

अतिशय छोट्या आणि सामान्य कुटूंबात जन्मलेल्या अहिल्यादेवी यांनी इतिहासात मानाचे स्थान प्राप्त केले आहे. ज्या काळात स्त्रियांना शिक्षणास बंदी होती, चूल आणि मूल हेच स्त्रियांचे जीवन होते, स्त्रियांनी घराचा उंबरठा ओलांडणे म्हणजे पाप समजले जात त्याकाळात त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहायला, वाचायला शिकवले. मराठ्यांच्या इतिहासातील पराक्रमी समजल्या जाणाऱ्या होळकर घराण्यातील सुभेदार खंडेराव होळकर यांच्याशी वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा विवाह झाला.

खंडेरावांपासून त्यांना मालेराव आणि मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. पण वयाच्या अवघ्या २८ व्या वर्षी त्यांना वैधव्यास सामोरे जावे लागले. पती खंडेराव हे कुंभेरीच्या लढाईत धारातीर्थी पडल्यावर त्यावेळच्या सनातनी लोकांनी त्यांच्यावर सती जाण्यासाठी दबाव आणला पण सासरे सरदार मल्हारराव होळकर यांनी या अमानवी, सनातनी परंपरेला विरोध करून अहिल्यादेवींना सती जाण्यापासून परावृत्त केले. आपल्या सासऱ्यांच्या इच्छेनुसार त्यांनी सती जाण्याचा विचार सोडून दिला.

अहिल्यादेवींची राजकीय कारकीर्द तेंव्हापासूनच सुरू झाली. खंडेरावांची जागा अहील्यादेवींनी घेतली. मल्हारराव देशभर मोहिमांवर व्यस्त असत त्यावेळी मल्हारराव आणि अहिल्यादेवींमध्ये पत्रव्यवहार होत. सासरा - सुनेमधील पत्रव्यवहार हा अहिल्यादेवींच्या राजकीय विचारकतेचा उत्कृष्ट नमुना होय. मोहीमेवर असताना मल्हारराव प्रजा रक्षणाच्या सूचना अहिल्यादेवींना जसे देताना दिसतात तसेच अहिल्यादेवी आपल्या सासऱ्यांना देताना दिसतात. सासरा सुनेचे ऐकल असा तो काळ नव्हता....आता ही नाही...

पण मल्हाररावांसारखा मुत्सद्दी अहिल्यादेवींचा सल्ला अंमलात आणत यावरुनच अहिल्यादेवींची योग्यता लक्षात येते. मल्हारराव मोहिमेवर असत तेंव्हा स्वतः अहिल्यादेवी राज्याचा बंदोबस्त चोख राखीत. मल्हाररावांच्या सूचनेप्रमाणे त्या कारभार करीत. १७६६ साली मल्हाररावांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

दरम्यानच्या काळात अहिल्यादेवींनी स्त्रियांना लष्करी प्रशिक्षण देणारे महाविद्यालय सुरू केले. ज्या काळात स्त्रियांना घराबाहेर पडायला बंदी होती त्याकाळात त्यांनी स्वतःची ५०० महिलांची पलटण उभी केली. अहिल्यादेवींचे प्रशासन ब्रिटिशांनाही आदर्शभूत ठरले.

सर्व देशात जेंव्हा दांडगाईचे राज्य होते, कोणाचा कोणाला पायपोस नव्हता त्याकाळात सुरळीत चालणारे एकमेव राज्य म्हणजे अहिल्यादेवींचे राज्य. अहिल्यादेवी या दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपारायण व कार्यक्षम राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जात असल्या तरी त्यांची राज्यकारभारावर प्रशासकीय पकड घट्ट होती. त्यांच्या वडिलांनी लहानपणी दिलेल्या शिकवणुकीचा आणि सासरे मल्हारराव यांनी दिलेल्या राजकीय कारभाराच्या तालमीचा त्यांना उपयोग झाला.

त्या सामान्य कुटुंबातील असल्यामुळे त्यांना प्रजेच्या अडीअडचणीची जाणीव होती. त्यांचे राहणे अतिशय साधे व सात्विक होते म्हणूनच त्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे नाव पडले. अहिल्यादेवींनी देशभर भ्रमंती केली. देशभ्रमण करताना तिर्थक्षेत्रांच्या जागी त्यांनी धर्मशाळा बांधल्या. शेकडो मंदिरांचा जिर्णोद्धार केला.

जवळपास २८ वर्ष त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालवला. कोणतेही कर्ज न काढता राज्याची तिजोरी भक्कम करून त्यांनी प्रजाहिताकडे लक्ष दिले. आदर्श राज्यकारभार कसा करावा याचा वस्तुपाठच अहिल्यादेवींनी घालून दिला. अहिल्यादेवी होळकर हे नाव इतिहासात अमर झाले.

बाई काय राज्यकारभार करणार ही सनातनी अटकळ त्यांनी खोटी ठरवली. १३ ऑगस्ट १७९५ रोजी अहिल्यादेवींचे निधन झाले. प्रजाहितदक्ष, आदर्श राजकर्ती म्हणून इतिहासात अजरामर झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार

दौंड. जिल्हा पुणे.

९९२२५४६२९५

■ ■ ■

## हा दुजाभाव का?

वाचक लिहितात

संविधानातील तरतुदीनुसार धार्मिक संस्थाना देणगी देण्यापासून कोणलाही रोखता येणार नाही. जसे हिंदू आपल्या मंदिरांना देणगी देतात तसे अन्य पंथीय देखील आपल्या प्रार्थना स्थळांना देणग्या देत असतात. या देणग्या अनेकदा परदेशातूनही येतात. देणगीरूपाने दिले जाणारे धन हे धार्मिक कार्यासाठी वापरले जावे ही भावना त्या प्रत्येक अर्पण दात्यांची असते. पूर्वीचे राजे-महाराजे आपल्या मिळकतीचा काही भाग मंदिरांना अर्पण स्वरूपात देत असत आणि मंदिरे या धनातून राज्यातील मुलांच्या व्यवहारिक, धार्मिक आणि युद्धकलेच्या शिक्षणासाठी गुरुकुल चालवत, गोशाळांत गोमातांचे संवर्धन करत. राजाच्या आणि जनतेच्या कल्याणासाठी यज्ञयागादी विधी करत. धर्माने आखून दिलेली ही जीवनपद्धती युगोनुयुगे सुरु होती यातूनच काही प्राचीन मंदिरे आजही धनधान्याने समृद्ध आहेत.

मंदिरांच्या या समृद्धतेचा लाभ घेत सरकारने देशातील जवळपास सर्वच प्रमुख मंदिरे 'मंदिर अधिग्रहण कायद्या'च्या गोंडस नावाखाली ताब्यात घेतली आहेत. या मंदिरांवर सरकारी अधिकारी नेमले आहेत. जनतेने आपल्या मिळकतीचा काही भाग कररूपाने सरकारला द्यावा आणि सरकारने या कराच्या पैशातून जनतेला सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात याच मूळ सूत्रावर लोकशाही शासन प्रणाली आधारलेली असताना अनेक ठिकाणची राज्य सरकारे मंदिरांतील धनाचा वापर सरकारी योजनांसाठी हवा तसा करत आहेत. देशावरील कजार्बाबत जेव्हा जेव्हा चर्चा होते तेव्हा देशातील माजलेल्या भ्रष्टाचाराबाबत साधे ब्र न काढता मंदिरांची संपत्ती ताब्यात घेण्याची भाषा काही महाभागंकडून केली जाते. आज देशभरातील लाखो मंदिरे सरकारच्या ताब्यात आहेत, मात्र अन्य धर्मियांची किती प्रार्थनास्थळे आणि शैक्षणिक संस्था सरकारने अधिग्रहित केल्या आहेत ? त्यांनाही वर्षभरात कोट्यवधींच्या देणग्या मिळत असतात मग त्यांच्यावर सरकारचे लक्ष का नाही? देशाने पंथ निरपेक्ष शासनप्रणालीचा स्वीकार केला असताना समाजातील केवळ बहुसंख्य वर्गावर अन्याय का?

■ लीना गाडगीळ, पनवेल.

# तंबाखूमुळे वाढतोय मुख कर्करोगाच्या विळखा

भारतामध्ये कोरडी पाने, सिगारेट, विडी, चिलम, गुटखा आदी अशा विविध रुपात तंबाखू सेवन केले जाते. देशात दरवर्षी रस्ता किंवा अपघातात ५० हजार लोक मृत्युमुखी पडतात मात्र तंबाखूमुळे साधारणतः १० लाख लोक मरण पावतात, दर ५ व्यक्तीमधील १ व्यक्तीच्या मरणाचे कारण तंबाखू आहे.

तंबाखू सेवनामुळे अनेक प्रकारचे रोग जडतात आणि त्याचा मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम दिसून येतात. यामध्ये अथरोस्कोलोरोसिस, हार्ट अटॅक, पेरिफेरल वॅस्कुलर डिसिज, ब्रेन स्ट्रोक, अॅम्पायसिमा लंग कॅन्सर, फिटल डॅमेज, लॅरिंजियल कॅन्सर, डेंटल प्रॉब्लम, ल्यूकोप्लाकिया, ओरल सबम्युकोसल फायब्रोसिस, ओरल कॅन्सर तसेच प्रति दिवशी २० सिगारेट ओढणारा व्यक्ती आपले आयुष्य १० वर्षांनी कमी करून घेतो.

गुटखा खाणाऱ्या व्यक्तीमध्ये तोंड उघडणे लवकर बंद होणे, वारंवार तोंड येणे, तोंडात लाल व पांढरे चट्टे दिसणे, जेवण करताना तिखट लागणे, तोंड कमी उघडणे, तोंडातील एखादी जखम एक महिन्यापेक्षा जास्त न बसणे, तोंडात एखादी अनावश्यक गाठ आढळणे, जिभेला असणारी एखादी गाठ होणे, आवाजात झालेला बदल, लाळग्रंथीच्या जागेवर असलेली सूज येणे, आदी लक्षणे हळूहळू दिसून येतात. यासाठी तज्ज्ञाकडून तपासणी करून घेणे अत्यावश्यक ठरते.

तंबाखूमुक्त भारत ही संकल्पना तंबाखू प्रतिबंधात्मक केंद्राच्या माध्यमातून राबवित असून, भारतातील हे पहिले केंद्र आहे. तंबाखू दिनानिमित्त तंबाखू त्यागाचा संकल्प करावा.

**तंबाखूमधील विषारी द्रव व त्याचे शरीरावर होणारे परिणाम**

निकोटिन : कॅन्सर, रक्तचाप.
कार्बन मोनोक्साईड : हृदयरोग, अंधत्व, दमा.
मार्श गॅस : शक्तिहीनता, नपुंसकता.
अमोनिया : मंद पाचनशक्ती, पित्ताशय विकृती.
कोलोडॉन : स्नायूंमध्ये विकृती, डोके दुखणे.
पापरीडीन : अजीर्ण, डोळ्यांची जळजळ.
कार्बोलिक अॅसिड : अनिद्रा, विस्मरण.
परफेरॉलः अशक्तपणा.
अँजेलिन सायनोझोन : रक्तविकार.
फॉस्फोरल प्रोटिक अॅसिड : उदासीनता, टीबी

अशा आजारांची लागण होऊन त्याचे शरीरावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

योग करून आपल्या मनाचा कठोर निश्चय करा व संकल्प शक्ती वाढवून या नशेचा परित्याग करा. उपचार म्हणून शस्त्रक्रिया, किमोथेरपी, रेडिओथेरपी, तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन केल्यास कर्करोग होतो पण वेळेस उपचार केल्यास बरा होऊ शकतो. सध्या तंबाखू व पान खाऊन थुंकल्यास कोरोना पण वाढू शकतो.

---------------

**डॉ. योगेश साहू**


सदस्य,राष्ट्रीय तंबाखू निर्मूलन समिती

अध्यक्ष, इंडियन डेंटल असोसिएशन

संस्थापक : डॉ. साहू तंबाखू प्रतिबंधात्मक केंद्र,

अध्यक्ष, लोकसेवा संघ, अकोला.

■ ■ ■



## झटपट वजन कमी करण्यासाठी फॉलो करा या तज्ज्ञांच्या सोप्या ट्रिक्स

बदलत्या जीवनशैलीमुळे ताणतणाव वाढत असून, जीवनशैलीशी संबंधित समस्याही वाढत आहेत. लठ्ठपणा हे याचे मुख्य कारण आहे, जे हृदय आणि मेंदूच्या आजारांना देखील आमंत्रण देते. ते कमी करण्यासाठी लोक खूप मेहनत करतात, पण त्यांना यश येत नाही.

जास्त प्रमाणात जंक फूडचे सेवन केल्यामुळे गंभीर परिणाम होऊ शकतात. आरोग्याची योग्य पद्धतीनं काळजी घेण्यासाठी आहाराकडे विशेष पद्धतीनं लक्ष देण्याची गरज असते. आहारामध्ये पोषक तत्वं नाही खाल्ल्यामुळे गंभीर आजार होण्याची शक्यता असते.

वाढलेल्या वजनामुळे मधुमेह आणि उच्च रक्तदाब यांच्या सारख्या समस्या उद्भवू शकतात. वजन कमी करण्यासाठी अनेक प्रयत्न केले जातात. वजन कमी करण्यासाठी तज्ज्ञांकडून अनेक मार्ग सुचवले आहेत जे ३० दिवसांत वजन कमी करण्यास मदत करेल.

हळद-काळी मिरी गोळी :

हळद-काळी मिरीची गोळी तयार करण्यासाठी अर्धा चमचा हळद आणि एक चतुर्थांश चमचा काळी मिरी पावडर घ्या. तयार मिश्रण १० मिनिटे पाण्यात चांगले उकळवा. तयार मिश्रण पुन्हा गाळून घ्या आणि कोमट होईपर्यंत सोडा. आता त्यात लिंबाचा रस मिसळा आणि ते प्या.

तज्ज्ञांनी सांगितलेले उपाय केल्यास शरीरातील सर्व वेदना आणि कडकपणा नाहीसा होईल. पोट फुगणे आणि आम्लपित्त या समस्यांपासून आराम मिळेल . चयापचय जलद होईल आणि वजन वेगाने कमी होईल. याशिवाय यकृत देखील स्वच्छ होईल आणि कोलेस्टेरॉलची पातळी देखील नियंत्रित राहील.

एक सुपर ड्रिंक सर्वकाही करू शकत नाही. जसे की निरोगी संतुलित आहार, नियमित शारीरिक हालचाली, चांगली झोप आणि योग्य प्रमाणात पाणी पिणे. रमिता कौर यांनी कमेंट बॉक्समध्ये याबद्दल माहिती दिली आहे. तुम्ही ते सकाळी रिकाम्या पोटी किंवा झोपण्यापूर्वी ३० मिनिटे घेऊ शकता. यामुळे फायदा नक्की होईल.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा

मेहकर

(९४२१३९४३३९)



### त - तंबाखूचा...!

गाढव सुद्धा
खात नाही तंबाखू
आम्ही मात्र
खातो फुकू फुकू..

आमची चॉईस
हाय लई भारी
कॅन्सर येतो भौ
आपसुक दारी..!!

कुटुंबावर असेल प्रेम तर
तंबाखुला द्या तिलांजली
अन्यथा दुर्दैवाने द्यावी लागेल
तारूण्यातच श्रद्धांजली!!

# प्रत्येकी ३ भारतीय व्यक्तीपैकी १ जण पेय म्हणून करतो दूधाचे सेवन

**दिल्ली, ३० मे :** जागतिक दूध दिनाच्या निमित्ताने, गोदरेज जर्सीने 'बॉटम्स अप... इंडिया सेज चिअर्स टू मिल्क!' या अहवालाद्वारे भारतीय ग्राहकांच्या बदलत्या पसंतींचा गौरव केला आहे. या निष्कर्षांनुसार, दर तीनपैकी एक भारतीय व्यक्ती पेय म्हणून दूधाचे सेवन करते.

जोडीला, ५० % भारतीय ग्राहक फ्लेवर्ड दूध पिणे पसंत करतात किंवा घरी दूधात फ्लेवर मिसळून मग ते दूध पितात. भारतीय पालकही आता मोठ्या प्रमाणात फ्लेवर्ड दूध हे पोषणमूल्यपूर्ण, सोयीचे आणि आनंददायक पेय म्हणून आपल्या मुलांना देऊ लागले आहेत. दिवसभरात ४५% पालक तर ४४% खेळाच्या वेळेत फ्लेवर्ड दूध हे एक रिफ्रेशिंग पर्याय म्हणून मुलांना देतात.

या निष्कर्षांवर भाष्य करताना गोदरेज जर्सीचे मुख्य कार्यकारी अधिकारी भूपेंद्र सुरी म्हणाले, गोदरेज जर्सीमध्ये आम्ही ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहोत. चव, ताजेपणा आणि पोषण यांचा समतोल राखून, ब्रँड नवीन पिढीसाठी दूध म्हणजे काय याची व्याख्या नव्याने करत आहे. गोदरेज जर्सी बदाम दूध हे केवळ चवीलाच आनंद देणारे नसून एक आरोग्यदायी, संपूर्ण पोषण देणारा पर्याय आहे. फक्त वर्ल्ड मिल्क डेपुरताच मर्यादित नाही तर हे दूध दररोज पिण्यासाठी योग्य पेय आहे.

भारत जसजशी अधिक सजग आणि जाणिवपूर्वक वापर करणारी संस्कृती स्वीकारतो आहे, तसतशी दुधाबाबतची धारणा बदलते आहे. आता केवळ परंपरेपुरते मर्यादित न राहता आधुनिक जीवनशैलीशी सुसंगत अशा नाविन्यपूर्णतेपर्यंत हे पोहोचले आहे. गोदरेज जर्सी या बदलाचे नेतृत्व करत असून, परंपरेला नव्या कल्पनांशी जोडून दूध हे दररोजच्या पोषणाचा एक महत्त्वाचा भाग बनवत आहे, असेही ते म्हणाले.

बॉटम्स अप.. इंडिया सेज चीयर्स टू मिल्क या शीर्षकाखाली झालेल्या सर्वेक्षणात दिल्ली, मुंबई, हैदराबाद आणि चेन्नई यांसारख्या प्रमुख शहरांमधून माहिती गोळा करण्यात आली. त्यात दुग्धजन्य पदार्थांना असलेली पसंती आणि गुणवत्तेची अपेक्षा यावर लक्ष केंद्रित केले गेले.

# शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर येथे मध्य भारतातील पहिली टोटल एन्डोस्कोपिक माइट्रल व्हॉल्व रिप्लेसमेंट सर्जरी यशस्वीपणे पार पडली

**नागपूर, ३० मे :** मध्य भारतातील हृदयविकार उपचारांमध्ये एक ऐतिहासिक टप्पा गाठत, नागपूर येथील वानाडोंगरी स्थित १०२० बेडेड शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर(एसएमएचआरसी) येथे दिनांक २१ मे २०२५ रोजी मध्य भारतातील पहिली टोटल एन्डोस्कोपिक माइट्रल व्हॉल्व रिप्लेसमेंट सर्जरी यशस्वीरित्या पार पडली. ही ऍडव्हान्स आणि मिनिमलि इन्व्हिसिव्ह शस्त्रक्रिया डॉ. सुम्बुल सिद्दिकी व त्यांच्या कार्डियोव्हॅस्क्युलर आणि थोरासिक सर्जरी (सीव्हीटीएस) टीमने पार पाडली, जी प्रदेशातील हृदयशस्त्रक्रिया कौशल्यांमधील एक महत्त्वपूर्ण यश आहे. संस्थेच्या अधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेत ही माहिती दिली.



ही केवळ तांत्रिकदृष्ट्या मिळालेल्या यशाची गोष्ट नाही ही आमची बांधिलकी दर्शवणारी यशोगाथा आहे, असे डीएमआयएचईआर (डीयू) चे ऑफ-कॅम्पस संचालक डॉ. अनुप मरार यांनी सांगितले. एसएमएचआरसीमध्ये आम्ही फक्त प्रगत उपचार उपलब्ध करून देत नाही, तर ते सहज, परवडणारे आणि रुग्ण-केंद्रित असावेत यासाठी प्रयत्न करतो. या शस्त्रक्रियेस केवळ शस्त्रक्रिया कौशल्य नव्हे तर अनेक शाखांमधील समन्वय, तांत्रिक अचूकता आणि अमोघ मानवी करुणा यांची गरज होती आणि आमच्या टीमने सर्वच पातळ्यांवर उत्कृष्ट कामगिरी बजावली.

टोटल एन्डोस्कोपिक माइट्रल व्हॉल्व रिप्लेसमेंट सर्जरी ही एक अत्यंत स्पेशलाईझ आणि मिनिमलि इन्व्हिसिव्ह शस्त्रक्रिया आहे जी रोबोटिक तंत्रज्ञानाइतकी अचूकता देते, परंतु त्यासाठी सर्जनच्या हातातील कौशल्य, अनुभव आणि सर्जरी करताना डोळे आणि हातांचा अचूक समन्वय अत्यंत महत्त्वाचा असतो. छातीमध्ये मोठ्या चिरा न मारता ही प्रक्रिया रुग्णांना कमी वेदना, कमी जखमा आणि लवकर बरे होण्याचा मार्ग देते. ही केवळ एक शस्त्रक्रिया नव्हती; ही अनेक विभागांच्या एकत्रित कार्यक्षमतेची चुणूक होती, ज्याने हृदयविकार उपचारामध्ये नवीन मापदंड निर्माण केला, असे डॉ. मरार म्हणाले.

डॉ. अनुप मरार म्हणाले, या यशाने कार्डियाक सर्जरीचे भविष्य दाखवून दिले आहे जे केवळ मिनिमलि इन्व्हिसिव्ह शस्त्रक्रिया नसून, मॅक्झिमली इम्पॅक्टफुल उपचारांचा आदर्श आहे. जेव्हा कौशल्य, संघबांधणी, तंत्रज्ञान आणि सार्वजनिक सेवेशी असलेली बांधिलकी एकत्र येते, तेव्हा अशा गोष्टी शक्य होतात.

या ऐतिहासिक कामगिरीने, श्री सागर मेघे यांच्या नेतृत्वाखाली आणि श्री दत्ताजी मेघे यांच्या दूरदृष्टीतून उभारलेल्या एसएमएचआरसीने पुन्हा एकदा सिद्ध केले की, ही संस्था अत्यंत क्लिष्ट, रुग्णस्नेही, परवडणारी आणि करुणेने भरलेली आरोग्यसेवा पुरवणारी अग्रगण्य संस्था आहे. या पत्रकार परिषदेस श्री अमित दास, डॉ. नुरूल अमीन आणि श्री संकेत सुरकर यांची उपस्थिती होती.

# कलाकारांनी यंदा वर्ल्ड बायसिकल डे निमित्त सायकल चालवण्याचा आनंद व फायद्यांबाबत सांगितले!



**मुंबई, ३० मे :** जागतिक सायकल दिनानिमित्त एण्ड टीव्ही कलाकार जुन्या आठवणींना उजाळा देत आहेत, तसेच तंदुरूस्त राहण्यासाठी सायकल चालवणे किती फायदेशीर ठरू शकते याबाबत सांगत आहेत. सायकल चालवणे छंद, आवड आणि दैनंदिन धावपळीच्या जीवनामधून अर्थपूर्ण विरंगुळा आहे. बालपणीच्या आठवणी, स्वातंत्र्य, सर्जनशीलता असो किंवा मनाला मिळणारा आराम असो हे कलाकार आपल्याला आठवण करून देतात की सायकल चालवणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. हे कलाकार आहेत विक्रम द्विवेदी (विशंभर सिंग, 'भीमा'), आर्यन प्रजापती (ऋतिक सिंग, 'हप्पू की उलटन पलटन') आणि आसिफ शेख (विभुती मिश्रा, 'भाबीजी घर पर है'). मालिका 'भीमा'मधील विक्रम द्विवेदी ऊर्फ विशंभर सिंग म्हणाले, ''सायकल चालवणे माझ्यासाठी विरंगुळा आहे. अभिनेता असल्याने मला सतत क्रिएटिव्ह राहण्याची गरज आहे. सकाळी लवकर सायकल चालवल्याने माझे मन उत्साहित राहते आणि नवनवीन संकल्पना सुचवतात. हे फक्त वर्कआऊट नाही, तर माझ्यासाठी विचार करण्याचे साधन आहे. मी आठवड्यातून ४ ते ५ वेळा ३० ते ४० मिनिटे सायकल चालवतो आणि त्यामधून मला स्क्रिन्सपासून दूर होत निसर्गामध्ये सामावून जाण्यास मदत होते. पेडल मारण्याचा रिदम, थंडगार हवा आणि खुले रस्ते मन प्रसन्न करतात. तसेच कार्बनचे प्रमाण कमी करण्याचा हा उत्तम मार्ग आहे. अशा लहान सवयीचा मोठा परिणाम घडून येऊ शकतो.''

# मालिका 'हप्पू की उलटन पलटन' आणि 'भाबीजी घर पर है'मधील पात्रांना पुष्पा क्रेझने पछाडले



**मुंबई, ३० मे :** असे वाटते की, मालिका 'हप्पू की उलटन पलटन' आणि 'भाबीजी घर पर है'मध्ये 'पुष्पा'ची क्रेझ पसरली आहे. पुष्पा राजचे प्रबळ व्यक्तिमत्त्व आणि स्वॅगमधून प्रेरित होत या लोकप्रिय एण्ड टीव्ही मालिकांच्या पात्रांमध्ये नाट्यमय बदल होतात, ज्यामुळे त्यांचे कुटुंबिय व प्रेक्षक अचंबित होतील. प्रेक्षक त्यांच्या टेलिव्हिजन स्क्रिन्सपाशी खिळून राहतील हे निश्चित. एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन'च्या आगामी एपिसोडबाबत कटोरी अम्मा ऊर्फ हिमानी शिवपुरी म्हणाल्या, ''राजेश (गीतांजली मिश्रा) हप्पूवर (योगेश त्रिपाठी) नाराज आहे आणि त्याची कानउघडणी करण्यासाठी मोहकपणे आमिष दाखवते! त्यांच्या भांडणामुळे दुखावलेला बेनी (विश्वनाथ चॅटर्जी) त्यांच्यापासून दूर जात चित्रपट पाहण्यास जातो, ज्यामुळे त्याचे वर्तन अनपेक्षितपणे बदलते. दरम्यान, कटोरी अम्माला (हिमानी शिवपुरी) देखील तोच चित्रपट पाहायचा असतो, पण तिकिटे मिळत नाहीत. हप्पू तिकिटे मिळवण्याचा प्रयत्न करतो, पण अपयशी ठरतो, तर मनोहर (नितीन जाधव) त्याची पत्नी आणि सासूसाठी सहजपणे तिकिटे मिळवतो, ज्यामुळे हप्पूला लाज वाटते. त्याच्या दुःखात अधिक भर म्हणजे एक स्थानिक सायकलस्वार त्याला त्रास देत राहतो आणि हप्पू त्याला प्रतिकार करण्याचे धाडस करू शकत नाही. मनोहर कमिशनरच्या मनात हप्पूविरोधात कानभरणी करतो तेव्हा परिस्थिती आणखी बिकट होते आणि हप्पूला स्टेशनवर 'मुर्गा' बनण्याची शिक्षा केली जाते. त्याच वेळी, शाळेतील शिक्षक मुलांच्या वाईट गोष्टींबद्दल तक्रार करण्यासाठी येतो आणि हप्पू कसा तरी त्याला शांत करतो. नंतर, तो बेनीकडे जातो, जो त्याला तोच चित्रपट दाखवतो. चित्रपटाचा हप्पूवर खोलवर परिणाम होतो. हप्पू अचानक बदलतो! तो राजेशला शिव्या देतो, अम्माला घरामध्ये बंद करतो, मनोहरवर डाव उलटवतो, हृतिकला (आर्यन प्रजापती) थर्ड डिग्री चौकशीसाठी पोलिस स्टेशनमध्ये घेऊन जातो आणि सायकलस्वाराला मारहाण करतो. त्याच्या नवीन आक्रमक अवताराने सर्वांना धक्का बसतो. कुटुंबातील लोक घाबरून सैरावैरा पळू लागतात. राजेश आणि अवधेशिया (उर्मिला शर्मा) बेनीला पकडतात, जो सर्वकाही कबूल करतो. ते हप्पूला सामान्य स्थितीत परत येण्याची विनंती करतात, पण तो नकार देतो.''

# मॅक्स फॅशन यंदाच्या उन्हाळ्यासाठी सादर करत आहेत डिस्नेच्या लिलो अँण्ड स्टिचची प्रेरणा असलेले ट्रॉपिकल कलेक्शन



**नागपूर, ३० मे :** डिस्नेच्या बहूप्रतिक्षित लिलो अँण्ड स्टिचच्या चित्रपटगृहातील प्रदर्शनाच्या पार्श्वभूमीवर मॅक्स फॅशनने मुले, किशोरवयीन आणि तरुणांसाठी त्यांचे नवे कलेक्शन सादर केले आहे. या नव्या आकर्षक कलेक्शनमध्ये बेटांवरील उत्साह आणि ट्रॉपिकल प्रदेशातील सौंदर्य सुंदररित्या एकत्र करत सर्वांसाठीच फार आकर्षक आणि फ्रेश स्टाइल सादर केली आहे.

आम्ही साधारण दशकभरापूर्वी डिस्ने थीम असलेले कलेक्शन पहिल्यांदा सादर केले आणि डिस्नेच्या कालातीत कथांनी आम्हाला कायमच प्रेरणा दिली आहे, असे मॅक्स फॅशनचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुमीत चंद्रा म्हणाले. क्लासिक सिनेमांची प्रेरणा असल्याने आमचे छोटे ग्राहक या कलेक्शनसोबत मोठ्या प्रमाणावर जोडले जातात. आमचे नवे लिलो अँण्ड स्टीचथीमचे कलेक्शन म्हणजे डिस्नेसोबतच्या दमदार सर्जनशील सहकार्याचे प्रतिबिंब आहे.

ट्रेंडी आणि वाजवी दरातील कपड्यांसाठी लोकप्रिय मॅक्स फॅशन या आघाडीच्या फॅशन ब्रँडने मुंबईत मेगुमी येथे एका उत्साही कार्यक्रमात हे नवे कलेक्शन सादर केले. यावेळी काही मॉम इन्फ्लुएन्सर्स आणि त्यांच्या मुलांना गमतीशीर फॅशन वॉकच्या माध्यमातून या सिनेमातील बेटावरचा उत्साह जणू कार्यक्रमात भरला. अभिनेत्री बिपाशा बसू यांनी शोस्टॉपर म्हणून या कलेक्शनच्या आकर्षक स्टाइलवर भर देत कार्यक्रमात बहार आणली. सिनेमाची प्रेरणा असलेल्या आकर्षक बाबी, ठळक प्रिंट्स आणि केशरी, ब्रीझी ब्लू, रिफ्रेशिंग ग्रीन्स आणि ड्रीमी पेस्टल्स अशा सुंदर उन्हाळी रंगातील या कपड्यांमधील स्टाइलवर या कार्यक्रमात भर देण्यात आला होता.

या नव्या कलेक्शनच्या सादरीकरणातून मॅक्स फॅशनच्या डिस्ने कन्झ्युमर प्रोडक्ट्स इंडियासोबतच्या वे सहकार्य आकारास आले आहे. डिस्नेच्या जंगल बुक, डिस्ने प्रिन्सेस, स्टार वॉर्स, मार्वलसचे गार्डियन्स ऑफ गॅलक्सी आणि अशा इतर गोष्टींची प्रेरणा याआधीच्या कलेक्शनमध्ये दिसली आहे. प्रत्येकालाच आवडतील अशी लोकप्रिय उत्पादने सातत्याने देत या अशा प्रत्येक कलेक्शनमधून मॅक्स फॅशनने कॅरेक्टर थीम कलेक्शनच्या बाजारपेठेत आपले महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे.

# फ्लिपकार्टकडून ग्लॅम अप फेस्ट २०२५ चे आयोजन

**नागपूर, ३० मे :** फ्लिपकार्टकडून भारतातील सर्वात मोठा सौंदर्य आणि लाइफस्टाइल उपक्रम असलेल्या ग्लॅम अप फेस्ट २०२५ च्या तिसऱ्या आवृत्तीचे आयोजन ६ आणि ७ जून रोजी नेस्को, गोरेगाव, मुंबई येथे करणार आहे. हा कार्यक्रम दोन दिवस चालेल. त्यात देशभरातील ६,०००+ इन्फ्लुएन्सर्स आणि निर्मात्यांसह १००+ आघाडीचे ब्युटी, सौंदर्यप्रसाधने आणि के-ब्युटी ब्रँड सहभागी होतील. सौंदर्य, नावीन्यपूर्णता आणि कंटेंटचा एक दिमाखदार उत्सव म्हणून आयोजित करण्यात आलेल्या ग्लॅम अप फेस्ट २०२५ के-ब्युटीमध्ये फ्लिपकार्टचे नेतृत्व मजबूत करतो. त्यात व्यापक ब्रँड अनुभव, नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून संशोधन आणि ग्राहक सक्रियता यांचा समावेश आहे.

फ्लिपकार्टच्या एफएमसीजी आणि जनरल मर्चंडाईजच्या व्यवसाय प्रमुख मंजरी सिंघल म्हणाल्या, भारतातील सर्वात मोठ्या सौंदर्य महोत्सव असलेल्या ग्लॅम अप फेस्ट २०२५ च्या तिसऱ्या आवृत्तीसह आम्ही भारतात सौंदर्याचा शोध, अनुभव आणि खरेदी यांना आकार देत आहोत. तंत्रज्ञान, विश्वास आणि आकांक्षा एकत्र आणणारा हा एकात्मिक, उत्तम दर्जाचा अनुभव देण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. हा उपक्रम सौंदर्यप्रसाधने अधिक सुलभ बनवण्यासाठी के-ब्युटीसह नवनवीन ट्रेंड्स आणि आकर्षक अनुभव लाखो ग्राहकांपर्यंत आनंददायी पद्धतीने आणण्यासाठी आमची दृष्टी आणि सातत्यपूर्ण वचनबद्धता प्रतिबिंबित करतो.

या दोन दिवसांच्या महोत्सवात ग्लॅम अप फेस्ट २०२५ द्वारे कथाकथन, ब्रँड व ग्राहकांमधील मजबूत भागीदारी आणि प्रत्येकासाठी एक चांगला अनुभव मिळेल. या महोत्सवामुळे ग्राहक, निर्माते आणि माध्यमांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण होईल अशी अपेक्षा आहे. त्यामुळे सौंदर्य क्षेत्रात फ्लिपकार्टचे नेतृत्व आणखी मजबूत होईल. या महोत्सवानंतर ६ जून ते १० जून दरम्यान एक विशेष इन-ॲप ग्लॅम अप सेल आयोजित केला जाईल. त्यात देशभरातील फ्लिपकार्ट खरेदीदारांसाठी मर्यादित काळासाठी डील, उत्पादनांच्या सवलती आणि क्युरेटेड ब्युटी कलेक्शन्स उपलब्ध असतील.

# अदानी पोर्ट्सने सर्वात मोठे देशांतर्गत बाँड जारी ५००० कोटींचे १५ वर्षांचे एनसीडी



**अहमदाबाद, ३० मे :** अदानी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेड (एपीएसईझेड), भारतातील सर्वात मोठी एकात्मिक ट्रान्सपोर्ट युटिलिटी कंपनीने १५ वर्षांच्या नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर्स द्वारे ५,००० कोटी रुपये यशस्वीरित्या उभारले आहेत. एपीएसईझेडच्या मजबूत आर्थिक स्थितीवर आणि एएए/स्टेबल देशांतर्गत क्रेडिट रेटिंगवर आधारित या बाँडला ७.७५% वार्षिक व्याजदर मिळाला असून, ते पूर्णपणे एलआयसी कडून सबस्क्राइब करण्यात आले आहेत. हे डिबेंचर्स बीएसईवर सूचीबद्ध होतील.

या बाँड इश्यूमुळे एपीएसईझेडला विविध स्रोतांमधून आकर्षक दराने दीर्घकालीन भांडवल मिळवण्याची क्षमता सिद्ध झाली असून, कंपनीच्या कर्जाच्या परतफेडीचा कालावधी लक्षणीयरित्या वाढवण्यात आला आहे. ही आतापर्यंतची कंपनीची सर्वात जास्त मुदतीची देशांतर्गत बाँड इश्यू आहे आणि भारतीय भांडवली बाजाराच्या इतिहासातीलही एक दीर्घ मुदतीचा बाँड मानला जातो आहे. या निधीचा वापर एपीएसईझेडच्या यूएस डॉलर बाँड बायबॅकसाठी करण्यात येणार आहे, जो कंपनीच्या बोर्डच्या ३१ मे २०२५ रोजीच्या मंजुरीच्या अधीन आहे. या पूर्ण सदस्यतेमुळे कंपनीच्या कर्ज परतफेडीची सरासरी मुदत ४.८ वर्षांवरून ६.२ वर्षांपर्यंत वाढेल.

हे केवळ आर्थिक व्यवहार नाही, तर एपीएसईझेडच्या बारकाईने तयार केलेल्या कॅपिटल मॅनेजमेंट प्लॅन ची सक्रिय अंमलबजावणी आहे. या योजनेचा उद्देश मितव्ययी कर्जप्रणाली टिकवून ठेवणे, कर्ज परतफेडीचा कालावधी वाढवणे, खर्च कमी करणे आणि वित्तपुरवठ्याचे स्रोत अधिक विविध करणे हा आहे. ही योजना एपीएसईझेडच्या जगातील सर्वात मोठी एकात्मिक ट्रान्सपोर्ट युटिलिटी बनण्याच्या दीर्घकालीन दृष्टीकोनाला आधार देते, असे एपीएसईझेड चे संपूर्ण वेळ संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अश्वनी गुप्ता यांनी सांगितले.

# शब्बीर अहलूवालिया आणि आशी सिंह हे दोघे मिळून तुम्हाला उफ्फ ये लव है मुश्किल ...चा अनुभव देतील



**मुंबई, ३० मे :** हलक्या-फुलक्या विषयावरील आणि कौटुंबिक मनोरंजन प्रदान करणाऱ्या मालिका सादर करण्याबद्दल ओळखली जाणारी सोनी सब ही वाहिनी आता आपल्या प्रेक्षकांसाठी एक रॉम-कॉम कौटुंबिक मालिका घेऊन येत आहे उफ्फ ये लव है मुश्किल .... सोनी सबच्या संचात एक आल्हाददायक झुळूक घेऊन येणाऱ्या या मालिकेच्या केंद्रस्थानी युग सिन्हा (शब्बीर अहलूवालिया) आणि कैरी शर्मा (आशी सिंह) या दोन विरुद्ध वृत्तीच्या व्यक्तिरेखा आहेत, ज्या अगदी वेगवेगळ्या विश्वातून आल्या आहेत आणि एका गुंतागुंतीच्या परिस्थितीने त्यांना एकत्र आणले आहे. शब्बीर अहलूवालिया हा लोकप्रिय अभिनेता यावेळी आपल्या नेहमीच्या आदर्श भूमिकांपेक्षा वेगळी अशी युग ही व्यक्तिरेखा साकारत आहे. युगचा स्वभाव गुंतागुंतीचा असून तो स्त्री द्वेष्टा आहे. त्याच्या स्थितप्रज्ञ मुखवट्याच्या मागे त्याच्यातला हळवेपणा दडला आहे. दुसरीकडे भारतीय टेलिव्हिजनवर आपल्या अभिनयाने नाव कमावणारी आशी सिंह प्रेमळ आणि उत्साहाने सळसळणारी कैरी ही व्यक्तिरेखा घेऊन येत आहे. ती मनमोकळी आहे आणि आशावादाने जीवनाकडे बघणारी मुलगी आहे.

अत्यंत बुद्धिमान, प्रतिष्ठित पण अंतर्मुख स्वभावाचा वकील युग सिन्हा आणि स्वप्ने बघणारी, प्रेमाच्या ताकदीवर आणि नियतीवर विश्वास असलेली महत्त्वाकांक्षी कैरी शर्मा यांची एक मोहक गोष्ट आहे. भूतकाळाच्या जखमा घेऊन वावरणारा युग नात्यांमध्ये सावधगिरी बाळगायला शिकला आहे तरी कैरी मात्र खुल्या दिलाने आणि अढळ सकारात्मकतेने जीवनाला सामोरी जाते. युग आणि कैरी आपापल्या गोंधळ घालणाऱ्या भावंडांमुळे संपर्कात आले आहेत. अशा दोन ध्रुवांवर राहणारे युग आणि कैरी आपसातील मतभेदांवर मात करून काही अर्थपूर्ण नाते शोधू शकतील का?

# शगुन पांडे शिरत आहे टीचर रूपात, सांगत आहे वेदच्या भूमिकेसाठीचा आपला गृहपाठ!

**मुंबई, ३० मे :** झी टीव्हीवरील आगामी मालिका सरू स्क्रीनवर राजस्थानमधील खारेस गावातीलएका दृढनिश्चयी तरूण मुलीची प्रेरणादायक कथा घेऊन येते, जी उच्च शिक्षणासाठी सामाजिक बंधनांना झुगारण्याचे धाडस दाखवते. ही शक्तीशाली आणि महत्त्वाकांक्षी कथा जिवंत करत आहे सरुच्या रूपात मोहक मटकर आणि तिच्यासोबत दिसून येणार आहे वेदच्या रूपात आकर्षक शगुन पांडे. ह्या दोन्ही कलाकारांनी आपापल्या व्यक्तिरेखांना सच्चाई प्रदान करण्यासाठी भरपूर मेहनत घेतलीआहे, केवळ आपल्या परफॉर्मन्सच्या माध्यमातून नव्हे तर ह्या क्षेत्रातील संस्कृती आणि चैतन्यामध्ये त्यांनी स्वतःला न्हाऊन घेतले.


मोहकने सरूचा निर्धार आणि निरागसता उत्तम टिपली असून शगुन आपल्या आधीच्या भूमिकांच्या तुलनेत ह्या मालिकेत एका विचारशील आणि शांत अशा प्राध्यापक वेदच्या रूपात दिसून येईल. तो इंग्रजी हा विषय शिकवतो. आपल्या उच्च ऊर्जा प्रदर्शनासाठी मानल्या जाणाऱ्या शगुनला ह्या भूमिकेच्या माध्यमातून हुशार आणि विनम्र व्यक्तिमत्त्वाच्या वेदची व्यक्तिरेखा साकारण्यासाठी शगुनला मुद्दाम आपला आवाज, देहबोली आणि एकूणच उपस्थितीमध्ये मोठा बदल घडवावा लागला. त्याच्या ह्या तयारीचे वेगळेपण म्हणजे आपल्या क्लासरूममधील दृश्यामध्ये त्याने आणलेली खोली. केवळ कथानकातील संवादांसह तो समाधानी नव्हता,त्यामुळे त्याने स्वतः विद्यार्थ्यांसाठी लेक्चरची तयारी केली, काय शिकवायचे, कसे शिकवायचे आणि कसे सादर करायचे हे त्याने स्वतः काळजीपूर्वकपणे ठरवले. त्याचा उद्देश्य अगदी साधा होता की ते खरोखरचे लेक्चर वाटावे, केवळ टीव्हीवरील एखादे दृश्य नव्हे.

# सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मध्ये पुष्पाचा कायद्याचा अभ्यास करण्याचा निर्धार

**मुंबई, ३० मे :** पुष्पाच्या हृदयस्पर्शी आणि संबद्ध कथानकामुळे सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिका प्रेक्षकांच्या मनात ठाण मांडून बसली आहे. मालिकेच्या कथानकात आता एक दमदार आणि प्रेरणादायक वळण येत आहे. पुष्पा (करुणा पांडे) तिच्या जीवनातील एका महत्त्वाच्या क्रॉसरोड्सवर उभी आहे आणि येथून ती कायद्याचा अभ्यास करण्याचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दिशेने वळणार आहे. या महत्त्वाच्या टप्प्यावर प्रोफेसर राजवीर (गौरव चोप्रा)च्या एंट्रीमुळे तिच्या प्रवासाला एक नाट्यमय कलाटणी मिळालेली दिसेल. आता तिच्यापुढे नवीन आव्हाने आणि अनपेक्षित भावनिक खळबळ असेल.

आगामी भागांमध्ये, निवृत्त झालेला शिपाई घनश्याम (मुकुल श्रीवास्तव) याला मदत करण्याच्या पुष्पाची योजना उलटल्यामुळे तिला थोडे मागे हटावे लागले आहे. त्यात दिलीप (जयेश मोरे) आणि बापोद्रा (जयेश भारभाया) यांना अटक झाली आहे. घनश्यामला तर पेन्शन मिळते, पण पुष्पावर मात्र कादंबरी (वृंदा त्रिवेदी) मोठा आळ घेते. जुगल (अंशुल त्रिवेदी) सोबत पुष्पाची वाढती घनिष्ठता कादंबरीला आवडत नाही, आणि ती चिराग (दर्शन गुर्जर) विरुद्ध एक कट रचते. या सगळ्या भावनिक गोंधळात, प्रोफेसर राजवीर शास्त्रीचे हे विधान की, कायदा हा सामर्थ्यवान लोकांसाठी असतो पुष्पाला हादरवून सोडते.

# शब्दकोडे क्रमांक २१२४



**आडवे शब्द :-**


१) पाषाण
३) भयानक
६) जिम्मेदार
१०) बेदाणा
११) क्षुद्र, नीच, तेजोहीन
१३) धपाटा
१४) व्यय
१५) प्रभात
१७) नाला, ओढ्यावरील कच्चा पूल
१९) मत्सर
२०) घर
२३) वकिलाचे काम
२५) मातृभाषा
२७) हाडांचा सापळा
२९) दुर्योधनाचा जिवलग मित्र
३०) दरवाजा
३२) दैव
३४) समतल
३६) पंख
३७) विश्व
४१) सोन्याचा धागा
४२) गाय
४३) पाहुणचार,
४६) गाण्याची बैठक
४८) सीमा, मर्यादा
५०) माया, प्रेम
५१) श्वासोच्छ्वास
५२) सिंह
५४) लोक, प्रजा
५६) माल साठविण्याची जागा
५८) नीच, पाषाणहृदयी
६०) पाणी
६१) भुट्टा
६२) मनाचा झालेला ग्रह
६३) लक्ष्मीचे एक नाव
६५) हाक
६६) दावा लावणारा, वैरी
६७) कबूतर
६९) साय
७०) घागरा
७२) शृंगार(ग्रा )
७४) पत्र
७५) मिठी
७६) पातक
७७) शोध
८०) अंकुर
८१) आश्रय
८२) इंद्रिय, घटक
८३) एक प्रश्नार्थक शब्द
८४) कशा प्रकारचा, बटवा

**उभे शब्दः -**

१) कोवळ्या दुधाचा (चिकाचा) गोड पदार्थ
२) राजीवनयन
३) उजाड, खिन्न, ओसाड
४) ललाट
५) दारूचा एक प्रकार
७) पायविहीर
८) कलंक, डाग
९) पहारेकरी
१२) पृथ्वी
१६) शरीर
१८) विद्या
१९) हट्ट
२१) एक श्वासरोग
२२) नातेवाईक
२३) रंग
२४) होडी
२६) नम्र, वाकलेला
२७) भोळा
२८) मच्छर
२९) कारस्थान
३१) संध्याकाळ
३३) धमनी
३५) बासरी
३६) उद्याच्या नंतरचा दिवस
३८) उष्ण
३९) भडीमार
४०) आजच्या आधीचा दिवस
४१) वृद्धत्वाने पीडलेला
४४) धोंग, थाप
४५) भगवान
४६) जन्ममृत्यू
४७) दक्ष
४८) पारा
४९) रात्र
५३) नमन
५५) नमते धोरण
५७) संसद सदस्य
५९) गवंडी
६१) मान, प्रतिष्ठा
६२) शंकराचे एक नाव
६४) तालुक्याचे वसुलीचे काम
६५) एक बैठा खेळ
६७) झाडाभोवतीचा कट्टा
६८) वितरण
७१) खण
७३) गर्दभ
७५) मडके
७६) एक चतुर्थांश भाग
७८) पवित्र
७९) खरगोश, एक प्राणी

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# आज का अंदाज

शनिवार ३१ मे २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ४ | ५ | ७ | ३ | ६ | ७ | ९ |
| ११० | १६७ | १४० | १२४ | १२० | १२३ | १६० | १३५ |
| २०० | २६६ | २५८ | २२३ | २३८ | २६८ | २५० | २३४ |
| ५७० | ३५६ | ३५७ | ३४० | ३०० | ३६७ | ७०० | ४५० |
| २३ | ४१ | ५२ | ७१ | ३१ | ६२ | ७१ | ९२ |
| २४ | ४६ | ५४ | ७४ | ३४ | ६४ | ७४ | ९३ |
| २९ | ४९ | ५९ | ७९ | ३६ | ६९ | ७९ | ९९ |

**३१ मे : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ | ४३ | ६२ | ८४ |
| ३७ | ४६ | ६४ | ८५ |
| ३९ | ४७ | ६८ | ८७ |

# राशीभविष्य

**मेष :** क्रीडा स्पर्धेत तुम्हाला संघर्ष करावा लागेल. यश मिळण्याची शक्यता कमी आहे. व्यवसायावर नीट लक्ष केंद्रित करा. अन्यथा तुमची आर्थिक परिस्थिती बिघडू शकते. आर्थिक क्षेत्रात हळूहळू प्रगती होईल.

**वृषभ :** आज व्यवसायात चांगले उत्पन्न झाल्याने तुम्हाला भरपूर संपत्ती मिळेल. पैशाच्या व्यवहारात विशेष काळजी घ्या. कुटुंबात काही मोठा खर्च येऊ शकतो. पण, तरतूद होऊ शकेल.

**मिथुन :** अजिबात ताण घेऊ नका. गाडी हळू चालवा नाहीतर त्रास होऊ शकतो. कामाच्या शोधता असलेल्यांना रोजगार मिळेल. आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल. प्रलंबित राहिलेले पैसे मिळतील.

**कर्क :** पैशाच्या व्यवहारात सावधगिरी बाळगा. लग्नाच्या कामात येणारे अडथळे आज मित्रांच्या मदतीने दूर होतील. प्रेमसंबंधांमध्ये सुरू असलेल्या समस्या दूर होतील. मनामध्ये आनंद वाढेल.

**सिंह :** कामाच्या ठिकाणी एखादा छुपा शत्रू किंवा विरोधक तुमच्यावर हल्ला करू शकतो. कुटुंबात काही शुभ कार्यक्रमाची योजना आखली जाईल. प्रेमसंबंधांमध्ये जवळीकता येईल.

**कन्या :** अनावश्यक खर्च टाळा. आज कामाच्या ठिकाणी अशी घटना घडू शकते ज्यामुळे समाजात तुमचा प्रभाव वाढू शकतो. कोर्टाच्या प्रकरणांमध्ये जवळचा मित्र विशेष मदत करेल.

**तुळ :** आज आरोग्याशी संबंधित किरकोळ समस्या जाणवतील. ताप, डोकेदुखी, अपचन, गॅस यासारख्या आजारांपासून सावध रहा आणि राग टाळा. आजाराने ग्रस्त असलेल्या लोकांनी सावध असले पाहिजे.

**वृश्चिक :** कुटुंबात अशांतता असू शकते. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. पालकांशी काही मतभेद असू शकतात. कौटुंबिक जबाबदाजया पूर्ण करण्याचा शक्य तितका प्रयत्न करा. योग, ध्यान, व्यायाम इत्यादी करत राहा.

**धनु :** आज तुम्ही तुमचे कर्ज फेडण्यात यशस्वी व्हाल. कोणत्याही जुन्या कर्जाची परतफेड केल्याने मोठा दिलासा मिळेल. व्यवसायात केलेली भांडवली गुंतवणूक फायदेशीर ठरेल.

**मकर :** आज व्यवसायात आर्थिक व्यवहार करताना काळजी घ्या. तुमच्या धाडसाने आणि शौर्याने पैशाशी संबंधित कामातील कोणताही अडथळा दूर होईल. व्यवसायात उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न यशस्वी होतील.

**कुंभ :** वैवाहिक जीवनात पती-पत्नीमध्ये कौटुंबिक मतभेद वाढण्याची शक्यता असते. आरोग्याशी संबंधित समस्या कमी होतील. तुमची जीवनशैली सकारात्मक बनवण्याचा प्रयत्न करा.

**मीन :** आज तुमचा दिवस काही चांगल्या बातमीने सुरू होईल. एखाद्या शुभ कार्यक्रमात सहभागी व्हाल. व्यवसायात परिश्रमपूर्वक आणि वेळेवर काम करा. अडथळे दूर होतील.

महासागर



# दापोली-खेड मार्गावर वाहतूक लवकरच पूर्ववत – गृहराज्यमंत्री

## 15 दिवसांत संपूर्ण दुरुस्तीचे आदेश

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

अवकाळी पावसामुळे आणि नैसर्गिक आपत्तीमुळे खंडित झालेला दापोली-खेड मुख्य मार्ग लवकरच नागरिकांसाठी पूर्णतः खुला होणार आहे. राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आज प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना १५ दिवसांत संपूर्ण दुरुस्ती पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश दिले.

दापोली ते खेड या महत्त्वाच्या मार्गाची पाहणी करताना मंत्री कदम यांनी कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला आणि प्रशासकीय यंत्रणेला तत्काळ कामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. सद्यस्थितीत तात्पुरत्या स्वरूपात वाहतूक पूर्ववत करण्यात आली असून नागरिकांची गैरसोय थांबवण्यासाठी तातडीने हालचाली सुरू झाल्या आहेत.

पाहणीवेळी बोलताना गृहराज्यमंत्री कदम म्हणाले, "दापोली आणि खेड तालुक्यांना जोडणारा हा रस्ता ही येथील जनतेची जीवनवाहिनी आहे. या मार्गावरील वाहतुकीत झालेल्या अडथळयामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला, याची मला पूर्ण जाणीव आहे. सध्या रस्ता तात्पुरत्या स्वरूपात सुरू करण्यात आला आहे. मात्र पुढील १५ दिवसांत काम पूर्ण करून नागरिकांना सुरक्षित आणि टिकाऊ मार्ग देण्याचा आमचा निर्धार आहे."

ते पुढे म्हणाले, "राज्य सरकार आणि महायुती सरकार हे केवळ घोषणा करणारे नाहीत, तर कृती करणारे सरकार आहे. नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे आम्ही प्राधान्याने लक्ष देत आहोत. आपत्तीच्या काळात कोणताही भाग दुर्लक्षित राहणार नाही. जनतेच्या सुखदु:खात सरकार सहभागी राहणार आहे."

गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या या तत्काळ हस्तक्षेपामुळे दापोली-खेड मार्गाच्या दुरुस्तीला गती मिळाली आहे. या मार्गाच्या पुनर्बांधणीमुळे हजारो नागरिकांना दिलासा मिळणार असून, स्थानिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. प्रशासन आणि यंत्रणा कामाला लागली असून, लवकरच हा मार्ग पूर्ववत होऊन वाहतुकीसाठी खुला होणार आहे.

# वस्ती पातळीवरील संस्थांच्या सक्षमीकरणासाठी भायखळा येथे एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

मुंबई महानगर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. याचाच एक भाग म्हणून महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन खात्यामार्फत वस्ती पातळीवरील संस्थांच्या सहभागातून सार्वजनिक शौचालयांची देखभाल, दुरुस्ती केली जात आहे. सार्वजनिक स्वच्छतेसाठी प्रशासनासह नागरिकांचादेखील सहभाग आवश्यक आहे. स्थानिक नागरिकांनी वस्ती पातळीवरील संस्थांच्या सक्षमीकरणासाठी व स्वच्छतेसाठी परिसरातील शौचालयांच्या स्वच्छतेसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) श्री. किरण दिघावकर यांनी केले.

समावेशक आणि शाश्वत समुदाय स्वच्छतेसाठी 'समुदाय आधारित संस्था प्रणाली' सक्षमीकरण या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा भायखळा (पूर्व) येथील अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात काल (दिनांक २८ मे २०२५) संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते. वस्ती पातळीवरील संस्थांना (CBO) प्रशिक्षित व सक्षम बनवणे, हा या कार्यशाळेचा उद्देश होता. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था (AIILSG) च्या वरिष्ठ कार्यकारी संचालक श्रीमती उत्कर्षा कवडी, युनिसेफ महाराष्ट्रचे पर्यावरण व आपत्ती निवारण समन्वयक श्री. युसूफ कबीर, हिंदुस्तान युनिलिव्हर कंपनीचे शासन उपक्रमांचे व्यवस्थापक श्री. संदीप शेठ, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाच्या स्वच्छ भारत अभियानाचे (नागरी) संचालक श्री. नवनाथ वाठ आदी यावेळी उपस्थित होते. तसेच वस्ती पातळीवरील विविध संस्था, विकास संस्था, कॉर्पोरेट क्षेत्र इत्यादींचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने या कार्यशाळेत सहभागी झाले होते.

उप आयुक्त किरण दिघावकर म्हणाले की, मुंबईत आजघडीला वस्ती पातळीवरील सुमारे २ हजार ३०० सार्वजनिक शौचालये आहेत. आणखी १ हजार ६०० शौचालयांची उभारणी करण्याचे प्रस्तावित आहे. या सर्व शौचालयांची देखभाल दुरुस्ती महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन खात्यामार्फत वस्ती पातळीवरील संस्थांच्या सहभागातून केली जाते. या संस्थांच्यासोबत




लोकसहभागदेखील वाढणे आवश्यक आहे. प्रत्येकाने यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. कारण वापरकर्त्यांचीही या संस्थांएवढीच जबाबदारी आहे. या जबाबदारीच्या जाणीवेतूनच स्वच्छता राखली जाईल. तसेच स्वच्छतेचा वसा घेऊन कार्य करणाऱ्या समुदाय आधारित संस्था प्रणालीदेखील सक्षम झाल्या पाहिजेत. या सर्व एकत्रित प्रयत्नातूनच मुंबईतील सार्वजनिक शौचालये ही देशात सर्वात स्वच्छ शौचालये म्हणून ओळखली जातील, असा आशावाद श्री. दिघावकर यांनी व्यक्त केला.

या कार्यशाळेत सहभागी झालेल्या विविध सामाजिक संस्थांनी संगणकीय सादरीकरणातून स्वच्छतेचे महत्व आणि वस्ती पातळीवरील संस्थांच्या सक्षमीकरणासाठीच्या उपाययोजनांची, संस्थांच्या माध्यमातून सुरू असलेल्या स्वच्छताविषयक उपक्रमांची माहिती दिली. तसेच प्रत्यक्षात सार्वजनिक शौचालयांची देखभाल आणि दुरूस्ती करत असलेल्या विविध वस्ती पातळीवरील संस्थांनी यशोगाथा सादर केल्या. शौचालयांच्या स्वच्छता कार्यातून परिसरात स्वच्छता राहते. परिसर स्वच्छ राहिल्यामुळे रोगराईंना आळा बसतो. या स्वच्छतेच्या कार्यामुळे अनेकांचे जीवनमान बदलल्याच्या भावना संस्थेत कार्यरत असलेल्या काळजीवाहक (केअर टेकर) प्रतिनिधींनी व्यक्त केल्या. स्वच्छतेच्या या कार्यात बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन कायम आमच्या पाठीमागे खंबीर उभे असल्याचेदेखील अनेकांनी आवर्जून नमूद केले. याबरोबरच गट चर्चेच्या माध्यमातून वस्ती पातळीवरील संस्थांच्या प्रतिनिधींनी स्वच्छतेबाबत सविस्तर चर्चा केली.

# बीडीडी चाळीतील रहिवाशांना श्रावणाआधीच नव्या घरांच्या चाव्या

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

मुंबईच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पात एक महत्त्वाचा टप्पा लवकरच पूर्णत्वास जाणार आहे. बीडीडी चाळीतील रहिवाशांना नव्या घरांच्या चाव्या येत्या श्रावण महिन्याआधीच देण्यात येणार असल्याचे स्पष्ट आश्वासन मुंबई उपनगरचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले आहे.

म्हाडाच्या मुंबई बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद बोरिकर यांनी देखील ही माहिती अधिकृतरीत्या दिली. आज मंत्री शेलार यांनी वरळी बीडीडी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील नव्या टॉवरची पाहणी केली आणि रहिवाशांच्या अडचणी व मागण्यांची प्रत्यक्ष दखल घेतली.

रहिवाशांनी नव्या इमारतींमध्ये पुरेशा पाण्याच्या पुरवठ्याची मागणी केली. त्यावर प्रतिक्रिया देताना मंत्री शेलार यांनी म्हाडा आणि पालिकेच्या अधिकाऱ्यांना "नवीन पाण्याच्या लाईन टाकून प्रत्येक घरात पाणी पोहोचवावे" असे स्पष्ट आदेश दिले. पाईप गॅस आणि इतर मूलभूत सुविधा देखील उपलब्ध करून दिल्या जातील, असे बोरिकर यांनी सांगितले.



> **"बीडीडी चाळ पुनर्विकास केवळ बांधकाम नव्हे, तर हजारो कुटुंबांच्या नव्या स्वप्नांची उभारणी आहे. आमचा प्रयत्न आहे की प्रत्येक रहिवासी आपल्या नव्या घरात अभिमानाने, समाधानाने आणि सुरक्षिततेने राहावा,"**
> **– ॲड. आशिष शेलार, पालकमंत्री, मुंबई उपनगर**

पार्किंगच्या प्रश्नावर समाधानकारक तोडगा काढताना ॲड. शेलार यांनी म्हाडाला निर्देश दिले की, शेजारील दोन जुनी इमारती पाडून तात्पुरते पार्किंग उपलब्ध करून द्यावे. म्हाडानेही या सूचनेला मान्यता दिली असून पार्किंग लॉटरी पद्धतीने दिले जाईल, असे बोरिकर यांनी स्पष्ट केले.

रहिवाशांनी लवकरात लवकर चाव्या मिळाव्यात अशी जोरदार मागणी केली होती. त्यावर बोरिकर यांनी "येत्या श्रावणाच्या आत सर्व रहिवाशांना नव्या घरांच्या चाव्या वितरित केल्या जातील" असे जाहीर केले.पुनर्विकासाची वाट पाहणाऱ्या बीडीडी चाळीतील हजारो कुटुंबांसाठी ही बातमी नवजीवनाची नांदी ठरणार आहे.

सुमारे दोन तास मंत्री शेलार यांनी रहिवाशांशी थेट संवाद साधून त्यांच्या प्रत्येक शंकेला उत्तर दिले. त्यांच्या आश्वासनांमुळे रहिवाशांमध्ये समाधानाचे व आशावादाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात होणार आश्वासनाची पूर्तता

## अधिकाऱ्यांनी हजर राहणे अनिवार्य

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

राज्य विधीमंडळाच्या अधिवेशनात मंत्री, राज्यमंत्र्यांनी बैठक लावण्याचे दिलेले आश्वासन आता याच कालावधीत पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेतला आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित विषयांशी निघडीत अधिकाऱ्यांनी अधिवेशन कालावधीत हजर राहून त्यांची पूर्तता करण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत. या संदर्भातील परिपत्रक गुरूवारी जारी केले.

राज्य विधिमंडळाच्या विविध अधिवेशनात विविध आयुधांवर चर्चा केली जाते. चर्चेच्या वेळी मंत्री, राज्यमंत्र्यांकडून अत्यंत गंभीर अथवा तातडीच्या विषयाबाबत अधिवेशन कालावधीत बैठक घेऊ, असे आश्वासन दिले जाते. परंतु अनेकदा आश्वासनाची पूर्तता होत नाही. काही वेळा विभागाकडून कार्यवृत्त प्राप्त झाल्यानंतर बैठक आयोजित करण्यात येत. लोकप्रतिनिधी सातत्याने याबाबत आवाज उठवल्यानंतर राज्य सरकारने आश्वासन समिती नेमली. या समितीने आता आश्वासनांची पूर्तता केली जाणार आहे. तसेच मंत्री, राज्यमंत्र्यांनी दिलेले आश्वासन पूर्ण करण्यासाठी कार्यवृत्त येण्याची वाट न बघता बैठकीचे आयोजन करावे. जेणेकरून आश्वासनांची पूर्तता करणे आवश्यक आहे, असे राज्य शासनाने परिपत्रकात नमूद केले आहे.

सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांची त्याच कालावधीत पूर्तता होणे ही शासनाची वैधानिक जबाबदारी आहे. त्यामुळे संसदीय कार्य विभागामार्फत मंत्रालयीन विभागातील संपूर्ण अधिवेशन कालावधीत दोन्ही सभागृहांच्या गॅलरीमध्ये त्यांच्या विभागाचे अधिकारी यांनी उपस्थित राहून सभागृहातील मुद्दे, आश्वासने, निर्देश, बैठक घेण्याच्या आश्वासनांची नोंद घेण्याबाबत व त्यानुसार तात्काळ कार्यवाही करणे बंधनकारक केले आहे. काही कारणास्तव बैठक शक्य न झाल्यास पुढील अधिवेशनाच्या बैठकीचे आयोजन करावे, असे ही परिपत्रकात नमूद केले आहे.

# आशासेविका, गटप्रवर्तकांना मानधनापासून वंचित

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या आशासेविका आणि गटप्रवर्तक गेल्या सात महिन्यापासून मानधनापासून वंचित आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी गुरुवारी एक्स या समाजमाध्यमातून आशासेविका आणि गटप्रवर्तकांच्या प्रलंबित मानधनाचा मुद्दा उपस्थित केला.

समाजाच्या आरोग्याची जबाबदारी आपल्या खांद्यावर पेलणाऱ्या आशासेविका आणि गटप्रवर्तकांना गेल्या सात महिन्यांपासून मानधनच मिळालेले नाही. आशासेविका, गटप्रवर्तक या आरोग्यसेवेच्या प्रमुख प्रवाहातील घटक आहेत. या सर्वांचे चरितार्थ त्यांना मिळणाऱ्या मानधनातून चालते. त्यांच्या घरी चूल पेटणार कशी? हा विचार करण्याची संवेदनशीलता सरकारमध्ये राहिली आहे का? वन ट्रिलियन इकॉनॉमींच्या स्वप्नांमध्ये आशा सेविका भगिनींवर अन्याय होतोय, असे पाटील यांनी म्हटले आहे.

राज्यभरातील सर्व आशाताईंना न्याय मिळावा यासाठी आम्ही त्यांच्या मागे खंबीरपणे उभे आहोत. लाडक्या बहिणींच्या लेकरांची उपासमार होऊ नये यासाठी सरकारने रखडलेले मानधन त्वरित द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# अकरावी प्रवेशाचा गोंधळ कायम विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यात अडचणी

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचा चौथ्या दिवशी गोंधळ कायम राहिला. प्रवेशासाठी राज्यभरातील विद्यार्थी अर्ज भरत असून त्यांना अर्ज भरण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. संकेतस्थळ धीम्या गतीने चालणे, लॉगइन आयडी व पासवर्डचे संदेश न येणे, कोणी लॉगइन केले आहे, अस संदेश येणे तसेच अर्जाचा दुसरा भाग सुरूच न होणे अशा अनेक समस्यांनी विद्यार्थी त्रस्त झाले आहेत.

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेला २६ मेपासून सुरुवात झाली. अर्ज नोंदणी करण्याच्या पहिल्याच दिवशी संकेतस्थळ धीम्या गतीने सुरू असल्याने विद्यार्थी व पालकांना त्रासाला सामोरे जावे लागले. तांत्रिक समस्या दूर होण्याची अपेक्षा असलेल्या विद्यार्थी आणि पालकांचा अपेक्षाभंग झाला आहे. प्रथम विद्यार्थ्यांना शुल्क भरण्यास अडचण येत होती. तसेच महाविद्यालयांचे पसंतीक्रम दिसत नव्हते. आता विद्यार्थ्यांना अर्ज नोंदणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या लॉगइन आयडी व पासवर्ड मिळण्यातही अडचणी येत आहे.

विद्यार्थ्यांना लॉगइन आयडी व पासवर्डचा मेसेजच येत नसल्याने त्यांना अर्ज करताच येत नाही. वारंवार प्रयत्न केल्यानंतर अखेर त्यांना मेसेज आलाच तर त्यांचे लॉगइन अन्यत्र सुरू असल्याचा संदेश त्यांना दाखविण्यात येत आहे. तर ज्या विद्यार्थ्यांचा पहिला भाग भरून होत आहे, अशा विद्यार्थ्यांना दुसरा भागच दाखवत नाही. या तांत्रिक अडचणीसाठी हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसादच मिळत नाही. यासंदर्भात शिक्षण संचालक महेश पालकर यांना विचारले असता त्यांनी याबाबत माहिती घेऊन तातडीने कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले.

अर्ज भरण्यात येणाऱ्या अडचणी, हेल्पलाईन क्रमांकावर लवकर मिळत नसलेल्या प्रतिसादामुळे अनेक विद्यार्थी व पालक विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयात तक्रार घेऊन जात आहेत. तेथे तक्रार निवारण्यासाठी उभारलेल्या स्वतंत्र कक्षामध्ये दररोज साधारण ४० ते ५० तक्रारींची नोंद होत आहे. मात्र त्यांच्याकडे प्रवेश प्रक्रियेबाबत कोणतेही अधिकार नसल्याने ते तक्रारी सोडविण्यासाठी हतबल ठरत आहेत. नोंद केलेल्या तक्रारींची माहिती ते पुण्यातील शिक्षण संचालकांच्या कार्यालयाला कळविण्याचे काम करत आहेत.

# 1 हजार 385 रस्त्यांचे काँक्रीटीकरण पूर्ण 5 जूनपर्यंत बॅरिकेड्स हटविणार

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

मुंबईत सोमवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे रस्त्यावर पाणी साचून नागरिकांचे हाल झाले होते. याला अपूर्ण सिमेंट काँक्रीटीकरणाची कामे, रस्त्यावर पडून असलेला राडारोडा आणि साहित्यही कारणीभूत ठरलेली होती, त्यामुळे आता मान्सूनच्या पार्श्वभूमीवर पालिका प्रशासनाने खोदकाम केलेल्या १ हजार ३८५ रस्त्यांचे काँक्रीटीकरण पूर्ण केले असून अशा सर्व रस्ते कामांतील बॅरिकेड्स ५ जूनपर्यंत हटवून रस्ते वाहतुकीस खुले करण्याचे निर्देश महापालिका अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजित बांगर यांनी संबंधित अधिकारी व कंत्राटदारांना दिले आहेत.

मुंबईतील रस्ते सिमेंट काँक्रीटीकरण प्रकल्प अंतर्गत, पूर्व उपनगरात पूर्णत्वास येत असलेल्या रस्तेकामांची अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी बुधवार, २८ मे रोजी रात्री ठिकठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी चेंबूर येथे संत कक्कया मार्ग, साकीविहार रस्ता, घाटकोपर (पश्चिम) येथील सिकोवा औद्योगिक मार्ग, भांडुप (पश्चिम) येथील सुभाष नगर मार्ग, विक्रोळी (पश्चिम) येथील सूर्या नगर मार्ग, मुलुंड (पश्चिम) येथील मॅरेथॉन गॅलेक्सी मार्ग आणि बाबा पदमसिंह छेद मार्ग क्रमांक ५ आदींचा त्यात समावेश होता.

यावेळी बांगर यांनी सांगितले, रस्ते सिमेंट काँक्रीटीकरण प्रकल्प अंतर्गत, टप्पा एक आणि टप्पा दोन मिळून एकूण १३८५ रस्ते कामे हाती घेण्यात आली आहेत. या सर्व रस्त्यांवर पेव्हमेंट क्वॉलिटी काँक्रीटी (काँक्रीट ओतणे) रस्ते कामे पूर्ण झाली आहेत. यापैकी, ३० रस्त्यांचा अंशतः भाग मास्टिक अस्फाल्टद्वारे पूर्ण करण्यात येत आहे.

# १ जूनपासून कागदी फाईल्स बंद ई-ऑफिस सक्तीचे

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या प्रत्येक खात्यातील फाईल एक टेबलवरून दुसऱ्या टेबलावर आता वीजेच्या वेगाने धावणार आहे! कारण, १ जूनपासून सर्व शासकीय कामकाजासाठी ई-ऑफिस प्रणालीचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे. शासनाने स्पष्ट आदेश दिले असून, यापुढे कोणतीही कागदी फाईल स्वीकारली जाणार नाही.

राज्य शासनाने याबाबत परिपत्रक काढून संगणक प्रणालीद्वारे शासकीय कामकाज गतिमान, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रशासनातील किचकट प्रक्रियांना गती मिळावी, निर्णय प्रक्रिया जलद व्हावी आणि महत्वाचे दस्तऐवज सुरक्षित राहावेत या उद्देशाने हे पाऊल उचलण्यात आले आहे.

एप्रिल २०२३ पासूनच शासनाकडून सर्व विभागांना ई-ऑफिसचा प्रभावी वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र प्रत्यक्षात अनेक विभागांनी या प्रणालीचा अंमलबजावणीमध्ये अक्षम्य चालढकल केली. त्यामुळेच आता मुख्य सचिवांच्या आदेशानुसार, १५० दिवसांच्या प्रशासनिक कार्यक्रमाअंतर्गत १०० टक्के ई-ऑफिस वापर सक्तीचा करण्यात आला आहे.

या निर्णयामुळे कार्यालयीन कामात पारदर्शकता वाढेल, कागदाचा अपव्यय टळेल आणि शासकीय फायली खोळंबणार नाहीत. आता कर्मचारी आणि अधिकारी कोणतीही फाईल ई-ऑफिस प्रणालीद्वारेच पाठवणार, स्वीकारणार आणि निर्णय घेणार आहेत.

ई-ऑफिस प्रणालीचा वापर न करणाऱ्या विभागांकडे आता प्रशासनाने लक्ष केंद्रीत केलं आहे. जर १ जूननंतरही कोणताही विभाग कागदी फाईलवर काम करताना आढळला, तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची शक्यता नाकारता येत नाही.

# मुंबई पोलिसांना मिळणार डिजिटल स्मार्ट ओळखपत्र

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

बनावट पोलीस ओळखपत्राच्या आधारे नागरिकांची फसवणूक करणाऱ्या गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यावर मुंबई पोलीस दलातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना डिजिटल स्मार्ट ओळखपत्र देण्याचा निर्णय गृह विभागाने घेतला आहे. डिजिटल ओळखपत्रासाठी लागणाऱ्या चार कोटी रुपयांच्या प्रशासकीय अंदाजपत्रकास गृह खात्याने मंजुरी दिली असून यासंदर्भातील शासन निर्णय गुरुवारी जारी करण्यात आला.

मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांना सध्या छापील ओळखपत्र दिले जाते. कोणत्याही डीटीपीच्या साह्याने या ओळखपत्राची नक्कल होऊ शकते. अशाप्रकारे बनावट पोलीस ओळखपत्र तयार करून नागरिकांची फसवणूक करण्याचे प्रकार अलीकडच्या काळात मोठ्याप्रमाणात वाढले आहेत. ऑनलाईन माध्यमातून बनावट ओळखपत्राचा वापर करून 'डिजिटल अरेस्ट' चे प्रकार समोर येत आहेत.

या पार्श्वभूमीवर गुन्हेगारी कारवायांना प्रतिबंध करण्यासाठी मुंबई पोलीस आस्थापनेवर काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना तंत्रज्ञानयुक्त ओळखपत्र देण्याचा प्रस्ताव मुंबई पोलीस आयुक्तांनी गृह विभागाला सादर केला होता. विभागाने या प्रस्तावाला मान्यता दिली आहे.

मुंबई पोलीस दलाच्या आस्थापनेवर अधिकारी-कर्मचाऱ्यांची मिळून ५१ हजार ३०८ पदे मंजूर आहेत. या सर्वांना डिजिटल स्मार्ट ओळखपत्र दिले जाणार आहे. पोलिसांना असे स्मार्ट ओळखपत्र देणारे मुंबई पोलीस आयुक्तालय हे पहिले शासकीय कार्यालय ठरणार आहे. दरम्यान, तंत्रज्ञानयुक्त ओळखपत्र तयार करताना गोपनीयता पाळणे आवश्यक असल्याने मुंबई पोलीस आयुक्तांना त्यांच्या स्तरावर बंद निविदा प्रक्रिया राबविण्यास गृह खात्याने मान्यता आली आहे.

# राज्यातील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेला स्थगिती

## अतिरिक्त शिक्षकांना मोठा दिलासा

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

राज्यातील सर्व अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेला राज्य सरकारने तूर्त स्थगिती दिली आहे. जिल्हा परिषदेच्या संदर्भात न्यायालयीन आदेश झाल्यानंतरही समायोजनाची प्रक्रिया सुरू होती. समायोजनास नकार दिलेल्या अतिरिक्त शिक्षकांचे पगारही थांबवण्यात आले होते. याबद्दल

शिक्षण संचालक यांनी संचमान्यता, समायोजन आणि पगार बंदीला स्थगिती देण्याचे स्पष्ट आदेश जारी केले आहेत. त्यामुळे अतिरिक्त शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे. याबाबत माजी आमदार कपिल पाटील, शिक्षक भारतीचे अध्यक्ष अशोक बेलसरे आणि कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे, शिक्षण सचिव रणजितसिंह देओल यांची भेट घेऊन न्यायालयीन आदेशानंतरही समायोजन प्रक्रिया सुरू असून शिक्षकांचे पगार थांबवण्यात आल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यानंतर शासनाने संचमान्यता आणि समायोजन प्रक्रिया थांबवली. शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी संबधीत आदेश मुंबईसही लागू असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे शेकडो शिक्षकांचे पगार बंदीचे संकट तूर्तास दूर झाले आहे.

## महत्त्वाच्या बातम्या

### कचरा हाताळणी खर्च निर्णय तात्पुरता स्थगित

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

महानगरपालिकेने कचरा संकलनासाठी प्रस्तावित 'यूजर फी' लागू करण्याचा निर्णय तात्पुरता स्थगित केला आहे. मालमत्ता कराच्या सुधारित बिलांमुळे नागरिकांवर होणाऱ्या अतिरिक्त आर्थिक बोजाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री व नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी या निर्णयाचा फेरआढावा घेण्याचे आदेश दिल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. प्रस्तावित स्वच्छता आणि स्वच्छता उपविधी २०२५ अंतर्गत ५० चौरस मीटरपर्यंतचे घर किंवा व्यावसायिक आस्थापना यांना प्रतिमहा रु. १००, ५० ते ३०० चौरस मीटरमधील घरांना रु. ५०० प्रतिमहा, ३०० चौरस मीटरपेक्षा मोठ्या घरांना रु. १,००० प्रतिमहा, हॉटेल्स व क्लिनिक यांना रु. १,५०० ते रु. ७,५०० दरम्यान शुल्क आकारले जाणार होते. कचरा वर्गीकरणावरील नियमांबाबत नागरिकांकडून सूचना आणि हरकती मागवण्यात आल्या होत्या.

### शहीद जवानांच्या सन्मानार्थ ५००० झाडे लावण्याचा संकल्प

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

देशाच्या रक्षणासाठी बलिदान देणाऱ्या शहीद जवानांच्या स्मरणार्थ खासदार रवींद्र वायकर यांच्या संकल्पनेतून "एक झाड शहिदांच्या नावे" हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. ३१ मे रोजी सकाळी ७.३० वाजता आरे मध्ये या उपक्रमास सुरुवात होणार आहे. आपल्या देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी "एक पेड मां के नाम" हा उपक्रम राबवून लोकांना झाडे लावण्याचे आव्हान केले होते. यालाच अनुसरून "एक झाड शहिदांच्या नावे" हा उपक्रम राबवणार आहे.

### महावितरणचा विद्युत सुरक्षा सप्ताह

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

महावितरणच्या वर्धापन दिनानिमित्ताने 'शून्य अपघात महावितरण, शून्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन १ ते ६ जून २०२५ या कालावधीत संपूर्ण राज्यात विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ६ जून २०२५ रोजी महावितरण कंपनीचा २० वा वर्धापन दिन साजरा होत आहे. या निमित्ताने आयोजित विद्युत सुरक्षा सप्ताहादरम्यान मॅरेथॉन, रॅली, निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. तसेच ग्राहकांना सुरक्षाविषयक ई-मेल व एसएमएस पाठविणे, भित्तीपत्रके, चित्रफिती अशा विविध माध्यमांद्वारे विद्युत सुरक्षेविषयी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येणार आहे.

### ३ कोटी ४१ लाखांची बोगस घड्याळे जप्त; पाच व्यापारी अटकेत

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

विदेशी कंपन्यांच्या बोगस घड्याळाच्या विक्रीप्रकरणी पाच व्यापाऱ्यांना आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. या कारवाईत पोलिसांनी ३ कोटी ४१ लाख रुपयांची १४८२ बोगस घड्याळे जप्त केली आहेत. मुनाफ अब्दुल कादिर घोघारी, जगदीश तगाराम पुरोहित, मंगलराम सरेमलजी पुरोहित, अहमद उमर हलाई आणि हितेश पुखराजभाई पुरोहित अशी त्यांची नावे आहेत.

दक्षिण मुंबईतील अलसबा मार्केटमध्ये काही व्यापारी विदेशी कंपन्यांचे स्वामीत्व हक्कांचे उल्लंघन केलेल्या महागड्या घड्याळांची स्वस्तात विक्री करुन कंपनीसह ग्राहकांची फसवणूक करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीनंतर या अधिकाऱ्यांनी बुधवारी अलसबा मार्केटच्या पाच नामांकित घड्याळांच्या शॉपमध्ये अचानक छापा टाकून पाच व्यापाऱ्यांना अटक केली. या शॉपमधून पोलिसांनी लोंगिन्स, रॅडो, ऑडमर्स पिगेट आणि कॅसीओ आदी कंपन्यांचे स्वामीत्व हक्कांचे उल्लघंन करुन तयार करण्यात आलेल्या बोगस घड्याळांचा साठा जप्त केला आहे.

### शिक्षण उपसंचालकांविरोधात शिक्षक करणार जेलभरो आंदोलन

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

मुंबई शिक्षण उपसंचालकांच्या विरोधात विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना १३ जून रोजी आझाद मैदानात जेलभरो आंदोलन करणार आहेत. संघटनेचे सरचिटणीस प्रा. मुकुंद आंधळकर यांनी ही माहिती दिली. शिक्षण उपसंचालक व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील अनियमितता, प्रलंबित कार्य व भ्रष्टाचार याबाबत चौकशी करून दोषींवर कारवाई करावी मागणीसाठी जेलभरो होणार आहे. बुधवारी संघटनेच्या झालेल्या ऑनलाईन सभेत हा निर्णय घेण्यात आला. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांना सूचना पत्र दिले आहे. कार्यालयाकडून होणारी अनियमितता, समस्यांच्या निराकरणात होणारा विलंब, अल्पसंख्यांक संस्थांमधील भरती यामध्ये होणारा भ्रष्टाचार दूर करावा, विभागातील सर्व प्रलंबित नियुक्ती मान्यता तातडीने द्याव्यात, नियम डावलून केलेल्या सर्व संचमान्यता सुधारून द्याव्यात. सर्व प्रलंबित वेतनदेयके विनाविलंब मंजूर करावीत आदी मागण्या आहेत. याबाबत तातडीने कार्यवाही करीत दोषींवर कारवाई करावी, अशी संघटनेची भूमिका आहे.

### बोरिवलीत पंधरा वर्षीय मुलीशी अश्लील चाळे करून विनयभंग

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

पंधरा वर्षांच्या मुलीशी अश्लील चाळे करुन तिचा विनयभंग झाल्याचा प्रकार बोरिवली परिसरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी विनयभंगासह पोक्सो कलमांतर्गत गुन्हा दाखल होताच ५० वर्षांच्या आरोपीस गोराई पोलिसांनी अटक केली. पंधरा वर्षांची पीडित मुलगी बोरिवली परिसरात राहात असून याच परिसरात असलेल्या एका खासगी शाळेत शिकते. मंगळवारी दुपारी दोन वाजता ती परिसरातून पायी चालत जात होती. यावेळी तिच्याच परिचित आरोपीने तिच्याशी अश्लील चाळे करुन तिचा विनयभंग केला. या प्रकाराने तिला प्रचंड मानसिक धक्का बसला. घरी आल्यानंतर तिने आपल्या कुटुंबियांना हा प्रकार सांगितला. त्यानंतर पालकांसह जावून तिने घडलेला प्रकार गोराई पोलिसांना सातिंला आणि आरोपीविरुद्ध तक्रार केली. तिच्या तक्रारीवरुन पोलिसांनी आरोपीविरुद्ध विनयभंगासह पोक्सो कलमांतर्गत गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल होताच त्याला सायंकाळी पोलिसांनी अटक केली.

### सार्वजनिक शौचालयात व्हिडीओ रेकॉर्डिंग करणाऱ्याला अटक

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

मोबाईलद्वारे व्हिडीओ रेकॉर्डिंग करणाऱ्या एका वेटरला एल. टी. मार्ग पोलिसांनी अटक केली. राजनकुमार प्रमोद चोपाल असे या आरोपी वेटरचे नाव असून तो मूळचा बिहारचा रहिवाशी आहे. त्याच्याविरुद्ध विनयभंगासह पोक्सो कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भुलेश्वर येथील आत्माराम मर्चेंट मार्ग परिसरात असलेल्या एका सार्वजनिक शौचालयात बुधवारी सायकाळी तिथे दोन महिला गेल्या होत्या. यावेळी त्यांना शौचालयात ऑन केलेला मोबाईल ठेवल्याचे दिसून आले. या मोबाईलवरुन रेकॉर्डिंग सुरू असल्याचे दिसताच त्यांनी गस्त घालणाऱ्या एल. टी. मार्ग पोलिसांना ही माहिती दिली. या माहितीनंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन मोबाईल जप्त केला.

तो मोबाईल राजनकुमारचा असल्याचे चौकशीत उघडकीस आले. त्यानंतर त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीत त्यानेच सार्वजनिक शौचालयात ऑन केलेला मोबाईल ठेवून व्हिडीओ रेकॉर्डिंग केल्याची कबुली दिली. याप्रकरणी संबंधित महिलांनी तक्रार देण्यास नकार दिला, मात्र पोलिसांनी स्वतःहून राजनकुमारविरुद्ध विनयभंगासह पोक्सो कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आणि त्याला पोलिसांनी अटक केली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची येत्या ३१ मे २०२५ ला ३०० वी जयंती आहे. अत्यंत साधे जीवन आणि पराकोटीचे दातृत्व ही ओळख असलेल्या या लोकराज्ञीच्या त्रीशताब्धी जन्मोत्सवाच्या निमित्ताने...

---------------------

# लोककल्याणकारी प्रशासनाचा दीपस्तंभ
# अहिल्यादेवी होळकर

अनेक रूढी-परंपरांचा पगडा असलेल्या मध्ययुगात जगाच्या आणि भारताच्या इतिहासात आपल्या कार्यकर्तृत्वाने अढळ स्थान निर्माण करणाऱ्या स्त्रिया अगदी थोड्याच आहेत. अशा मोजक्या कर्तृत्ववान स्त्रीयांमध्ये शुभ्र चरित्र, चारित्र्य आणि लोककल्याणाच्या ध्यासाने चमकुन गेलेल्यांपैकी अहिल्यादेवी होळकर यांचा इतिहास आपल्या वेगळेपणामुळे नजरेत भरतो.

राज्यकारभार हाती घेताक्षणीच माझे प्रत्येक कार्य प्रजेला सुखी करणे आहे. माझ्या प्रत्येक कृतीला मी स्वतः जबाबदार आहे ... अशी प्रतिज्ञा घेऊन अत्यंत प्रतिकुल परिस्थिती असतांना सुद्धा तब्बल २८ वर्षे कल्याणकारी राज्य करणाऱ्या राजयोगीनी अहिल्याबाईचा जन्म ज्येष्ठ वद्य सप्तमी शके १६४७ दि ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रात झाला. महाराष्ट्रातील चौंडी येथील सुशीलाबाई व माणकोजी शिंदे हे त्यांचे आई-वडील.

विंध्य पर्वतापासून चित्तोड आणि मोकुद्रा डोंगरांच्या रांगांपर्यंत दक्षिण-उत्तर, आणि पूर्वेच्या भोपाळपासून पश्चिमेच्या गुजरात जवळील दोहदपर्यंत पसरलेले पठार म्हणजे माळव्याचा प्रदेश. मराठ्यांची भगवी पताका अटकेपार रोवण्यासाठी थोरल्या बाजीरावांनी अठरापगड जातींची कर्तबगार माणसे भोवती जमवून, त्यांच्या कर्तृत्वाला वाव दिला.

यात माळवा या प्रदेशाची जबाबदारी मराठा सुभेदार मल्हारराव होळकर यांचेवर होती. ते एका राजनैतिक कामासाठी पुण्यास निघाले असता सीणा आणि हरणा नद्यांच्या संगमावरील चौंडी येथे त्यांचा मुक्काम पडला. दिवेलागणीच्या वेळी मंदीरात चुणचुणीत आनि बेडर बालअहिल्या मल्हाररावांच्या नजरेस पडली. मुलगा खंडेरावासाठी हेच योग्य स्थळ, असे मनोमन ठरवून यथावकास रीतिभातीप्रमाणे खंडेराव - अहिल्येचा विवाह संपन्न झाला. ते वर्ष होते १७३३ आणि बालअहिल्येचे वय होते वयवर्ष आठ.

पुढे नववधू बालअहिल्येचा गंभीर चेहरा, एकाग्र श्रवण आणि सावध नजर गुणग्राहक मल्हाररावांनी हेरली. सुनेचा करारीपणा आणि गुणवत्ता पाहून सासरे शिक्षणासोबतच तिच्यावर घरगुती आणि शासन-प्रशासनातील जबाबदाऱ्या सोपवू लागले. मुलकी देवघेव, मसलती, कारखाने व्यवस्थापन, लढाया, शस्त्रनिर्मिती, रसदपुरवठा, युध्दशाळा यातील गती बघून कालांतराने होळकरांच्या खजिन्याच्या किल्ल्या अहिल्याबाईच्या हाती आल्या व ती पराक्रमी मल्हाररांवाचा उजवा हात बनली.

सुरजमल जाटांविरोधातील मोहिमेत कुंभेरी किल्ल्याला होळकरांचा वेढा पडला असता १७ मार्च १७५४ रोजी तोफगोळा पडून अहिल्यापती खंडेरावाला वीरमरण आले. तत्कालीन रुढीप्रमाणे सती जायला निघालेल्या अहिल्येला तिच्या सासऱ्यांनी त्यापासून परावृत्त केले. मुलुखगीरी करणाऱ्या नवऱ्याच्या मृत्युपश्चात शोक आवरून मराठेशाहीत डंका असलेल्या सास-याच्या राजकारणात अहिल्या सहकार्य करू लागली. मल्हारराव मराठेशाही विस्ताराच्या सतत मोहिमांवर असत तेव्हा अहिल्याबाई इंदूर येथून सगळा मुलकी राज्यकारभार चोखपणे सांभाळत होत्या. बुंदेलखंडात अंमल बसवून गोहदच्या जाटांवर चढाई सुरु असताना २० मे १७६६ या दिवशी आलमपूर येथे मल्हाररावांचे दुःखद निधन झाले. अहिल्याबाईंचे छत्र हरपले. होळकरशाही व मराठेशाहीचा मजबूत खाब निखळला.



**नंदू लुचे**
**नागपूर.**
**९८२३२९९९२९**

माळव्याचा वारस म्हणून अहिल्यापुत्र मालेराव यांना सुभेदारीची सनद प्राप्त झाली. मात्र ज्येष्ठ, श्रेष्ठ, जाणकार म्हणून राज्यकारभाराचा भार ओघाने बाईच्यांच खांद्यावर आला. कर्त्या पुरुषांचे सतत मृत्यु बघावे लागलेल्या अहिल्याबाईवर पुन्हा एक आघात झाला. वर्षभरातच दि. २७ मार्च १७६७या दिवशी त्यांचा एकुलता एक मुलगा मालेराव यांचा बाविसाव्या वर्षी मृत्यू झाला.

यावेळी इंदूर संस्थानात गंगाधर यशवंत चंद्रचूड हे होळकरांचे जुनेजाणते दिवाण होते. मल्हाररावांच्या राज्यात पेशव्यांनीच त्यांची नियुक्ती केली होती. होळकरांच्या सैन्याचा सेनापती तुकोजी होळकर दूर उदयपुरच्या आसपास असतांनाची संधी साधून दिवाण गंगोबातात्या यांनी पेशवा राघोबादादाशी संधान बांधले.

यावेळी पुण्यातून बेदखल केलेले राघोबादादा स्वतःवरील कर्ज निवारण्यासाठी मुलखगिरी करत माळव्याच्या आसपासच होते. गंगोबातात्यानी त्यांना, 'होळकरांची दौलत बेवारस झाली असून सत्वर येऊन येथील दौलतीचा कारभार समेटावा ' असा आग्रह धरला. कर्तुत्ववान सासरे, पती व एकुलता एक मुलगाही कैलासवाशी झाल्याने आपल्या सोईचा एक दत्तक देऊन त्याच्या नावे दिवाण म्हणून स्वतः राज्यकारभार करायचे आणि राघोबादादास बक्कळ नजराणा देऊन हे संपन्न राज्य घशात घालायचे, असे त्यांचे मनसुबे होते.

पण अहिल्याबाई या जरी देवधर्म आणि कर्तृत्वाने देवत्वाला पोचलेल्या पुण्यश्लोक असल्या तरी त्या निव्वळ देवभोळ्या नव्हत्या. पराक्रम, धडाडी आणि हिकमतीच्या बळावर मराठा साम्राज्याचे महत्त्वाचे खांब असलेल्या कर्तव्यकठोर मल्हाररावांच्या तालमीत तयार झालेल्या अष्टावधानी लोकराज्ञी होत्या.

त्यांना गंगोबा आणि राघोदादांचा बेत समजला. इंदूर-महेश्वरावर स्वारी करण्याच्या बेतात असलेल्या या दुकलीचा डाव मुसद्दीपणाने, सभ्य व शाही इतमानात उधळून लावला.

*समरात चकमक करतां, ये कातीन तुमचे हातां ॥*
*चित्तात विक्षपकर्ता ॥*
*जा धरा वाट पुण्याची ,मी सून सुभेदाराची....*

या पोवाडयातून तत्कालीन शाहीर भास्करबुवा निरगुडकर यांनी या प्रसंगाचे रसभरीत वर्णन केले आहे.

११ डिसेबर १७६७ च्या सनदेने अहिल्याबाई होळकर वयाच्या ४२ व्या वर्षी सत्तेवर आरूढ झाल्या. यावेळी संपूर्ण हिंदुस्थानातील राजकीय परिस्थिती अत्यंत नाजुक होती. हिंदुस्थानचे मध्यवर्ती सत्ताकेंद्र दिल्ली खिळखिळी झाली होती. बादशहा अली गौहरच्या वतीने त्याचा मुलगा जवाँबख्त दिल्लीतून कारभार पाहत होता. मराठेशाहीची सातारची मुख्य गादी कलहाने निस्तेज झाली होती.

मराठे आपापसातील बखेड्यांनी एकमेकांचे पाय ओढत होते.पेशवाईचा जोर ओसरू लागल्याने धूर्त इंग्रजाचे कावेबाज प्रतिनिधी शनिवारवाड्याच्या पाय-या चढू लागले होते. पूर्वेकडील बंगाल, पश्चिमेकडचा सुरत पट्टा, दक्षिणेकडच्या मद्रास प्रांतात इंग्रजांची पकड मजबुत होत चालली होती.

एकंदरीत कावेबाज फिरंगी एक एक राज्य बळकावून संपूर्ण हिंदुस्थानात आपला सत्तेचा खुंटा बळकट करत चालले होते. अशा विपरीत परिस्थितीत खंबीरपणे, मुत्सद्दीपणा आणि अष्टावधानाची कसब वापरुन अहिल्यादेवींनी निग्रहाने मृत्यू येईपर्यंत २८ वर्षे लोकोपयोगी राज्यकारभार केला.

'शासनयंत्रणा राबवणं म्हणजे भोग नसून योग आहे. साधना आहे.' अशा त्या मानत. प्रजेला पुत्रवत मानून तिचे मनोभावे संगोपन, संवर्धन व संरक्षण त्यांनी केलं. नुसत्या सैन्यबळावर नव्हे तर मानवतेच्या अद्वितीय बळावर लोकांच्या मनावर राज्य करण्याचा पराक्रम अहिल्यादेवींनी केला. म्हणूनच त्या 'देवी' या पदावर पोचल्या.

स्वतःच्या माळवा प्रांताबरोबरच देशभर जनसेवेची पाणपोई उभारणाऱ्या तसेच मानवी मूल्याच्या संवर्धनामुळे केवळ राजमाता न राहता पुण्यश्लोक, लोकमाता, मातोश्री, लोकराज्ञी, गंगाजळ निर्मळ आदी नामाभिदानाने रयतेच्या मनातील ताईत ठरल्या.

या प्रजाहितदक्ष लोकराज्ञीच्या व्यक्तिमत्त्वाने प्रेरित होऊन सिद्धहस्त लेखकांनी त्यांच्यावर कादंबऱ्या लिहिल्या. नाटककारांनी नाटके, कवींनी काव्य रचली, संशोधकांनी चरित्रे लिहिली आणि शाहिरांनी पोवाडे रचलीत. तत्कालीन शाहीर प्रभाकर यांच्या 'धन्य धन्य कलियुगी' या पोवाडयातून...

*बांधिले घाट मठ फार*
*कुठे शिवास संतत धार*
*कुठे ठेवतां पाणी गार*
*त्यासाठी मुशाफिर कायें धांवत जाई*
*विश्रांत पावती पाहून आमराई*
*किती ग्रहण संधीतं तीलतुला त्या केल्या*
*कधी कनक रोप्य आणि कधीं गुळाच्या भेल्या*
*सांभाळ करुनि काशीस यात्रा नेल्या*
*कावडी शतावधी रामेश्वरी गेल्या...*

अहिल्याबाईंच्या कार्याचा दाखला दिला आहे.

राज्याचे अस्तित्व टिकवण्यासाठी मूलभूत कार्य उभे राहिले पाहिजे,यावर त्यांचा कटाक्ष होता. यामुळे त्यांनी अनेक लोकोत्तर कार्ये उभी केली. आजच्या राज्यकर्त्यांनीही धडे घ्यावेत असं अहिल्याबाईचं सुधारणावादी राजकारण आणि समाजकारण होते, ते पुढील मुद्द्याच्या आधारे स्पष्ट होते.

**लोककल्याणकारी राज्यकारभार :**
पतीनिधनानंतर अत्यंत साधेपणाने वैयक्तिक जीवन जगून त्यांनी रयतेच्या कल्याणासाठी अलौकीक कार्य केले. त्यांचा वावर हा जरी माळव्यात असला तरी अवघ्या भरतखंडात त्यांच्या कर्तृत्वाच्या खुणा पसरलेल्या आहेत.

त्यांनी नद्यांवर घाट, विहिरी, प्रवासी मार्गावर धर्मशाळा, अन्नछत्र, जनावरांसाठी डोण्या, पाणपोया, पांथशाळा, संस्कार वर्ग, आमराया, आश्रयशाळा बांधून, मंदिराचे जीर्णोधार करून कारागीर व कलाकारांना आसरा दिला. देशातील उत्तम विणकरांना राजधानीत आणून तेथे वस्त्रोद्योगाला चालना दिली. लोककल्यानाचे व्रत अखंडपणे चालवत पुण्यश्लोक ही पदवी सार्थ ठरवली.

**शेती आणि शेतकरी हीतास प्राधान्य :**
तत्कालीन परिस्थितीत रयतेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत कृषी हाच होता. त्यानी आपल्या राज्यात शेतकरी व शेतीच्या हीताचा सदैव विचार केला. अहिल्यादेवीच्या मुलकी कारभारात खेतीहर किसानांच म्हणनं सर्वप्रथम विचारात घेतलं जाई. बड्या असामींना देणे देतांना त्या घाई करत नसत, मात्र शेतकरी कारागीर यांना विना दिरंगाई मोबदला दिला जाई, शेतक-यांसाठी विविध सुविधा व आगाऊ कर्जाची व्यवस्था केली होती. भुमिहीनांना शेतीचे पट्टे वाटप करून त्यात फळझाडांची लागवड करण्यास प्रोत्साहित केल्या जात.

शेतीवरील कर हा उत्पन्नाप्रमाणे आकारण्यास सुरुवात केली. डोंगरद-यातील मुळनिवासी भिल्ल आणि इतर आदीवासी जमातींना त्यांचा भीलकवडी कर मान्य करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांचेकडून पडिक जमिनीची लागवड करून घेतली. जमीन करारपट्टयाने देण्याची पध्दत सुरु केली. राज्यात वस्त्रोद्योगांना उत्तेजन दिले.

**कर्तव्यकठोर प्रशासन :** अहिल्यादेवींची प्रशासनावर उत्तम पकड होतीच. करवसुली करण्याची रचना असो की बखेडाबंड मिटवणे, त्यांचा त्यात हातखंडा होता. व्यक्तिगत जीवनात दुःखांनी त्यांच्याशी पाठशिवणीचाच खेळ चालवला होता, पण त्याही परिस्थितीत त्यांची कर्तव्याला प्रथम प्राधान्य दिले.

प्रजेसाठी सुलभ नवे नियम त्यांनी तयार केले, तसेच जाचक नियम रद्द करून टाकले. राज्यातील उपद्रवी जमातींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले. त्यांच्या उदरनिर्वाहासाठी कायमची व्यवस्था केली. राज्यात शांतता राखण्यासाठीच्या त्यांच्या प्रयत्नाचा इतिहासकार जॉन माल्कम यांनी आपल्या 'अ मेमोईर ऑफ सेंट्रल इंडिया इन्क्लुडिंग मालवा' या ग्रंथात गौरव केला आहे. अहिल्यादेवींच्या चरित्रात व्यवस्थापनाचे, अर्थनियोजनाचे, राजकारणाचे थडे सापडतात.

**धाडसी सुधारणावादी :** तत्कालीन रूढी-परंपरेची चौकट मोडून अमानवी सती प्रथेला त्यांनी विरोध केला.राज्यात हुंडाबंदी केली. विधवा स्त्रीयांना त्यांच्या इच्छेप्रमाणे दत्तक घेण्याचा अधिकार बहाल केला. 'माळव्यात उपद्रव माजवणाऱ्या लुटारूंचा जो शूर बंदोबस्त करेल, त्याच्याशी त्यांची एकुलती एक कन्या मुक्ताचा विवाह होईल.

यावेळी त्याचे सामाजिक स्थान व जातपात पाहिल्या जाणार नाही.' हा अलौकिक विचार जाहिर करून त्या थांबल्या नाहीत, तर त्यांनी कृतीही तशीच केली. स्त्रीच्या ज्या काळात सती जात होत्या, त्याच काळात अपरिहार्य कारणांमुळे मुलीचे लग्न मोडण्यास त्यांनी मान्यता दिली होती. इंदूरमधील माणिकलाल वाणी ओसवाल यांच्या कन्येच्या विवाह प्रेचप्रसंगात लग्न मोडलेल्या वधू मुलीच्या दुसऱ्या विवाहसाची रीतसर परवानगी अहिल्यादेवींनी आपल्या न्यायनिवाडयातून दिल्याचे उदाहरण सापडते. 'ज्या रूढी अंधाराकडून उजेडाकडे नेतात त्या रुढी आम्हाला मान्य आहेत. उजेडाकडून अंधाराकडे नेणाऱ्या प्रथापरंपरांना आम्ही अंधश्रद्धा मानतो', असे त्या म्हणत.

**अव्वल मुत्सद्दी :** 'अस्सल कागदपत्रानिशी हे सिद्ध करता येते की, अहिल्यादेवी अव्वल दर्जाच्या मुत्सद्दी होत्या ',असे इतिहासकार सर जदुनाथ सरकार यांनी नोंद करून ठेवली थाहे.

बारभाई राजकारणाच्या उत्तरार्धात नाना फडणीस, राघोबादादा, इंग्रज, महादजी, तुकोजी ही सत्तेच्या खेळातली माणसे त्यांच्याजवळचे धन ओढू पाहत होती. पण त्या कोणत्याही दबावाला बधल्या नाहीत.होळकरांच्या खजिन्यातील भरभरून वाहणाऱ्या या द्रव्यांच्या जनहितासाठीच उपयोग झाला पाहिजे, यावर त्यांचा कटाक्ष होता.

**संवेदनशिल :** संपूर्ण जगभरातील आणि देशातील राजे-रजवाडयांनी आपापल्या राज्यात लोकोपयोगी कामे केलीत; पण स्वतःच्या राज्याबाहेर देशभर लोक कल्याणाची पाणपोई उभारणाऱ्या अहिल्याबाई यांचे उदाहरण दुर्मिळ आहे.

त्यांनी जनसामान्यांची काळजी धोरणीपणाने घेतलीच; पण पशुपक्षांसाठी जंगले आणि कुरणे संरक्षित केली. अगदी मुंग्यासाठी साखर, जलचरांसाठी खाद्य याची तजवीज केली. दैनिक दानधर्म आटोपल्यावर शिल्लक धान्य पक्षांसाठी ठेवण्याचा त्याचा दंडक होता.

**हिशेबात चोख :** हिशेबाच्या बाबतीत त्या फार दक्ष असत. सरकारी दौलतीचा एक छदामाही खासगीसाठी वापर करू नये, असा त्यांचा दंडक होता. त्यांचा राज्यातील कर पध्दती अत्यंत चोख होती. गवताच्या पेंढीचाही चोख हिशेब ठेवल्या जात होता.यामुळेच त्यांच्या राज्यात शेती, उद्योग आणि व्यापाराचा उत्कर्ष झाला.

**वस्तुनिष्ठ न्यायदान :** बड्या घरातील घरंदाच स्त्रिया असोत वा सामान्य संसारी बाई, कुणीही त्यांच्यापर्यंत गाऱ्हाणे मांडू शकत होत्या. न्यायदानाची पध्दत वस्तुनिष्ठ होती. सिरोजमधील खेमदास नावाच्या व्यापा-याच्या निधनानंतरच्या वारस प्रकरणात त्यांनी केलेला निवाडा एक उत्तम नमुना आहे. सर जॉन माल्कमने, 'अहिल्यादेवी सारख्या न्यायाधीश होणे नाही.'असे उद्गार काढले आहेत.

**व्यवस्थापन निपून :** अहिल्याबाईच्या व्यवस्थापनाची सर्व वैशिष्ट्ये बुळे प्रकरणात दिसतात त्यांनी गोविंद बुळे या सरदाराला मुजोर होऊ दिले नाही,की त्याच्यावर आज्ञाभंगाच्या आकसापोटी सूड उगवला नाही.

केवळ आपलेच घेणे परत मिळवून त्याला वाऱ्यावरही सोडले नाही. तत्कालीन परिस्थितीत दुरदर्शीपणाने बाईंनी आपले राजदूत अयोध्या, उदयपूर, कोटा, ग्वालेर, दिल्ली, जयपूर, देवळेप्रतापगड, डुंगरपुर, भोपाळ, हैदराबाद, पुणे इत्यादी ठिकाणी नियुक्त करून केले होते.

**साहित्य आणि संस्कृतीचा विकास :**
छापखाने नसलेल्या त्या काळात अहिल्याबाईचा ग्रंथसंग्रह मोठा व दुर्मिळ होता. मध्ययुगात महत्वाचे मानले जाणारे निर्णय सिंधू, द्रोणपर्व, मुहूर्त चिंतामणी, वाल्मिकी रामायण, ज्ञानेश्वरी, मथुरा माहात्म्य, पद्मपुराम, श्रावणमास माहात्म्य इत्यादी ग्रंथ त्यांच्या संग्रही होते व त्या रयतेसोबत त्यांचे दैनिक परिपाठ करीत. त्यांनी आपल्या राज्यात अनेक विद्वान पंडीत, साहित्यिक, संगीतकार, चित्रकार, शिल्पकार यांना राजाश्रय दिला होता. मोरोपंत व शाहीर आनंद फंदी यांचा यथोचित आदरसत्कार केला होता.

राजकारण, मुत्सद्दीपना, दूरदृष्टी, धडाडी, गुणग्राहकता, उद्योजकता, वात्सल्यभान, सौंदर्यदृष्टी, सात्विकता, व्यवहारचतूर या सगळ्यांचे एकच सार म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होय. या थोर लोकमातेस त्यांच्या ३०० व्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन!

■ ■ ■

# सावधान ! तंबाखू, खैनी, गुटखा, खर्रा घातकच

संपूर्ण जगातील लोकांना तंबाखू पासून मुक्ती मिळावी व आरोग्य सुदृढ रहावे या उद्देशाने तंबाखू व धुम्रपान यापासून होणारा त्रास दुर करण्याकरीता तंबाखू निषेध दिवस साजरा केल्या जातो. जागतिक आरोग्य संघटना डब्लुएचओच्या सदस्य देशांनी तंबाखू सेवनाने होणाऱ्या बिमारीचा मृत्यू दरात वाढ झाल्यामुळे १९८७ ला महामारी घोषीत करण्यात आली व तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याचा सल्ला देण्यात आला. ८ एप्रिल १९८८ ला डब्लुएचओने वर्षगाठ साजरी केली व याच दिवशी ३१ मे तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याची घोषणा केली. तेव्हापासून ३१ मे जागतिक तंबाखू निषेध दिवस साजरा केल्या जातो.

-------------------

डब्लुएचओने तंबाखू सेवनाने होणाऱ्या २५ प्रकारच्या शारीरिक आजार पाहता व ४० प्रकारचे कॅन्सर पहाता आणि या बिमारीचा वाढता मृत्यू दर पहाता याला महामारी घोषीत केली. डब्लुएचओच्या माहितीनुसार जगात तंबाखूने किंवा धुम्रपान केल्याने दरवर्षी ८० लाखांपेक्षा जास्त लोकांना आपले प्राण गमवावे लागतात. यावर जगातील देशांनी नियंत्रण ठेवले नाही तर मृत्यूचा आकडा दुप्पटीने वाढु शकतो.

कोणत्याही नशेली पदार्थाचे अती सेवन करणे म्हणजे मृत्यूला कवटाळले होय. मानवाची जगण्याची दशा, दीशा ठरवणे हे मानवाच्या मनावर असते. परंतु आपल्या मनावरचा ताबा सोडून नशेली पदार्थाचे सेवन केले तर स्वतःला व परिवाराला घातक सिध्द होवू शकते.

तंबाखूच्या सेवनाने कॅन्सर सारखे महाभयानक आजाराने मानुस जखडतो आणि यांचा दुषपरीणाम संपूर्ण परीवाराला भोगावा लागतो. ह्याबाबी मानवाने स्वतः समजून घ्यायला हव्यात. कोणत्याही नशेच्या बाबतीत सरकारचे दुटप्पी धोरण आपल्याला पहायला मिळते. सरकार नशेली वस्तुची खुलेआम विक्री करण्यास प्राधान्य देते व मोठ्या प्रमाणात परवाने सुध्दा देते आणि दुसरीकडे नशा न करण्याचे आव्हान करते याला कोणते धोरण म्हणावे?

मध्यंतरी महाराष्ट्रात दारू-वाईन किराणा दुकान विक्रीला ठेवता येईल या चचेर्ला मोठे उधाण आले होते.या चचेर्चा सर्वच स्तरातून निषेध करण्यात आला. त्यामुळे ताबडतोबच या चर्चेवर पुर्णविराम लागला. सरकारने नशाबंदीचे मोठ-मोठे सरकारी ऑफिसेस खोललेली आहेत. याकरीता देशभरात लाखो कर्मचारी कार्यरत असतात.

याव्यतिरिक्त अनेक रजिस्टर्ड सामाजिक संस्था व्यसनमुक्तीसाठी कार्य करतांना दिसतात. परंतु सरकार स्वतःहुन नशेली पदार्थाचे उत्पादन बंद करायला तयार नाही. कारण नशेली (मद्य, तंबाखू, खैनी, सिगारेट, बिडी, गुटखा, गांजा इत्यादी) वस्तुपासुन राज्य व केंद्र सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल (रेव्हेन्यू) मिळत असतो व त्यावर सरकारचा कारभार चालतो.

यावरून स्पष्ट होते की सरकार पैसा कमविण्याकरीता दुटप्पी धोरण अवलंबुन मानवाचे जीव धोक्यात टाकत आहे. कोव्हीड-१९ च्या महामारीच्या काळात संपूर्ण भारतासह अनेक राज्यांमध्ये लॉकडाउन होता याकाळात दारूची दुकाने खोलण्याची मागणी सर्व प्रथम राजकीय पुढाऱ्यांची होती आणि अनेक राज्यांमध्ये लॉकडाउनच्या काळात दारूची दुकाने खोलण्यात आली.

यामुळे सरकारच्या तिजोरीत करोडो रुपयांचा महसूल रूपात पैसा जमा झाला.यावरून स्पष्ट होते की पैशासाठी सरकार लोकांना व्यसनाधीन करीत आहे. लॉकडाउनच्या काळात दारू, सिगारेट, बीडी, तंबाखू, खैनी, गुटखा, खर्रा, गांजा याचा मोठ्या प्रमाणात तुटवडा होता ह्या वस्तु अवैधरीत्या दुप्पटीने किंवा तिपटीने लोकांनी घेतल्या. परंतु नशा सोडण्याला कोणीही महत्त्व दिले नाही.

लॉकडाउनच्या काळात लोकांना नशा सोडण्याची सुवर्णसंधी होती. परंतु नशेली वस्तुंची दुकाने खुलताक्षणी सोशल डिस्टिंक्शनची धज्जीया उडवून नशेली वस्तु घेण्याकरिता ३ किलोमिटर पर्यंत लोक रांगेत उभे होते. अशाने कोणत्याही नशेवर आळा बसणार नाही. प्रत्येकानी जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणीही नशेच्या आहारी जावु शकत नाही. कोणतीही नशा असो ती घातकच असते. परंतु अती नशा मृत्यूच्या खाईत नेल्या शिवाय रहाणार नाही.



त्यामुळे कोणतीही नशा करतांना सावधगिरी बाळगली पाहिजे. अन्यथा जिवीत हानी अटळ आहे. तंबाखू, गुटखा, खैनी, खर्रा, सुपारी, दारू यापासून शरीराच्या कोणत्याही अवयवांच्या विकासासाठी चालना देत नाही मग या वस्तूचे सेवन का करावे?

कोणतीही नशा असो ती शरीराचा विकास तर करीत नाहीच उलट शरिराला छिन्नविछिन्न करण्याचे काम करीत असते व स्लोपॉयझनचे काम करून मृत्यूला जवळ करीत असते.

आपण साधारणतः नशेली वस्तू व पोषक वस्तू यांचा विचार केला तर मनुष्यासाठी नशेली वस्तूंच्या तुलनेत पोषक वस्तू खुपचं स्वस्त असतात. उदाहरण द्यायचे झाले तर बादाम १००० रुपए किलो यांच्या तुलनेत गुटखा ४४०० रुपए किलो, शुद्ध तुप ६०० रुपए किलो यांच्या तुलनेत तंबाखू १७०० रुपए किलो, सफरचंद१०० रुपए किलो यांच्या तुलनेत सुपारी ६०० रुपए किलो, दुध ५० रुपए लिटर यांच्या तुलनेत दारू ६०० रुपए लिटर अशा प्रकारे अशा अनेक पोष्टीक वस्तू आहेत की त्यांची किंमत नषेली वस्तू पेक्षा कितीतरी पटीने स्वस्त व कमी आहेत.

परंतु नशा करणारे बहाद्दर नशेला जास्त महत्त्व देतात हे त्यांचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. कोव्हीड-१९ च्या महामारी पासून सरकारने रस्त्यावर थुंकण्यावर बंदी घातली होती त्याचप्रमाणे सरकारने तंबाखू, गुटखा, खैनी, खर्रा, गांजा यावर सुध्दा बंदी घालायला पाहिजे होती. यामुळे मृत्यू दर कमी होण्यास मोठी मदत होईल.

करोना काळात कोरोना महामारीचा प्रकोप दीवसेंदीवस वाढत असतानाच केंद्रशासित प्रदेशासह २८ राज्यांनी तंबाखू व धुम्रपानामुळे कोरोणाची लागन होण्याची शक्यता पहाता. त्यातच फुफ्फुसाचा कर्करोग होतो किंवा रोगप्रतिकारक शक्ती कमी होते असे आरोग्य तज्ञांचे म्हटले होते.

या पार्श्वभूमीवर तंबाखू, गुटखा, खैनी, खर्रा सेवन आणि सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यावर बंदी घालने उचीत होते तीच पद्धत नेहमीसाठी सरकार कडून अमलात यायला हवी. सध्याच्या परीस्थितीत युवापिढी धुम्रपानाच्या आहारी जातांना दिसत आहे.त्यांनी मनावर ताबा ठेवुन धुम्रपानाचा विरोध करावा व युवकांनीच जगाला संदेश देवुन धुम्रपानाचा निषेध केला पाहिजे.

कोणत्याही नशेली वस्तुंसाठी रांगेत उभे रहाने म्हणजे मृत्यूच्या रांगेत उभे रहाल्यासारखे आहे.याची जाणिव आजच्या युवा पिढीने लक्षात ठेवली पाहिजे. सरकारने कितीही नशेली वस्तु विकण्याचा प्रयत्न केला तरीही आपण जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणतीही नशेली वस्तु तुम्हाला स्पर्श सुध्दा करू शकत नाही हेसुद्धा तेवढेच सत्य आहे.

त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत कोणीही रस्त्यावर तंबाखू,खर्रा किंवा इतर नशेली वस्तू थुंकू नये याची काळजी घ्यायला हवी. कारण रस्त्यावर थुंकल्याने अनेक बिमाऱ्यां व संक्रमनात मोठ्या प्रमाणात वाढ होवून आरोग्य धोक्यात येऊ शकते. त्यामुळे कोणत्याही नशेपासुन सावधगिरी बाळगली पाहिजे. आपण सुद्दढ राहिलो तर आपली पिढी सुद्दढ राहील.

त्याचप्रमाणे आपण सुरक्षीतरीत्या जगलो तर तर देश सुरक्षित राहील, देश सुरक्षित रहाला तर जग अवश्य सुरक्षित होईल. त्यामुळे तंबाखू खर्रा खावुन रस्त्यावर थुंकु नका व कोणत्याही महामारीला जाहीर आमंत्रण देवु नका ही आग्रहाची आणि कळकळीची विनंती आहे. याकरीता तंबाखू निषेध दिनाच्या निमित्ताने आपण संकल्प करूया की यानंतर धुम्रपान व इतर नशेली वस्तूला टाटा-बाय-बाय करूया.

------------------

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

■ ■ ■

# महिलांना प्रतिकारक्षम करण्याचे उपक्रम

महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक तसेच आरोग्य विषयक समस्या सोडविण्यासाठी आणि त्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने वर्ष २०२५-२६ पासून राज्यात आदिशक्ती अभियान राबवण्यात येणार असल्याची माहिती राज्याच्या महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी आपल्या एक्स खात्यावरून दिली.

या मोहिमेद्वारे महिलांसाठी राज्यात राबविण्यात येत असलेल्या विविध शासकीय योजना, उपक्रम, कार्यक्रम आदींबाबत आवश्यक आणि उपयुक्त माध्यमांद्वारे प्रचार आणि प्रसिद्धी देऊन जनजागृती करण्यात येणार आहे त्यासोबतच ग्रामस्तरीय समित्यांना 'आदिशक्ती पुरस्कार' देऊन गौरविण्यात येणार आहे.

राज्यातील एकूण लोकसंख्येच्या सुमारे ६० टक्के लोकसंख्या महिला आणि बालके आहेत. शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या सर्व महिलाभिमुख योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकातील महिलांपर्यंत पोहोचविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य विषयक समस्यांबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करणे व जनजागृतीच्या माध्यमातून चळवळ निर्माण करणे, अभियानाच्या माध्यमातून महिलांच्या समस्यांवर कायमस्वरूपी उपायोजना करणे तसेच महिलांचे सर्वांगीण सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने हे अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती तटकरे यांनी दिली आहे.

आजमितीला महिलांच्या विकासासाठी राज्य सरकार अनेकविध योजना राबवत आहे मात्र तळागाळापर्यंत त्या पोहोचत नसल्याने किंवा अनेकांना त्याबाबत पुरेसे ज्ञान नसल्याने महिला त्यांपासून वंचित राहतात त्यादृष्टीकोनातून सरकारतर्फे राबवण्यात येणारा हा उपक्रम नक्कीच स्तुत्य आहे.

मात्र सध्याची सामाजिक स्थिती पाहता महिलांना केवळ आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य दृष्ट्या सक्षम करणे पुरेसे नसून तिला शारीरिकदृष्ट्या प्रतिकारक्षम करणेही तितकेच महत्वाचे आहे.



प्रत्येकाच्या हातात आलेले मोबाईल्स, त्यावर इंटरनेटचा होत असलेला मुक्त वापर, सेन्सॉरची कोणतीच बंधने नसलेल्या तसेच अश्लील आणि हिंसक दृश्यांचा भरणा असलेल्या वेब सिरीज, शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून पाहिल्या जाणाऱ्या पॉर्न वेबसाईट्स, तरुण मुला मुलींना पालकांकडून दिली जाणारी वारेमाप मोकळीक, चित्रपट, डेलीसोप यांमधून विवाहबाह्य संबंध, लिव्ह इन रिलेशनशिप, समलैंगिकता, अनैतिकता यांना दिले जाणारे प्रोत्साहन या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून आज स्त्री अत्याचारांच्या घटनांत कमालीची वाढ झाली आहे.

कोणतेही क्षेत्र महिलांसाठी सुरक्षित राहिलेले नाही. ज्यांच्यावर डोळे झाकून विश्वास ठेवावा असे जवळचे नातेवाईक, पोलीस, डॉक्टर, शिक्षकसुद्धा वासनाधीन होऊ लागले आहेत. तीन वर्षाच्या बालिकेपासून ८० वर्षाच्या वृद्धासुद्धा वासनांधांच्या बळी ठरू लागल्या आहेत.

अशा प्रतिकूल परिस्थितीत स्त्रीला तिच्या शीलरक्षणासाठी सक्षम करणे गरजेचे आहे. आजची स्त्री व्यावहारिक जगात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून पुढे जात आहे. मात्र जेव्हा समाजातील वासनांधता तिला गिळंकृत करू पाहते तेव्हा ती निर्बल ठरताना दिसत आहे.

सुशिक्षित आणि सुज्ञ असूनही हुंडयासाठी जेव्हा तिचा छळ केला जातो तेव्हा ती शक्तिहीन झालेली दिसते. परिस्थितीला सामोरे जाण्याचे बळ नसल्याने आत्महत्येचा मार्ग स्वीकारताना दिसते. भारतभूमी ही शौर्याची भूमी आहे.

आजवर या भूमीवर राजमाता जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई, राणी चेन्नम्मा, राणी येसूबाई यांसारख्या वीरांगना होऊन गेल्या ज्यांनी आपल्या सैन्यबळाचे नेतृत्व करून शत्रूवर तुटून पडल्या. पहलगाम हल्ल्याच्या प्रतिशोधार्थ भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदुरच्या मीडिया ब्रिफींगचे चे नेतृत्व विंग कमांडर व्योमिका सिंग आणि कर्नल सोफिया कुरेशी या दोन महिलांनी केले.

या सर्वांचे आदर्श आजच्या स्त्रीपुढे असायला हवेत. सरकारने आखलेल्या अभिनव उपक्रमाला 'आदिशक्ती' हे नाव दिले आहे. आदिशक्तीने दुष्टांच्या संहारासाठी आणि भक्तांच्या रक्षणासाठी प्रसंगी अवतार घेतले आहेत. तिच्या प्रत्येक हातात शस्त्र आहेत.

या शस्त्रांचा वापर करून तिने असुरी शक्तींचे निर्दालन केले आहे त्यामुळे या उपक्रमाच्या अंतर्गत स्त्रियांना शारीरिकदृष्ट्या सबळ आणि प्रतिकारक्षम करण्याचे काम सरकारने हाती घ्यायला हवे.

ज्याची सुरुवात शाळा महाविद्यालयांपासून करायला हवी. शालेय अभ्यासक्रमासोबत मुलींच्या सबलीकरणासाठी स्वरक्षण प्रशिक्षणवर्गही घेतले जावेत. जेणेकरून भविष्यातील स्त्री केवळ व्यावहारिकदृष्ट्याच नव्हे तर शारीरिक आणि मानसिकदृष्ट्याही सक्षम असेल. संकटांना धैर्याने सामोरी जाणारी असेल, प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारी असेल.

---------------

**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई**
**९६६४५५९७८०**

■ ■ ■



# सेन्सेक्स आणि निफ्टी घसरले पण सहाव्या दिवशी स्मॉलकॅप शेअर्समध्ये वाढ

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

भारतीय शेअर बाजार आज ३० मे रोजी घसरून बंद झाले. सेन्सेक्स १८२ अंकांनी घसरून बंद झाला. निफ्टी २४,७५० वर घसरला. यामुळे आज शेअर बाजारात गुंतवणूकदारांचे १.५९ लाख कोटी रुपये बुडाले. कमकुवत जागतिक संकेत आणि जीडीपी डेटाच्या पार्श्वभूमीवर आजच्या व्यवहारात गुंतवणूकदार सावधगिरी बाळगत होते. याशिवाय, अमेरिकेतील टॅरिफबाबतच्या नवीन चिंतांमुळे गुंतवणूकदार चिंतेत पडले.

आयटी, धातू, ग्राहकोपयोगी वस्तू आणि तेल आणि वायू शेअर्समध्ये सर्वात मोठी घसरण दिसून आली. मात्र, दुसरीकडे आज सलग सहाव्या दिवशी स्मॉलकॅप शेअर्समध्ये वाढ सुरूच राहिली. बीएसई स्मॉलकॅप निर्देशांक ०.१७ टक्क्यांनी वधारला. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स १८२.०२ अंकांनी घसरून ८१,४५१.०१ वर आणि निफ्टी ८२.९० अंकांनी घसरून २४,७५०.७० वर बंद झाला.

आज ३० मे रोजी बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ४४३.८८ लाख कोटी रुपयांवर घसरले, जे गुरुवार २९ मे रोजी ४४५.४७ लाख कोटी रुपयांवरून कमी झाले. सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल १.५९

**सेन्सेक्स 81,451**

**निफ्टी 24,750**

लाख कोटी रुपयांनी कमी झाले आहे. दुसऱ्या शब्दांत गुंतवणूकदारांच्या संपत्तीत १.५९ लाख कोटी रुपयांची घट झाली आहे.

सेन्सेक्समधील ३० पैकी ६ शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये, इटरनल शेअर्समध्ये सर्वाधिक ४.५८ टक्के वाढ झाली. यानंतर, स्टेट बँक ऑफ इंडिया, एचडीएफसी बँक, लार्सन अँड टुब्रो आणि रिलायन्स इंडस्ट्रीज यांचे शेअर्स ०.२४ टक्क्यांपासून ते १.८९ टक्क्यांपर्यंत वाढून बंद झाले.

सेन्सेक्समधील उर्वरित २४ शेअर्स घसरणीसह बंद झाले. यामध्येही टेक महिंद्राचे शेअर्स सर्वाधिक १.७३ टक्क्यांनी घसरले. दुसरीकडे, एचसीएल टेक, एशियन पेंट, एनटीपीसी आणि इन्फोसिसचे शेअर्स १.४३% ते १.६४% पर्यंत घसरले.



### मार्च तिमाहीत जीडीपी वाढ दर ७.४%

वित्त वर्ष २०२५ च्या अखेरच्या तिमाहीत (जानेवारी-मार्च) भारतीय अर्थव्यवस्थेने उत्तम कामगिरी केली. मार्च तिमाहीत भारताची जीडीपी (सकल देशांतर्गत उत्पादन) वाढ दर ७.४ टक्के इतकी राहिली, जी मागील चार तिमाहींमधील सर्वाधिक आहे. संपूर्ण वित्त वर्ष २०२५ मध्ये देशाची जीडीपी ६.५ टक्के दराने वाढली. ही माहिती सरकारने ३० मे, शुक्रवार रोजी जाहीर केलेल्या आकडेवारीत दिली.

देशाच्या अर्थव्यवस्थेत मागील तिमाहीच्या तुलनेत वेगाने सुधारणा झाल्याचे दिसून आले. ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीत जीडीपी वाढ दर ६.४ टक्के होती. मात्र, वार्षिक तुलनेत ही वाढ दर कमी राहिली, कारण मागील वित्त वर्षाच्या मार्च तिमाहीत जीडीपी वाढ दर ८.४ टक्के होती.

# 639 कोटींचा भारतातील सर्वात महागडा फ्लॅट

**मुंबई, दि. ३० प्रतिनिधी**

युएसव्ही कंपनीच्या अध्यक्ष लीना तिवारी सध्या चर्चेत आहेत. मुंबईतील वरळी येथे ६३९ कोटीं रुपयांना डुप्लेक्स फ्लॅट विकत घेतल्यामुळे भारतातील हा सर्वात महागडा फ्लॅट ठरला आहे. लिना तिवारी यांनी फ्लॅट विकत घेतल्यानंतर त्यासाठी ६३.९ कोटींची स्टॅम्प ड्युटी भरली आहे. त्यामुळे फ्लॅटची एकूण किंमत ७०३ कोटींवर पोहोचली. इतका महाग फ्लॅट विकत घेणाऱ्या लीना तिवारी या युएसव्ही या औषध निर्माता कंपनीच्या अध्यक्ष आहेत. युएसव्हीमार्फत ग्लायकोमेट, इकोस्प्रिन आणि रोझडे अशी मधुमेह आणि हृदयरोगाशी निगडित औषधे उत्पादित केली जातात. सामाजिक जीवनात अतिशय साधेपणाने वावरणाऱ्या लीना तिवारी या औषध निर्मिती क्षेत्रातील अब्जाधीश आहेत. मुंबईतील वरळी येथे सीफेस असेलल्या इमारतीत भारतातील सर्वात महागडी मालमत्ता खरेदी केल्याप्रकरणी आता त्यांचे नाव चर्चेत आहे.

लीना तिवारी या नीता अंबानी यांच्या जवळच्या मैत्रिणींपैकी एक आहेत. त्यांचे पती आणि युएसव्ही कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत तिवारी हेदेखील त्यांच्यासारखेच शांत, संयमी वृत्तीचे असल्याचे सांगितले जाते. दूरदृष्टी ठेवत उद्योगाचे धोरण आखणारे व्यावसायिक अशी त्यांची ओळख आहे. फोर्ब्स यादीतून मिळालेल्या माहितीनुसार लिना तिवारी यांची एकूण संप्पती ३.९ अब्ज डॉलर्स इतकी असून त्या भारतातील सर्वाधिक श्रीमंत महिलांपैकी एक असल्याचे सांगितले जाते.





USV प्रायव्हेट लिमिटेड ही मुंबईस्थित एक बहुराष्ट्रीय कंपनी आहे. कंपनीची स्थापना विठ्ठल बाळकृष्ण गांधी यांनी केली होती. Tracxn च्या आकडेवारीनुसार, आर्थिक वर्ष २०२४ मध्ये कंपनीला ४,८४० कोटींचा महसूल मिळाला होता. युएसव्हीमधील एका माजी अधिकाऱ्याने इकॉनॉमिक टाइम्सशी बोलताना सांगितले की, लीना तिवारी यांच्याकडे १० ते १२ जमांची कोअर टीम आहे. जी युएसव्हीच्या एकूण कारभारावर देखरेख करते. तिवारी या वेळेला अतिशय महत्त्व देतात, तसेच त्या प्रसिद्धीपासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात.

युएसव्ही ब्रँडचे मधुमेहावरील औषध ग्लायकोमेट याची भारतीय बाजारपेठेतील मागच्या १२ महिन्यातील विक्री ८०६ कोटी रुपये असून या प्रकारातील हे दुसऱ्या क्रमांकाचे औषध आहे. पहिल्या क्रमाकांवर जीएसकेच्या औषध असून त्याची विक्री ८२० कोटी रुपयांच्या घरात आहे. रक्त पातळ करणाऱ्या इकोस्प्रिन या युएसव्हीच्या औषधालाही चांगली मागणी आहे. तर हृदयरोगामध्ये कोलेस्टेरॉलची पातळी करणाऱ्या रोझडे हे औषध लोकप्रिय आहे.

लिना तिवारी यांनी वरळी येथे विकत घेतलेला डुप्लेक्स फ्लॅट वरळी सी फेसवरील Naman Xana या ४० मजली इमारातीत आहेत. एकूण २२,५७२ चौरस फूट क्षेत्रफळ असलेल्या या घराची प्रती चौरस फूट किंमत २.८३ लाख इतकी आहे. अरबी समुद्राचे मनमोहक दृश्य, वांद्रे आणि नरिमन पॉइंटला जाण्यासाठी असलेली कनेक्टिव्हीटी यामुळे वरळीतील रिअल इस्टेटच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत.

# सरकारी अभियंत्याच्या घरावर छापा; २.१ कोटींची रक्कम जप्त

**भुवनेश्वर, दि. ३० वृत्तसंस्था**

ओडिशामधील भुवनेश्वरमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका अपार्टमेंटच्या खिडकीतून ५०० रुपयांच्या नोटांचे बंडल खाली पडू लागल्याने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. त्यानंतर काही जण नोटा गोळा करण्यासाठी धावले तर काहींनी व्हिडीओ रेकॉर्ड केला. ही घटना गुरुवारी घडल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर या घटनेची ओडिशामध्ये मोठी चर्चा रंगली आहे. तसेच एका सरकारी अभियंत्याच्या घरावर छापा टाकल्यानंतर सापडलेल्या २.१ कोटी रुपयांच्या घटनेनंतर प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे.



ओडिशामध्ये भ्रष्टाचाराच्या विरुद्ध सतत कारवाई करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवरच ओडिशा व्हिजिलन्स विभागाने भुवनेश्वरमधील बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता (रस्ते) बैकुंठ नाथ सारंगी यांच्याशी संबंधित वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकण्यात आले. तेव्हा तब्बल २.१ कोटी रुपयांहून अधिक किमतीची बेहिशेबी रोकड जप्त करण्यात आली. या अभियंत्यावर बेहिशेबी मालमत्ता बाळगल्याच्या आरोप झाला होता, त्यानंतर छापे टाकण्यात आले असता ही रक्कम जप्त करण्यात आली आहे.

ओडिशा व्हिजिलन्स विभागाने अभियंता बैकुंठनाथ सारंगी यांच्या निवासस्थानी छापा टाकला. तेव्हा २.१ कोटी रुपयांची रोकड आढळून आली. या घटनेमुळे अधिकाऱ्यांनाही मोठा धक्का बसला. अद्यापही त्या ठिकाणी कारवाई सुरू असल्याची माहिती सांगितली जात आहे. दरम्यान, ओडिशा व्हिजिलन्सच्या पथकाने भुवनेश्वर, अंगुल आणि पिपलीसह ७ ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले. या कारवाईत ८ डीएसपी, १२ निरीक्षक, ६ एएसआय आणि इतर अधिकारी सहभागी होते.

या कारवाई दरम्यान भुवनेश्वरमधील फ्लॅटमध्ये उपस्थित असलेल्या बैकुंठनाथ सारंगी यांना आपल्या घरावर छापा पडत असल्याची कुणकुण लागताच त्यांनी त्यांच्या घराच्या खिडकीतून ५०० रुपयांच्या नोटांची बंडले खाली फेकून दिली. घराच्या खिडकीतून ५०० रुपयांच्या नोटांची बंडले खाली पडत असतानाचे व्हिडीओ देखील सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

# पाकव्याप्त काश्मीर भारताला मिळालाच पाहिजे

## सलमान खुर्शीद यांचा भाजपा सरकारच्या धोरणांना पाठिंबा

**नवी दिल्ली, दि. ३० वृत्तसंस्था**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान व पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळांना लक्ष्य करत ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून मोठी कारवाई केली. भारताने केलेल्या या कारवाईनंतर ऑपरेशन सिंदूरसंदर्भात भारत सर्वपक्षीय शिष्टमंडळाच्या माध्यमातून जागतिक स्तरावर भारताची भूमिका मांडत आहे. या सर्वपक्षीय शिष्टमंडळामध्ये काँग्रेसच्या नेत्यांचा देखील समावेश आहे. दरम्यान, ऑपरेशन सिंदूरनंतर काँग्रेसचे काही नेते केंद्रातील भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारच्या धोरणांना पाठिंबा देत असल्याचं दिसून येत आहे.

काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी देखील अनेकवेळा मोदी सरकारच्या धोरणांचं कौतुक केल्याचं पाहायला मिळालं आहे. त्यावरून राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चाही रंगल्याचं पाहायला मिळालं. यानंतर आता काँग्रेसचे नेते सलमान खुर्शीद यांनी देखील केंद्रातील भाजपा सरकारच्या धोरणांना पाठिंबा दिल्याचं पाहायला मिळत आहे. केंद्र सरकारने कलम ३७० रद्द केल्याच्या निर्णयावर भाष्य करत सलमान खुर्शीद यांनी मोदी सरकारचं कौतुक केलं आहे.



एवढंच नाही तर सलमान खुर्शीद यांनी भाजपा सरकारच्या धोरणांना पाठिंबा दिल्याचंही पाहायला मिळालं आहे. सलमान खुर्शीद यांनी पाकव्याप्त काश्मीर (पीओके) भारताला परत करावे, या भारताच्या दीर्घकाळापासूनच्या मागणीलाही त्यांनी दुजोरा दिला. दरम्यान माजी केंद्रीय मंत्री सलमान खुर्शीद हे सध्या आशिया दौऱ्यावर असलेल्या सर्वपक्षीय शिष्टमंडळाचे सदस्य आहेत. या दौऱ्यादरम्यान खुर्शीद यांनी कलम ३७० रद्द केल्याबद्दल भाजपाच्या नेतृत्वाखालील सरकारचं कौतुक केलं. तसेच जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारताने दिलेल्या लष्करी प्रत्युत्तराचंही कौतुक केलं.

# वैभव सूर्यवंशीने घेतली मोदींची भेट



**पाटणा, दि. ३० वृत्तसंस्था**

वैभव सूर्यवंशीने आज बिहारमधील पाटणा विमानतळावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. मोदींची भेट घेतल्यावर वैभव सूर्यवंशीने त्यांना वाकून नमस्कार करत आशीर्वाद घेतले. यंदाच्या आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सकडून खेळणाऱ्या वैभव सूर्यवंशीने एकूण ७ सामने खेळले होते. त्यात त्याने ३६ च्या सरासरीने २५२ धावा काढल्या. यादरम्यान त्याचा स्ट्राईक रेट हा २०६.५५ एवढा राहिला. तसेच वैभव सूर्यवंशीने एकूण १२२ चेंडूंचा सामना करताना १८ चौकार आणि २४ षटकारही ठोकले.

# खरीप पिकांच्या हमीभावात वाढ

**दरवर्षी प्रमाणे यंदाही खरीप हंगामाच्या सुरवातीलाच केंद्र सरकारने खरिप हंगामात विविध राज्यात जी पीक घेतली जातात त्या पिकांच्या हमीभावात वाढ केलेली आहे. याशिवाय कृषी व्याज अनुदान योजनेस देखील मंत्रिमंडळाने वाढ देण्याचा निर्णय घेतलेला आहे. खरीप पिकांच्या हमीभावात झालेल्या वाढी संदर्भात शेतकरी संतुष्ट आहेत का?आणि हि वाढ समाधानकारक आहे का?याच अनुषंगाने कृषी क्षेत्राचे अभ्यासक रमेश पाध्ये यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.**

**साप्ताहिक संवाद**

**१]यंदाच्या खरीप पिकांच्या हमीभावात केंद्र सरकारने नेमकी किती वाढ केली आहे?**

नुकतीच आगामी खरीप हंगामासाठी विविध पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ केलेली आहे., आणि हि वाढ समाधानकारक आहे असं निश्चित म्हणता येईल. आगामी खरीप हंगामासाठी [जुले ते ऑगस्ट ] सामान्य आणि अ दर्जाच्या वाणांसाठी आधारभूत किमतीत वाढ करण्यात आली आहे. यानुसार भाताचा हमीभाव २,३२० रुपयांवरून २,३८९ रुपये करण्यात आला आहे. ज्वारीच्या किमतीत ३,३७१ रुपयांवरून ३,६९९ इतकी वाढ आहे. माल्दाडा जातीच्या ज्वारीच्या किमतीत ३,७४९ रुपये वाढ केलेली आहे. मोती बाजरीचा हमीभाव २,७७५ रुपये,नाचणी ४,८८६ रुपये,कपाशी ८,११० रुपये,मका २,४०० रुपये,तर तूरडाळ ७५५०वरून ८००० रुपये,मूग ८६८२ वरून ८,७६८ रुपये तर भुईमूग ६,७८३वरून ७,२६३ रुपये असा भाव दिला गेला आहे.

**लोकरंग**

**२] मागील वर्षाच्या तुलनेत यंदाच्या वर्षातील खरिपाच्या हमीभावात फरक दिसतो आहे का?**

होय नक्कीच. मागील १० -१२ वर्षात खरीप पिकांची किमान आधारभूत किंमत सातत्याने वाढविण्यात आलेली आहे. नवीन हमीभावामुळे सरकारी तिजोरीवर २ लाख ७ हजार कोटी रुपयांचा भार पडणार आहे. मागच्या वर्षाच्या हंगामापेक्षा यंदाची रक्कम हि ७ हजार कोटी रुपयांनी जास्त आहे. किमान आधारभूत पिकांच्या खर्चापेक्षा किमान ५० टक्के जास्त असेल. याची काळजी घेण्यात आलेली आहे.

**३] सरकारने कृषी व्याज अनुदान योजनेला देखील मुदतवाढ दिलेली आहे?**

होय याच कृषी अनुदान योजनेत ज्या शेतकऱ्यांनी वेळेवर कर्ज फेडले आहे अशा शेतकऱ्यांना २०२५-२६ साठी १. ५ ते ३ टक्के अतिरिक्त व्याज अनुदानाचा लाभ देणाऱ्या किसान क्रेडिट कार्डची सुधारित व्याज अनुदान योजना देखील सुरु ठेवण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्डद्वारे परवडणाऱ्या दराने अल्पकालीन कर्ज मिळते.देशात सुमारे ७. ७५ केसीसी खाती आहेत.



**चला पर्यटनाला**

# काश्मीरचे 'चटपाल गाव'

असे म्हटले जाते की, जर पृथ्वीवर स्वर्ग असेल तर ते काश्मीरमध्ये आहे. जर तुम्ही पृथ्वीवरील या स्वर्गात सहलीचे नियोजन करत असाल तर या आश्चर्यकारक ठिकाणांना नक्की भेट द्या. श्रीनगर, पहलगाम, गुलमर्ग किंवा युसमर्गच्या सुंदर दृश्यांविषयी तुम्हाला माहिती असेल पण काश्मीरमधील चटपाल गावाच्या सौंदर्याचे वर्णन कोणीही केले नसेल. हे काश्मीरमधील सर्वात सुंदर ऑफबीट पर्यटन स्थळांपैकी एक आहे. हे जम्मू आणि काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यात आहे. शहरी जीवनातील धकाधकीच्या जीवनापासून दूर निसर्गाच्या कुशीत कुटुंब आणि मित्रांसोबत काही महत्वाचा वेळ घालवण्यासाठी हे सर्वोत्तम ठिकाण आहे. तसेच, चटपालच्या सभोवतालच्या जंगलात एक छोटा ट्रेक आहे, जो साहसी प्रेमींसाठी एक सुखद अनुभव असेल.काश्मीरमधील प्रत्येक हंगामाचे स्वतःचे आकर्षण असते. चटपालला भेट देण्यासाठी उन्हाळा हा सर्वोत्तम काळ आहे. हिवाळ्याच्या हंगामत तुमच्या सहलीत अडचणी येऊ शकतील. पण जर तुम्हाला हिमवर्षावाचा आनंद घ्यायचा असेल तर इथे येणे हा एक चांगला पर्याय असू शकतो.श्रीनगर विमानतळ हे पोहोचण्यासाठी सर्वात जवळचे विमानतळ आहे. येथून प्रवास करण्यासाठी तुम्ही टॅक्सी भाड्याने घेऊ शकता..जर तुम्ही इथे राहण्याचा विचार करत असाल, तर तुम्ही जम्मू -काश्मीरवर असलेला बंगला निवडू शकता. येथे तुम्हाला सर्व मूलभूत सुविधा मिळतील.

## रेमेडियम लाइफकेयरचा ट्रम्प फार्मा टॅरिफमुळे बलाढ्य कंपनी म्हणून उदय

**नोंद**

संभाव्य फार्मास्युटिकल्स टॅरिफ्सवरून तर्कवितर्क वाढत असताना जागतिक स्तरावरील फार्मा स्टॉक्समध्ये नव्याने अस्थिरता पाहायला मिळत आहे. मात्र, बाजारपेठेतील तज्ज्ञांनुसार ही काळजी अवास्तव आहे, विशेषतः अमेरिकी बाजारपेठेशी मर्यादित किंवा अजिबात संबंध नसणाऱ्या कंपन्यांनी चिंता करण्याची गरज नाही.रेमेडियम लाइफकेयर ही मिड- कॅप, बीएसई नोंदणीकृत फार्मा कंपनी सध्या सुरू असलेल्या गोंधळात सुरक्षित कंपनी म्हणून उठून दिसत आहे. कंपनीचा व्यवसाय अमेरिका- केंद्रित धोरणांच्या जोखमींपासून धोरणात्मक पद्धतीने सुरक्षित असून, कंपनीने युरोप व आशियात दमदार विस्तार करत एपीआय इंटरमीडीएट्सवर लक्ष केंद्रित केले आहे. विशेष म्हणजे, रेमेडियमने नुकतेच युकेतील आघाडीच्या फार्मास्युटिकल कंपनीकडून १८२.७ कोटी रुपयांचे निर्यातीचे कंत्राट मिळवत बाजारपेठेतील स्थान आणि जागतिक अस्तित्व दाखवून दिले आहे.

जागतिक गुंतवणूकदार अमेरिकी व्यापारावर प्रामुख्याने अवलंबून असलेल्या फार्मा स्टॉक्समधील त्यांच्या गुंतवणुकीचे पुनर्मूल्यांकन करत असताना वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत असलेल्या, भविष्यकालीन योजना, नाविन्यावर आधारित विकास असलेल्या कंपन्यांकडे लक्ष वळत आहे. रेमेडियमचा सीएनएस, ऑंकॉलॉजी आणि मेटॅबॉलिक रिसर्चमध्ये सध्या सुरू असलेला विस्तार आणि सिंगापूरस्थित रेमलाइफ ग्लोबलसारख्या आधुनिक, प्राणीअंश मुक्त उत्पादन करणाऱ्या कंपनीच्या मदतीने दीर्घकालीन मूल्य आणखी वाढत आहे.नाविन्य धोरणामध्ये भर घालण्यासाठी रेमलाइफ ग्लोबलने जियायु लाइफसायन्सेस या ग्रीन केमिस्ट्री प्लॅटफॉर्मसह भागिदारी केली आहे. या भागिदारीद्वारे एपीआय उत्पादन क्षेत्रातील कच्च्या मालात प्राण्यांचा अंश वापरण्याऐवजी पर्यायी घटकांचा वापर करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# अंकिता भंडारीच्या हत्येप्रकरणी भाजपाच्या माजी मंत्र्याच्या मुलगा दोषी

**डेहरादून, दि. ३० वृत्तसंस्था**

उत्तराखंड येथील पौरी न्यायालयाने शुक्रवारी एका २०२० साली घडलेल्या अंकिता भंडारी हत्या प्रकारणा तीन जणांना दोषी ठरवले आहे. या हत्याकांडाने त्यावेळी संपूर्ण राज्याला हादरवून सोडले होते. पण नेमकं हे प्रकरण काय होतं याबद्दल आपण सविस्तर जाणून घेणार आहोत.

१८ सप्टेंबर २०२२ च्या रात्री ऋषिकेश येथील वनांत्रा रिसॉर्टमध्ये अंकिता भंडारी नावाच्या १९ वर्षीय रिसेप्शनिस्टची तीन जणांनी हत्या केली. यामध्ये रिसॉर्टचा मालक भाजपाच्या माजी नेते पुलकित आर्या यांचा मुलगा विनोद आर्या याचा समावेश होता. पोलिसांनी सांगितले की, पुलकित याने रिसॉर्टमधील काही ग्राहकांना 'स्पेशल सेवा' देण्यास नकार दिल्याने अंकिताची हत्या केली. तिघांनी हत्येची कबुली दिल्याच्या दुसऱ्या दिवशी २४ सप्टेंबर रोजी अंकिताचा मृतदेह हा चिल्ला कॅनलमध्ये आढळून आला.

पुलकित आर्या याला आयपीसी कलम ३०२ (हत्या), २०१, ३५४ अ आणि अवैध तस्करी कायदा याअंतर्गत शुक्रवारी दोषी ठरवण्यात आले. दुसरा आरोपी सौरभ भास्कर आणि अंकित गुप्ता हे देखील हत्या, पुरावे लपवणे आणि अवैध तस्करी अशा गुन्ह्यात दोषी आढळले आहेत.



अंकिता भंडारी ही पौरी येथील एका अत्यंत गरीब कुटुंबातील होती, ती शिक्षणसाठी शहरात आळी होती. तिचे वडील बिरेंद्र भंडारी हे सुरक्षा रक्षक म्हणून काम करतात. तिने हॉटेल मॅनेजमेंट शिक्षणासाठी एका संस्थेत प्रवेश घेतला होता, पण करोना काळात पैशांची अडचण असल्याने तिने शिक्षण अर्ध्यात सोडले होते.

अंकिताचा मित्र पुष्प याने ऋषिकेश येथील रिसॉर्टमध्ये नोकरी असल्याचे सांगितले( पुढे हा मित्र प्रकरणात साक्षीदार बनला). अंकिताने ही नोकरी करण्याचा निर्णय घेतला. नोकरीच्या पहिल्या महिन्यातच तिने पुष्प याला सांगितले की, आरोपी तिला १० हजार रुपयांच्या बदल्यात व्हिआयपी लोकांना 'विशेष सेवा' देण्यासाठी तिच्यावर दबाव टाकत आहेत.

पुष्प याने न्यायालयाला सांगितेल की, रात्री ८.३२ वाजता पीडिता त्याच्याशी अखेरची बोलली होती आणि आरोपी तिच्याबरोबर असून तिला भीती वाटत असल्याचेही तिने सांगितले होते.

या प्रकरणात दाखल केलेल्या एफआयआरनुसार, "आरोपीला मृताच्या वडिलांशी बोलू इच्छित होता... (आणि) यामुळे मृत खूपच वैतागली होती. एका सकाळी मृतक रिसॉर्टमधून बेपत्ता झाली. ती तिच्या खोलीत नव्हती. तपासादरम्यान असे आढळून आले आही, आरोपीने रिसॉर्टमध्ये तिचा विनयभंग केला. ते तिच्यावर पाहुण्यांना अतिरिक्त सेवा देण्यासाठी दबाव आणत होते, ज्यासाठी मृतक तयार नव्हती. अर्जदार (अंकित गुप्ता)आणि सह-आरोपींना अशी भीती होती की कदाचित ती हे इतरांना सांगेल. सरकारी वकिलांच्या म्हणण्यानुसार , १८.०९.२०२२ रोजी, अर्जदाराने सह-आरोपींसह तिला रिसॉर्टमधून बाहेर घेऊन गेले, त्यांनी मृतक (अंकिता भंडारी) हत्या केली आणि तिला कालव्यात ढकलले. सप्टेंहर २०२२मध्ये तिचा मृतदेह सापडला."

# एप्रिलमध्ये भारतातून अमेरिकेत 29 लाख आयफोनची निर्यात



**नवी दिल्ली, दि.३० वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी ॲपलचे मुख्य कार्यकारी अधिकारी टिम कुक यांना आयफोनचे उत्पादन भारतातून अमेरिकेत हलवण्याचे आवाहन केले होते. मात्र, टिम कुक यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या या आवाहनाकडे दुर्लक्ष केल्याचे पाहायला मिळत आहे. कारण ओमडिया रिसर्च फर्मच्या मते, एप्रिल महिन्यात ॲपलच्या पुरवठादारांनी भारतातून अमेरिकेत २९ लाख दशलक्ष आयफोन निर्यात केले आहेत. यामध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत ७६% वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे.

ओमडियाने रिसर्च फर्मने म्हटले आहे की, एप्रिलमध्ये अमेरिकेत चीनी आयफोन निर्यात ७६% ने कमी होऊन ९ लाख युनिट्सवर आली आहे, जी मागील वर्षी ३७ लाख युनिट्स होती. काउंटरपॉइंट रिसर्चच्या प्राथमिक मूल्यांकनानुसार एप्रिलमध्ये अमेरिकेत भारतीय आयफोन निर्यात २९ ते ३० लाख युनिट्स दरम्यान होती.

डोनाल्ड ट्रम्प यांनी काहीदिवसांपूर्वीच ॲपलला इशारा दिला होता की, जर त्यांनी आयफोनची निर्मिती अमेरिकेत न करता त्याची आयात केली तर त्यावर २५% कर लागू करण्यात येईल. पण ॲपलने अमेरिकेत आयफोन निर्मिती सुरू केल्यास, आयफोनच्या किंमतीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.

ॲपलने जर अमेरिकेत आयफोनची निर्मिती सुरू केली तर, कामगारांचे पगार, सुट्या भागांची खरेदी आणि पुरवठा साखळीतील गुंतागुंतीमुळे आयफोनच्या प्रो मॉडेल्सची किंमत सध्याच्या १,११९ डॉलर्सच्या तुलनेत ३,००० डॉलर्सपेक्षा जास्त वाढू शकते.

# पंजाबमध्ये फटाक्यांच्या कारखान्यात स्फोट, 5 ठार

**मुक्तसर, दि. ३० वृत्तसंस्था**

पंजाबमध्ये एका फटाक्याच्या कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटामध्ये पाच कामगारांचा जागीच मृत्यू झाला असून ३४ कामगार जखमी झाल्याची घटना घडली आहे. हा स्फोट इतका भीषण होता की त्याच्या धक्क्यामुळे दोन मजल्यांची आख्खी इमारतच जमीनदोस्त झाली. पंजाबच्या मुक्तसर जिल्ह्यातील सिंगवाला गावातील फटाक्यांच्या कारखान्यात गुरुवारी मध्यरात्री हा स्फोट झाला. या स्फोटामागील कारण अद्याप स्पष्ट झालं नसलं, तरी कारखान्यात नियमांना डावलून काम केलं जात असल्याची बाब समोर आली आहे.

सिंगवाना गावात तरसेम सिंग यांच्या मालकीचा हा फटाक्यांचा कारखाना होता. स्फोटाच्या प्रचंड तीव्रतेमुळे ही दुमजली इमारत कोसळली आहे. मध्यरात्री स्फोट झाला तेव्हा काही कामगार काम करत होते तर काही कामगार झोपले होते. त्यामुळे इमारत कोसळली तेव्हा अनेक कामगार त्या ढिगाऱ्याखाली दबले गेले. स्थानिक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनास्थळी तातडीने बचावकार्य हाती घेण्यात आलं. ढिगाऱ्याखालून पाच मृतदेह बाहेर काढण्यात बचाव पथकांना यश आलं आहे. दरम्यान, या कारखान्यात



काम करणारे बहुतांश कर्मचारी हे उत्तर प्रदेश व बिहारमधून स्थलांतरित झाले होते, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. या स्फोटासंदर्भात या भागातील पोलीस उपअधीक्षक जसपाल सिंग म्हणाले, "स्फोटाची माहिती मिळताच आमची पथकं तातडीनं घटनास्थळी दाखल झाली. पाच कामगारांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला असून ३४ जण जखमी झाले आहेत. त्यांना नजीकच्या रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आलं आहे. सर्व जखमींची प्रकृती सध्या स्थिर आहे".

या कारखान्यात नियमांना डावलून एकाच ठिकाणी फटाके तयारही केले जात होते व त्यांचं पॅकेजिंगही केलं जात होतं. त्याशिवाय, अनेक कामगार हे कारखान्यातच राहात होते. "एकदा सर्व जखमींची प्रकृती सुधारली की आम्ही त्यांचा जबाब नोंदवून घेऊ. यातून सदर स्फोटाचं नेमकं कारण समजू शकेल. कारखान्यात नियम डावलून होत असलेल्या गोष्टींवर नियमानुसार कठोर कारवाई केली जाईल", असंही जसपाल सिंग यांनी सांगितलं.

महासागर MUMBAI
RNI No.: MAHAMAR/2016/79101
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From Bora Bazar Street,Fort, Mumbai -400001. Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK

महासागर मुंबई
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) Email : mumbaimahasagar@gmail.com
RNI No.: MAHAMAR/2016/79101